
# पश्चिम भारताचे दर्शन

## ( सौराष्ट्र व राजस्थान )

१९६९
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय भू-प्रवास
अ. क्र. ५९४



RFFBK-0022520

नवीन सोमनाथ मंदिर, प्रभासपट्टण

– गो. प्र. सोहोनी

# पश्चिम भारताचे दर्शन

## [ सौराष्ट्र व राजस्थान ]

२२५२०
३०।११।७८
संदर्भ
भेट
५९४

लेखक
गोविंद प्रभाकर सोहोनी
बी. ए. (ऑनर्स) एल्एल्. बी., बी. टी.
शास्त्र कसे शिकवावे, एकलव्य (संगीत नाटक) व दक्षिण भारताचे दर्शन
इत्यादि पुस्तकांचे लेखक

REFBK-0022520

जगन्नाथ प्रकाशन,
५२८ नारायण, पुणें ३०.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५९४
दा. क्र.
२२५२०
ग्रंथ शाखा

सन १९६१

मुद्रक
दत्तात्रय श्रीपाद गानू
रॅशनल प्रिंटर्स, केळकर रस्ता,
२१६, नारायण पेठ,
पुणें ३०

सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित.

किंमत ४ रुपये

प्रकाशक
सौ. कमलाबाई गो सोहोनी
मु सासवड, जि पुणे

सव्यसाची साहित्यिक, यशस्वी नाटककार आणि चित्रपट दिग्दर्शक व निर्माते, अजोड विडंबनकार, प्रतिभाशाली कवी, महान विनोदपंडित, झुंजार पत्रकार, प्रभावी वक्ते, यशस्वी शिक्षक, राजकारणांतील व सामाजिक अन्यायांविरुद्ध कळकळीने आणि यशस्वीपणे झगडणारे महाराष्ट्रीय जनतेचे पुढारी

## आणि शिक्षणक्षेत्रातील माझे गुरुजी



कै. आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

जन्म १३-८-१८९८ मृत्यू १३-६-१९६९

ह्यांच्या पवित्र स्मृतीस सादर अर्पण

— गो. प्र सोहोनी

# लेखकाचे चार शब्द

१९६५ साली 'दक्षिण भारताचे दर्शन' हे माझे प्रवास–वर्णनात्मक पुस्तक जगन्नाथ प्रकाशनचे श्री श्री ज. गानू ह्यानी प्रसिद्ध केले. सदर पुस्तकाला कै आचार्य प्रल्हाद केशव अत्रे ह्यांची प्रस्तावना मिळण्याचे भाग्य लाभले होते. सदर प्रस्तावनेत आचार्यांनी केलेल्या कौतुकामुळे त्यानतर केलेल्या प्रवासावर आधारलेले 'पश्चिम भारताचे दर्शन' हे पुस्तक लिहिण्यास मी प्रवृत्त झालो व ते आज प्रसिद्ध होत आहे हे पुस्तक पाहण्यास आज आचार्य अत्रे नाहीत ह्याबद्दल अतिशय वाईट वाटत आहे.

पश्चिम भारताच्या सौराष्ट्र–राजस्थान ह्या भागाचा प्रवास आम्ही दत्त दिगबर यात्रा कंपनी पुणे चे सभासद होऊन केला व तो फारच चांगल्या रीतीने पार पडला हे नमूद करण्यास आनद वाटतो ह्या पुस्तकात छापलेल्या काही चित्राचे आणि यात्रा मार्गाच्या नकाशाचे ठसे दत्त दिगबर कंपनीचे धनी, श्री द.दि. तथा दादासाहेब कुलकर्णी ह्यानी आम्हांस वापरणेस दिले याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहे.

माझे हितचिंतक आणि मित्र, श्री श्री ज गानू ह्यांनी छपाईची, बांधणीची वगैरे कामे अत्यत आपलेपणाने केली ह्याबद्दल त्यांचे आभार मानावे तितके थोडेच होतील. वडील भावासारखे त्यांचे मार्गदर्शन मला लाभते हे माझे भाग्यच होय 'दक्षिण भारताचे दर्शन' हे माझे पुस्तक पूर्वी त्यानीच अगावर घेतले म्हणून प्रसिद्ध होऊ शकले.

दक्षिण भारताचे दर्शन हे पुस्तक लिहिताना जी दृष्टी मी ठेवली होती, तीच हे पुस्तक लिहिताना ठेवली आहे प्रेक्षणीय स्थळाचे केवळ वर्णन न करता त्याच्या मागील ऐतिहासिक, सास्कृतिक आणि तात्विक भूमिका मला समजली, तशी व्यक्त करण्याचा मी प्रयत्न केला आहे

जवळजवळ सर्व भारताचा प्रवास करण्याचे भाग्य मला लाभले व त्यामुळे जीवन सुखमय व आनदमय होण्यास आणि आरोग्य चागले राहण्यास मोठी मदत झाली असे मला वाटते. तोच अनुभव इतराना येईल असा विश्वास आहे माझ्या जीवनप्रवासाप्रमाणे भारताच्या प्रवासातही माझी पत्नी सौ. कमला हिने मला चागली साथ दिली, ह्याबद्दल मला फार समाधान वाटते व त्याबद्दल मी आपली कृतज्ञता व्यक्त करतो.

पृ ३२ च्या शेजारचे 'रुक्मिणी मंदिर' हे छायाचित्र माझा मुलगा चि. रवींद्र याने घेतलेले आहे पृ ६४ च्या शेजारचे 'अंबेर येथील राजवाडा' हे छायाचित्र श्री रिसबूड याचे सौजन्याने मिळाले आहे

कस्तुरबा विद्यालय,

सासवड, जि पुणे

दि. ६-११-१९६९

**गो. प्र. सोहोनी**

# अनुक्रमणिका


| प्रकरणे | पृष्ठे |
|---|---|
| १ दत्त दिगंबर यात्रा कंपनी, पुणे | १ |
| २ आंतरराष्ट्रीय-पर्यटन मेळा, मुंबई | ५ |
| ३ बडोदे आणि डाकोर | ८ |
| ४ कर्णावती ऊर्फ अहमदाबाद | १५ |
| ५. जुनागड आणि गिरनार | २२ |
| ६ ज्योतिर्लिंग श्रीसोमनाथ | ३७ |
| ७ पुणे ते सौराष्ट्र व द्वारका, प्रवास वर्णन, स्थानदर्शक नकाशा | ४५ |
| ८ जामनगर आणि द्वारका | ४६ |
| ९ सिद्धपूर अथवा मातृगया | ५८ |
| १०. माउंट अबू-दिलवाडा-अंबाजी | ६१ |
| ११ भारताचे गुलाबी शहर- जयपूर | ७४ |
| १२ पुष्करतीर्थ व अजमेर | ८० |
| १३. मेवाड | ८४ |
| १४. उदयपूर | ८६ |
| १५ चितोडगड | ९८ |
| १६ अवन्तिका अथवा उज्जयिनी | ११२ |
| १७ प्रवासाची फलश्रुती | ११७ |
| १८ जाहिराती | |
| (१) दत्त दिगंबर यात्रा कंपनी, पुणे | |
| (२) जगन्नाथ प्रकाशन, पुणे | |

# पश्चिम भारताचे दर्शन
## ( सौराष्ट्र आणि राजस्थान )

### प्रकरण १
## दत्त दिगंबर यात्रा कंपनी, पुणे.

दि ९।१२।६७ रोजी सकाळी ११-४० च्या मुंबई पॅसेंजरने आम्ही पश्चिमभारताचे दर्शन घेण्यासाठी पुण्याहून प्रयाण केले दत्त दिगंबर यात्रा कंपनीच्या खास प्रवासी डब्यातून आम्ही प्रवासास प्रारंभ केला महाराष्ट्रात आता अनेक यात्रा कंपन्या आहेत पण श्री दत्तात्रेय दिगंबर कुलकर्णी ह्यांची कंपनी ही ह्या व्यवसायातली अग्रेसर कंपनी आहे सर्व यात्रा कंपन्यांच्या जनकत्वाचा मान तिलाच दिला पाहिजे इतर यात्रा कंपन्यांचे चालक वा मालक श्री द दि कुलकर्णी ह्यांच्या तालमीतच तयार झालेले आहेत महाराष्ट्रात एका नवीन व्यवसायाला जन्म देण्याचे श्रेय श्री द दि कुलकर्णी, ह्यांना दिले पाहिजे हा एक पुण्यप्रद, निष्कलंक पण अवघड व्यवसाय आहे एक सहल आयोजित करावयाची म्हणजे कित्येक आठवडे पत्रव्यवहार करावा लागतो आगाऊ रक्कम भरावी लागते धान्य व वाण-सामानाची व्यवस्था करावी लागते नोकरांची जुळवाजुळव करावी लागते अनेक परवानग्या काढाव्या लागतात वेळापत्रक आखावे लागते

श्री द दि कुलकर्णी गेली बावीस वर्षे ही कंपनी समर्थपणे आणि यशस्वीपणे चालवीत आहेत हिमालयातील काश्मीर, केदारनाथ,बद्रीनाथ, नेपाळातील पशुपतेश्वरापासून कन्याकुमारीपर्यंत, पश्चिमेकडील भगवान कृष्णाच्या द्वारकेपासून पूर्व किनाऱ्यावरील जगन्नाथपुरीपर्यंत ह्या कंपनीच्या यात्रा सहली सतत चालू असतात आणि प्रवाशांची कमतरता कधीच भासत नाही किंबहुना अनेकांना नकार द्यावा लागतो ह्या एकाच गोष्टीवरून कंपनीची

लोकप्रियता आणि जनतेचा तिजवरील विश्वास व्यक्त होतो याचे कारण म्हणजे मचोटी, सौजन्य आणि दिलेल्या आश्वासनाची बिनचूक पूर्तता ही होत, असे मला वाटते

भारतातील प्राचीन पवित्र तीर्थक्षेत्रे, भारताच्या प्रदीर्घ आणि वैभवशाली इतिहासाची साक्ष पटविणारी प्रसिद्ध स्थळे,भारतातील भाक्रा नानगल धरणासारखी आधुनिक तीर्थस्थाने, निसर्गसौदर्याने नटलेली ठिकाणे पाहण्याची मध्यमवर्गीय स्त्री-पुरुषांची फार मोठी सोय दत्त दिगबर कपनीकडून होत असते दगदग नाही, कष्ट नाहीत, हमालाशी घासाघीस नाही, तीर्थोपाध्याय याचा ससेमिरा नाही, कोठे वस्ती करावी ही चिंता नाही असुरक्षिततेची भीती नाही सर्व काही अगदी बिनघोर आणि आरामशीर सहलीच्या काळात कपनीने आरक्षित केलेला डबा हेच प्रवाशाचे घर असते ब्रॉडगेज रेल्वेने प्रवास चालू असताना, हा खास डबा फारच सोयीस्कर असतो प्रत्येकाची जागा राखीव आणि खिडकीपाशी असते मीटरगज रेल्वेवर डबा आरक्षित असतो, पण त्यात खास सोयी नसतात तथापि डबा आरक्षित असल्यामुळे गर्दीचा त्रास नसतो तीन चार आठवडे एकत्र राहिल्यामुळे निरनिराळ्या भागातील समानधर्मी प्रवासप्रेमी लोकाच्या चांगल्या ओळखी होतात आणि काहींचा स्नेहहि जुळतो

प्रत्येक सहलीबरोबर स्वत श्री कुलकर्णी अथवा त्याच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेली एखादी जबाबदार व्यक्ती असतेच असते प्रवाशांच्या सुखसोयीकडे लक्ष देणारा तत्पर नोकरवर्ग असतो प्रेक्षणीय स्थळी पोचताच आरक्षित दम तयार असते ठरलेल्या वेळी स्वच्छ, रुचकर आणि सात्विक भोजन तयार असते चहा, कॉफी, याची व्यवस्थाही निर्दोष असते किरकोळ आजाराची औषधे सिद्ध असतात थोडक्यात सागावयाचे म्हणजे आपण आपल्या घरीच आहोत असे वाटते श्री द दि कुलकर्णी, श्रीदत्तात्रेयाचे निस्सीम भक्त आहेत त्यामुळे दत्ताच्या पूजा-आरतीचा दैनदिन कार्यक्रम असतो त्यामुळे मदिराचे पावित्र्यहि प्रतीत होते आणि प्रवाशांचे मन प्रसन्न होते डब्याला घरपणा येण्याचे हेहि एक कारण आहे

प्रवासाला निघण्यापूर्वी प्रवाशाना सविस्तर पत्रके पाठवून माहिती दिली जाते बरोबर कोणत्या वस्तू, कपडे व इतर सामान घ्यावयाचे हे कळविले

जाते बरोबरचे जास्तीचे पैसे कंपनीमार्फत सांभाळण्याची व्यवस्था होते. प्रवाशांना पासबुक दिले जाते व लागतील तसतसे पैसे परत मिळतात बाहेर पडताना जरूरीपुरतेच पैसे जवळ ठेवणे हितावह ठरते. खिसेकापू लोकांपासून आपोआपच संरक्षण मिळते.

*सहल कर दुनियाके गाफिल जिंदगानी फिर कहा ?*
*जिंदगी गर कुछ रही तो नौजवानी फिर कहा ?*

हे जगाच्या सृष्टिसौंदर्याबद्दल अज्ञानी असलेल्या मानवा, आपले हातून होईल तेवढा प्रवास करून जगाची माहिती करून घे

तुझ्या आयुष्याची खात्री काय सांगावी? आणि यदाकदाचित तुला ते प्राप्त झाले, तरीही तारुण्य हे काही पुढील राहिलेल्या आयुष्यात तुझे वाटयास कोठून मिळणार ?

ह्या प्रवासापूर्वी तरुणपणी आम्ही कलकत्ता-जगन्नाथपुरी हा पूर्व भारताचा, रामेश्वर-कन्याकुमारी हा दक्षिण भारताचा, उत्तरप्रदेश-बद्रीकेदार हा उत्तर भारताचा प्रवास स्वतंत्रपणे केला व आर्थिक दृष्टया थोडीफार बचतहि झाली, परंतु ती खरी बचत नव्हतीच कारण हे प्रवास करताना आम्हां सर्वांना जे कष्ट व जी दगदग पडली तिचे मूल्य आम्ही शून्य धरले होते ते रुपयात मोजले असते तर जास्तच खर्च झाल्याचे आढळून आले असते शिवाय तरुणपणी अथवा मध्यम वयात ही दगदग व कष्ट झेपतात पण पन्नाशीची झुळूक लागल्यावर ते झेपत नाहीत आणि हट्टाने केले तर प्रवासाचे सुख कमी होते आम्ही पंजाब–काश्मीर सहल भारत–प्रवासी कंपनीमार्फत केली आणि काशी-पाटणा-नेपाळ सहल दत्त दिगंबर यात्रा कंपनीतर्फे केली वयाची पन्नाशी उलटल्यानंतर केलेल्या ह्या दोन सहली सुखप्रद झाल्या, हे आम्ही स्वानुभवावरून ठामपणे सांगू शकतो. दत्त दिगंबर कंपनीचा प्रधान हेतु द्रव्यार्जन हा नसून, प्रवाशांना सुखकर प्रवासाची सोय उपलब्ध करून देणे हा असतो हेहि आम्ही आमच्या अनु-भवावरून सांगतो ज्यांना आरामात प्रवास करून भारत पाहावयाचा असेल त्यांनी दत्त दिगंबर यात्रा कंपनीचे सभासद होऊन भारताचे दर्शन घ्यावे

आमच्या वयाच्या पासष्टाव्या वर्षी केलेल्या सौराष्ट्र-राजस्थान सहलीत खालील प्रेक्षणीय स्थळे पाहण्याची योजना होती (१) बडोदे, (२) डाकोर,

(३) अहमदाबाद, (४) साबरमती, (५) वेरावळ, (६) प्रभासपट्टण, (७) देहोत्सर्ग, (८) सोमनाथ, (९) भल्लकतीर्थ, (१०) जुनागड, (११) गिरनार, (१२) राजकोट, (१३) जामनगर, (१४) द्वारका, (१५) बेट द्वारका, (१६) गोपीतलाव, (१७) नागेश्वर, (१८) सिद्धपूर (मातृगया) (१९) माऊंट अबू, (२०) दिलवाडा, (२१) अंबाजी, (२२) अजमीर, (२३) पुष्कर तीर्थ, (२४) जयपूर, (२६) नाथद्वार, (२७) एकलिंगजी, (२८) उदेपूर, (२९) चितोडगड, (३०) उज्जैन

वरील प्रवासात पुणे ते अहमदाबाद आणि परतताना रतलाम-उज्जैन-भोपाळ-मनमाड मार्गे पुणे हा प्रवास ब्रॉडगेजने राखीव प्रवासी डब्याने झाला

अहमदाबाद ते वेरावळ, राजकोट ते द्वारका, विरमगाव मार्गे जयपूर ते उदेपूर आणि चितोडगडमार्गे रतलामपर्यंतचा प्रवास मीटरगेजने राखीव डब्याने झाला ओखापोर्ट ते बेट द्वारका आणि परत हा प्रवास बोटीने झाला

अबूरोड ते माउंट अबू, वेरावळ ते सोमनाथ, जयपूर ते अंबेर, अजमीर ते पुष्कर, उदेपूर ते नाथद्वार आणि स्थानिक स्थलदर्शन राखीव मोटार बसने झाले

ह्या प्रवासाला एकूण अठ्ठावीस दिवस लागले ह्या अठ्ठावीस दिवसात मन सदैव प्रसन्न व उत्साही राहिले कोणीहि आजारी झाले नाही कोठेही लहानसा देखील अपघात झाला नाही की कंटाळवाणा खोळंबा झाला नाही. सर्व प्रवास आरामात झाला आणि मन प्रसन्न झाले, उन्नत झाले

## प्रकरण २.

# आंतरराष्ट्रीय पर्यटन मेळा, मुंबई

१९६७ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पर्यटन-वर्ष म्हणून जगभर साजरे झाले. लोकांमध्ये प्रवासाची आवड उत्पन्न व्हावी आणि प्रत्यक्ष पाहिल्यामुळे गैरसमज नष्ट होऊन आतरराष्ट्रीय बधुभावाची भावना जागी व्हावी हा ह्यामागचा मुख्य हेतु होता व तो अतिशय स्तुत्य होता यात सशय नाही दानधर्म घरापासून सुरू होतो अशी इग्रजी म्हण आहे प्रवासालाही ती लागू आहे प्रथम आपल्या जिल्ह्याचा, नतर राज्याचा, त्यानतर इतर राज्यांच्या द्वारा भारताचा व शेवटी जमल्यास जगाचा अशी प्रवासाची आखणी करणे सोयीस्कर असते.

भारतातील सर्व राज्यात आघाडीवर असलेले राज्य असा महाराष्ट्राचा लौकीक असल्यामुळे महाराष्ट्राने आतरराष्ट्रीय पर्यटन मेळावा भरवावा हे उचितच होते हा मेळावा मुबईत-महाराष्ट्राच्या राजधानीत-चर्चगेट रेल्वे स्थानकाजवळ क्रॉस मैदानावर नोव्हेंबर व डिसेंबर १९६७ ह्या महिन्यात भरला होता व ह्या काळात पधरा वीस लाख लोकानी प्रदर्शनाला भेट दिली आम्ही दि १०–१२–६७ रोजी ह्या प्रदर्शनाला भेट दिली आणि अदाजे दोन तास प्रदर्शन पाहण्यात खर्च केले हा वेळ सत्कारणी लागला असे निश्चितपणे वाटते कित्येक एकर क्षेत्र ह्या मेळाव्याने व्यापले होते, प्रवेशद्वाराबाहेरच २५ फूट व्यासाचा पृथ्वीचा गोल १० फूट उचीच्या चौथऱ्यावर उभा केलेला होता व तो प्रेक्षकाचे लक्ष सहजच खेचीत असे जग हे एक आहे, सर्व मानव समान आहेत मग ते कोठेही राहणारे असोत, कोणत्याही वर्णाचे, वशाचे वा धर्माचे असोत ही जाणीव हा गोल पाहून होत होती

प्रवेशद्वाराशी पचगगा अपल्या स्वागतास सिद्ध होत्या १६ फूट उचीच्या चौथऱ्यावर प्रत्येकी १५ फूट उचीच्या गगा, नर्मदा, गोदावरी, कावेरी आणि यमुना ह्या नद्याच्या भव्य स्त्रीमूर्ती आपल्या विशिष्ठ आभूषणासह आणि वाहनासह हसतमुखाने स्वागत करीत होत्या गगा मकरावर, कावेरी

मत्स्यावर, यमुना कसवावर आणि गोदावरी कमळावर उभी होती भारताच्या इतिहासाच्या आणि सर्वंकष संस्कृतीच्या साक्षीदार असलेल्या ह्या सरिता भारतीय लोकांना मातृस्थानी वाटतात ह्यात आश्चर्य नाही ह्या नद्यांनी गेली लक्षावधी वर्षे भारतीय पिढ्यांचे भरण, पोषण आणि रक्षण केले आणि अती त्यांच्या शरीराची माती भारताच्या मातीत मिसळून टाकली प्रखर बुद्धिवादी असलेल्या कै पंडित नेहरूंनीहि गंगेची असामान्य महती आपल्या अद्वितीय मृत्युपत्रात मान्य केलेली आहे, आणि आपल्या रक्षेपैकी मूठभर रक्षा सागरापर्यंत पोचविण्यासाठी गंगेत सोडावी असे आवर्जून सांगितले आहे

पचगंगेच्या पाठीमागे महाराष्ट्राचे दालन होतेच सनईचे मंजुळ स्वर आपले स्वागत करीत महाराष्ट्रांतील मंदिरात हमखास आढळणाऱ्या दीपमाळा, मुंबईजवळील त्रिमूर्ती शिल्प, एलोरा येथील कैलास लेण्यातला भव्य कीर्तिस्तंभ, पुण्याच्या शनिवारवाड्याचा दिल्ली दरवाजा, राजा रविवर्मा ह्याचे सैरंध्री हे तैलचित्र, श्री मुलर ह्याची शकुतला, रावबहाद्दूर धुरंधराचा शिवछत्रपतींचा दरबार इत्यादी खास महाराष्ट्रीय सजावट प्रेक्षकाचे लक्ष खेचीत असे महाराष्ट्रातच हे प्रदर्शन भरलेले असल्यामुळे, महाराष्ट्राचे दालन हे भव्य आणि प्रेक्षणीय असणें साहजिकच होते आणि आवश्यकहि होते गुजराथ, म्हैसूर, काश्मीर, राजस्थान इत्यादी राज्यांची दालनेही वैशिष्ट्यपूर्ण आणि माहितीपूर्ण होती इंग्लंड, फ्रान्स, रशिया, इटली, युगोस्लाविया ह्या देशांची दालने त्या त्या देशाची औद्योगिक क्षेत्रातली नेत्रदीपक प्रगती स्पष्टपणे दाखवीत होती ह्या मेळ्यात अनेक दुकाने, उपाहार गृहे, मुलासाठी छोटी आगगाडी, फिरते पाळण वगैरे करमणुकीच्या गोष्टीहि होत्या दुकानातील वस्तूंचे भाव मात्र नेहमीच्या बाजारभावापेक्षा चढते होते एकदा भेट देण्यासारखा हा मेळावा होता ह्यांत शंका नाही पर्यटन मेळा भरवला हे ठीक झाले, परंतु भारतातली पर्यटनाची साधने सुधारणे आवश्यक आहे आपल्याकडील तिसऱ्या वर्गाचा प्रवास म्हणजे एक दिव्यच असते अतोनात गर्दी, कमालीची अस्वच्छता, पाण्याचा आणि अनेक वेळा प्रकाशाचा अभाव, जास्तीत जास्त अडवणूक करण्याची हमालाची प्रवृत्ती, धर्मशाळांतील अस्वच्छता, तीर्थक्षेत्रात

आढळणारी क्षेत्रोपाध्यायांची वागणूक प्रवाशांना प्रवासापासून परावृत्तच करते स्टेट ट्रॅन्सपोर्टची परिस्थितीही रेल्वेपेक्षा फारशी समाधानकारक नाही भारतात लोक प्रवास करतात खूप, पण तो केवळ अगतिक झाल्यामुळे पर्यटनासाठी, ज्ञानवृद्धीसाठी नव्हे, सुसंस्कार व्हावेत म्हणून तर नव्हेच नव्हे भारतात जन्माला येऊन काशी रामेश्वराचा प्रवास मोक्ष प्राप्तीसाठी करावा अशी श्रद्धा असल्यामुळे लोक केवळ देवदर्शन, गंगास्नान घडावे ह्या एकाच हेतूने प्रवास करतात काही लोक चार धामाची आणि बारा ज्योतिर्लिंगांची यात्रा घडावी म्हणून अखिल भारताचे भ्रमण करतात, परंतु भारतातील औद्योगिक प्रगति, लोकांच्या चालीरीती, भारतातील विविधता, त्या विविधतेत अनुस्यूत असलेली एकता ह्याची त्यांना दखल नसते.

पर्यटन मेळ्यामुळे, फिरत्या प्रदर्शनामुळे, व सचित्र पुस्तिकांच्या प्रसारामुळे डोळस पर्यटनाची आवड हळूहळू उत्पन्न होईल हे खरे. परंतु प्रवाशाचा प्रवास सुखकर होईल अशी काळजी सरकारने घेतली पाहिजे पाश्चात्य देशांत प्रवास केलेल्यांची पुस्तके वाचली म्हणजे तिकडील प्रवासाची साधने सुखकर आणि सुरक्षित असल्याचे समजते तितक्या सुखसोयींची अपेक्षा भारतातील गरीब व अल्पसंतुष्ट जनता करणारही नाही, परंतु माणसाप्रमाणे तरी प्रवास करता आला पाहिजे, मेंढराप्रमाणे नव्हे, एवढी किमान जाणीव सरकारने ठेवली पाहिजे दरिद्री बहुजनसमाजाला पर्यटनाची खरी आवश्यकता आहे पांढरपेशे लोक यात्रा कंपन्यांचा फायदा घेऊन सुखाने प्रवास करू शकतात व करतातही सामान्य माणसासाठी स्वत ला बद्धपरिकर मानणारी राज्यसरकारे आणि भारत सरकार प्रत्यक्षात फारसे काही करीत नाही अथवा करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे निदान प्रवासाच्या बाबतीत तरी तशी वस्तुस्थिती निर्विवाद आहे

तथापि एक नवीन उपक्रम करून आपली जागरूकता महाराष्ट्र शासनाने प्रगट केली ह्याबद्दल त्याचे अभिनंदन केले पाहिजे

## प्रकरण ३

# बडोदे आणि डाकोर

**बडोदे—**

दि. ११-१२-६७ रोजी आमचा मुक्काम बडोद्याला होता कै श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांनी बडोद्याची उभारणी मोठ्या कल्पकतेने केली पुरोगामी, प्रजाहिततत्पर, दूरदृष्टीचे नरेश म्हणून त्यांची ख्याती होती, आणि ती सार्थही होती ब्रिटिश राजवटीतही श्रीमंत सयाजीराव ब्रिटिशा-पुढे वाकले नाहीत त्यांनी यूरोपच्या अनेक सफरी केल्या आणि त्याना जो अनुभव मिळाला त्याचा उपयोग त्यानी बडोद्याची सर्वांगीण सुधारणा करण्यात केला उद्याने, महाविद्यालये आणि विश्वविद्यालय त्यानी स्थापन केले

बडोदा शहर पाहण्यात आम्ही सहा तास खर्च केले. मकरपुरा आणि लक्ष्मीविलास हे राजवाडे राजाच्या पूर्वकालीन वैभवाची आणि ऐषआरामी राहणीची साक्ष पटवितात आता राजाचे राजपद आणि वैभवही लुप्त झाले आहे विलीनीकरणापूर्वी हे राजवाडे आम्ही त्याच्या ऐन वैभवांत पाहिलेले असल्यामुळे ह्या खेपेस ते पाहावयास मिळाले नाहीत ह्याचे वाईट वाटले नाही कामाठी बाग किंवा सयाजी उद्यान व त्यातील पदार्थसंग्रहालय पाहिले पदार्थ संग्रहालयात इजिप्शियन ममी, प्राचीन इजिप्शिअन कलेचे काही नमुने आणि ६० फूट लांब व १५ फूट उंच असा नील देवमाशाच्या हाडाचा सांगाडा, १० फूट लांबीचे हस्तीदंत ह्या वस्तु विशेष प्रेक्षणीय आहेत. इजिप्शिअन ममीच्या पायाची बोटे ३००० वर्षे होऊन गेली तरी शाबूत आहेत आणि शवपेटीहि सुस्थितीत आहे युरोपीयन चित्रकाराची तैलचित्रे आणि शिल्पकारानी तयार केलेले संगमरवरी नग्न पुतळे श्रेष्ठ दर्जाच्या कलेची साक्ष पटवितात

साराभाई केमिकल्स कारखाना आणि त्याचाच बाटल्या तयार करण्याचा काच कारखाना पाहण्यासारखा आहे आवेदन, इर्गापायरीन इत्यादी औषधाच्या गोळ्या लाखानी तयार होतात आणि त्या बाटल्यात भरणे,

बाटल्या सीलबद करणे, ही कामे यत्रेच करतात इजेक्शनेही तयार होतात आणि अॅम्प्यूल्समध्ये भरली जातात हा कारखाना पाहून असा विचार मनात येतो की, आपण लोकाना औषधे घेण्याची चटक लावीत आहोत की काय ? आपली जनता ड्रग अॅडिक्ट होत आहे का व ते चांगले आहे का ? हल्ली घरोघर औषधाचे एक कपाटच असलेले आढळते

विद्यानद स्वामींनी स्थापन केलेले श्री गीतामदिर खरोखरच प्रेक्षणीय आहे भगवद्गीतेची मूर्ती सगमरवरी असून मोठी सुदर आहे. भगवान श्रीकृष्णाच्या आणि प्रभु रामचद्राच्या चरित्रातील प्रसगाची सुदर तैलचित्रे भिंतीवर काढलेली आहेत गीतामदिराचा भव्य सभामडप, त्याची स्वच्छता, भिंतीवरील भगवद्गीतेतील निवडक वचने इत्यादीमुळे मन प्रसन्न होते विद्यानद स्वामींचा पुतळाही दर्शनीय आहे

राजरत्न कै माणिकराव ह्याची जुम्मादादा व्यायामशाळा आणि तेथील आखाडा व शस्त्रसग्रह अतिशय प्रेक्षणीय आहे कै माणिकरावांनी शारीरिक शिक्षणाचे महत्व तरुण मुलामुलींच्या मनावर ठसविण्यासाठी आणि त्या शिक्षणाचा शास्त्रशुद्ध प्रसार करण्यासाठी अपार कष्ट घेतले त्याचे छायाचित्र पाहिले की त्यांच्या व्यक्तीमत्वाची छाप मनावर एकदम पडते आणि आदराने मस्तक नम्र होते

जुम्मादादा व्यायामशाळेतल्या शस्त्रसग्रहात पोर्तुगीजानी श्री शिवाजी महाराजाना भेटीदाखल दिलेली लाबलचक तलवार जरतारी काम केलेल्या मखमली म्यानात ठेवलेली आहे ती पाहून मनाला धन्यता वाटते शिवाजी महाराजाच्या घोड्याच्या डोळ्यावर घालावयाची रेशमाची अधेरीही ह्या सग्रहात आहे तसेच ज्या अर्गजाच्या मण्याची जपमाळ शिवाजीमहाराज वापरीत तीहि तेथे आहे व्यवस्थापकानी सागितले की, ह्या वस्तु दिल्लीला नेण्याचा प्रयत्न झाला परतु कोणत्याही प्रलोभनाला बळी पडावयाचे नाही असे व्यवस्थापकाचे धोरण आहे, हे ऐकून समाधान झाले

कीर्तिमदिर ही भव्य इमारत १९२३ साली बाधली कै श्रीमत सयाजीराव गायकवाड ह्यांचे रगीत छायाचित्र हीच ह्या मदिरातील देवता तिच्यासमोर महाराजाची वैशिष्ठ्यपूर्ण पगडी आहे छायाचित्राची दररोज पूजा होते गायकवाडाच्या राजघराण्यातील अनेक जोडप्याचे शुभ्रवर्णाचे

अर्धपुतळे लहानलहान खोल्यातून माडलेले आहेत आश्चर्याची गोष्ट म्हणजे मदिरात विद्युद्दीपाची सोय असून, विद्युत्प्रकाश मात्र नव्हता. राजघराण्याच्या कीर्तिमदिराची ही अनास्था पाहून खेद वाटला तीच गोष्ट गायकवाड घराण्याची कुलस्वामिनी बहुचरादेवीच्या मदिराच्या व्यवस्थेच्या बाबतींत आढळली ही देवी शेजारीच असलेल्या कुडात सापडली असे म्हणतात तिने आपले वास्तव्य कुडात असल्याबद्दलची सूचना एका ब्राह्मणाच्या स्वप्नात येऊन सागितली, आणि आपली स्थापना करण्याची आज्ञा केली तेव्हापासून राजधराण्याला बरकत आली ती विलीनीकरणापर्यंत टिकली असे दिसते देऊळ अगदीच लहान आहे नवरात्रात मोठा उत्सव होतो असे समजले

कीर्तिमदिराच्या परिसरात महाराष्ट्रीयाचे एक छोटे पण सुदर दत्तमदिर आहे दत्तजयतीच्या उत्सवानिमित्त काही भगिनी मराठी भजने व भक्तिगीते पेटी-तबल्याच्या साथीसह गात होत्या ती ऐकून बरे वाटले कीर्तने, प्रवचनेही होतात दत्ताची मूर्ती सुदर आहे भीमनाथ महादेव मदिरात योगायोगाने सज्जनगडाहून आलेल्या समर्थ रामदासस्वामींच्या फिरत्या पादुकांचे दर्शन झाले व समाधान वाटले

बडोदा हे शहर औद्योगिक दृष्ट्या चांगले प्रगत होत आहे तेलशुद्धीकरण कारखाना Oil Refinery निघाली आहे सयाजी विश्वविद्यालयाच्या इमारती व अध्यापनाच्या सोयी उच्च दर्जाच्या आहेत

## डाकोर–

भारतवर्षातील महान तीर्थक्षेत्रापैकी डाकोर हे एक आहे हा त्याचा लौकीक गेल्या ४५० वर्षापासूनचा आहे भगवान श्रीकृष्ण उर्फ रणछोडराय ह्यांच्या दर्शनासाठी दर पौर्णिमेला आणि गोकुळाष्टमीला भक्तजनाची दाटी असते येथील प्लॅटफॉर्म १४०० फूट लाबीचा मुद्दाम बाधलेला आहे प्राचीन काळी डकमुनी नावाचे ऋषी येथें उग्र तपश्चर्या करीत होते. त्यानी भगवान शकराला प्रसन्न केले आणि भगवान शकरांनी तेथे लिंगरूपाने वास्तव्य करण्याचे मान्य केले. डकक्षेत्र, डकपुरी, डकपूर असे अपभ्रश होत होत सध्याचे डाकोर हे नाव स्थिरपद झाले असे म्हणतात डकेश्वर महादेवाचे छोटेसे मदिर रणछोडरायाच्या मदिरासमोरच आहे.

भगवान शंकरापेक्षा भगवान कृष्ण भक्तजनांना अधिक प्रिय वाटतात असे म्हटले पाहिजे कारण मागाहून ह्या क्षेत्री आलेल्या रणछोडरायांनी भक्तांचा लोंढा आपल्याकडे खेचून घेतलेला आज दिसतो

भगवान श्रीकृष्ण येथे कसे आले ह्याविषयी दतकथा प्रचलित आहे ती अशी ह्या भागात दाट जंगल होते व त्याला हिडिंबावन असे म्हणत एकदा भगवान कृष्ण आणि भीम ह्या भागातून प्रवास करीत असताना, भीमाला फार तहान लागली डाकोरपाशी त्यांना एक लहानसे कुंड दिसले त्यातील पाणी पिऊन तृप्त झाल्यावर भीमाला वाटले की, हे लहान कुंड मोठे केले तर अनेक प्रवाशांची आणि पशु-पक्ष्यांची तहान भागेल म्हणून त्याने कुंड-स्थानी गदेचा प्रहार केला आणि त्या कुंडाचा मोठा तलाव झाला त्यावेळी डंकमुनी समाधी लावून बसलेले होते. गदेच्या प्रहाराच्या आवाजाने त्यांच्या समाधीचा भंग झाला त्यांनी डोळे उघडून पाहिले तों भगवान श्रीकृष्ण आणि द्वितीय पांडव भीम समोर उभे. भगवंतांना पाहून डंकमुनींचा आनंद गगनात मावेना त्यांनी भगवंताच्या पायांवर लोटांगण घातले. भगवंतांनाही डंकमुनींची असामान्य योग्यता माहीत होती त्यांनी वर मागण्याची आज्ञा केल्यावरून डंकमुनींनी श्रीकृष्णाला डाकोर येथे वास्तव्य करण्याची प्रार्थना केली धर्मसंस्थापनेचे माझे अवतारकार्य संपल्यानंतर मी येथे येऊन राहीन, असे श्रीकृष्णाने मान्य केले संवत १२१२ मध्ये महान कृष्णभक्त बोडाणा ह्याने भगवंतांना डाकोर येथे आणले डंकमुनींना दिलेल्या आश्वासनाचे स्मरण ठेऊन भगवंत डाकोर येथे आले. भीमसेनाने निर्माण केलेले सरोवर ९९९ बिघे क्षेत्रफळाचे आहे चांगले खोल आहे, पाणी चांगले आहे, आत मोठी कासवे आणि मासे आहेत द्वारकेला गोमती तीरावर भगवान कृष्णाचे मंदिर आहे द्वारकेहून आणलेल्या मूर्तीची स्थापना ह्या सरोवराच्या काठीच केल्यामुळे, ह्या सरोवराला गोमती तलाव किंवा तीर्थ म्हणतात सरोवराच्या काठी चांगले घाट बांधलेले आहेत सरोवरात नौकाविहाराची सोय आहे सरोवरात एक बेट असून, तेथे हनुमानाचे आणि दत्ताचे अशी दोन छोटी पण सुंदर मंदिरे आहेत

गोमती तीर्थात स्नान करून प्रवासी प्रथम श्रीकृष्णाच्या पदचिन्हांचे (पादुकांचे) दर्शन घेतात तीर्थातच एका पुलासारख्या चबुतऱ्यावर ह्या

पादुका आहेत नतर ते रणछोडरायाच्या दर्शनाला जातात रणछोडरायाचे मदिर सुदर आणि प्रशस्त आहे त्याचे ८० फूट उच सुवर्णकलशमडित पाढरे शुभ्र मुख्य शिखर आणि त्याहून उच असलेल्या ध्वजस्तभावर डौलाने फडफडणारा पाढरा रेशमी ध्वज प्रवाशांची दृष्टि सहजच खेचून घेतो

रणछोडरायांची मूर्ती काळया कसोटी पाषाणाची असून सुदर आहे मूर्तीची उची साडेतीन फूट असून चेहऱ्यावर सात्त्विक भाव आहे बराच वेळ मूर्तीकडे पाहिले म्हणजे भगवान सस्मितमुद्रेने आपणाकडे पहात आहेत असा भास होतो आणि मन प्रसन्न होते मूर्तीपासून दोन अडीच फूट अतरावर उभे राहून दर्शन घेता येते मदिराला आठ घुमट आणि २४ शिखरे आहेत मदिराचा विस्तार पूर्वपश्चिम १६८ फूट आणि दक्षिणोत्तर १५१ फूट आहे प्रदक्षिणेसाठी प्रशस्त मार्ग आहे

रणछोडजींच्या दर्शनाच्या वेळा ठरलेल्या आहेत वाटेल तेव्हा दर्शन होत नाही दिवसातून सहा वेळा दर्शन होते दर्शनासाठी सर्वात चागली वेळ म्हणजे सध्याकाळी ५ वाजताची दररोज ह्यावेळी पालखी असते पालखीनतर आरती होते दुपारी ४ ते ६ हे दोन तास मोकळे ठेवले की, स्नान, पालखी, आरती आणि नौकाविहार हे सर्व कार्यक्रम पार पाडता येतात

डाकोरच्या इतिहासात वर उल्लेखिलेल्या भक्त बोडाणा ह्या भक्ताला अनन्य साधारण महत्व आहे त्याची कथाही मोठी मनोरजक व उद्बोधक आहे द्वापार युगांत ज्या काळी भगवान श्रीकृष्ण आपल्या क्रीडानी गोकुळाला वेड लावीत होते, तेव्हा तेथे विजयनद नावाचा एक गवळी राहात होता विजयनद कृष्णाचा मत्सर व द्वेष करी आणि त्याला सतत शिव्या देई एकदा होळीच्या दिवसात तो स्वत होलिकोत्सव पाहावयास तर गेला नाहीच पण त्याने आपल्या कृष्णभक्त पत्नीलाही जाऊ दिले नाही कृष्ण तिला भेटावयास येईल या भीतीने हातात एक सोटा घेऊन तो दारात बसून राहिला त्याची पत्नी कृष्णदर्शनासाठी आतुर होती पण काही इलाज नव्हता सुनद नावाचा विजयनदाचा मित्र होता सुनदाचे रूप घेऊन कृष्ण विजयनदाकडे आला आणि म्हणाला, 'अरे विजय, कृष्णाच्या भीतीने तू होलिकोत्सव पाहावयासही गेला नाहीस हे बरे नाही आण तो सोटा इकडे.

मी बसतो राखण करीत तू जाऊन ये ' त्याच्यापाशी सोटा देऊन विजयनंद उत्सव पाहावयास गेला कृष्णाने त्याच्या पत्नीला दर्शन देऊन तिचे सांत्वन केले आणि सोटा घेऊन तो दारात बसून राहिला विजयनंद परत आल्यावर सुनंदरूपधारी कृष्ण म्हणाला, "तू विजयनंद नाहीस त्याचे रूप घेतलेला तू कृष्ण आहेस चल चालता हो " विजयनंदाने समजावण्याचा खूप प्रयत्न केला पण सोट्याचे दणके खाऊन त्याला पळ काढावा लागला. सुनंदरूपधारी कृष्ण निघून गेल्यावर, विजयनंद घरी आला आणि त्याने बायकोला खूप खडसावले दुसऱ्या दिवशी होलिकोत्सवात त्याने कृष्णाला घेरले कृष्णाने यमुनेत उडी टाकली मागोमाग विजयनंदानेहि यमुनेत उडी टाकली पाण्यात त्याला कृष्णाने आपले विराटरूप दाखविले तेव्हा त्याची मती पालटली त्याला पश्चात्ताप झाला आणि त्याने श्रीकृष्णाची क्षमा मागितली आपल्यावर कृपा करण्याबद्दल त्याने श्रीकृष्णाला विनविले. कृष्ण म्हणाले, ' कलियुगात डाकोर येथे तू एका क्षत्रिय कुलात बोडाणा ह्या नावाने जन्म घेशील तुझी पत्नीही गंगाबाई ह्या नावाने तेथेच जन्म घेईल तुझ्याशी तिचा विवाह होईल त्यावेळी मी द्वारकेहून डाकोरला येईन आणि तुम्हा दोघांचा उद्धार करीन

कलियुगात डाकोर येथील एक क्षत्रिय वीरसिंह ह्याच्या पोटी द्वापार युगातला विजयनंद जन्माला आला आणि बोडाणा ह्या नावाने प्रसिद्धीस आला त्याचा जन्म संवत ११४० च्या सुमारास झाला लहानपणापासून बोडाणा एकांतप्रिय व विरागी होता संन्यास घेऊन त्याने निघून जाऊ नये म्हणून त्याच्या आईवडिलांनी त्याचा विवाह गंगाबाई ह्या कृष्णभक्त मुलीशी लहान वयातच लावून दिला लौकरच त्याचे मातापिता स्वर्गवासी झाले इतर काही यात्रेकरुबरोबर बोडाणा एकदा द्वारकेला गेला त्याचे मन तेथे इतके रमले की, तो दरवर्षी नियममितपणे द्वारकेला जाऊ लागला द्वारकेची ही वारी बोडाणाने वयाला ७२ वर्षे होईपर्यंत नियमितपणे केली वृद्धापकाळामुळे त्याला ह्या २५० मैलाच्या प्रवासाचा फार त्रास होऊ लागला भगवान श्रीकृष्णाला त्याची दया आली आणि बोडाणाला दर्शन देऊन ते म्हणाले, ' तुला आता फार कष्ट पडतात मीच तुझ्या डाकोरला येऊन राहतो जा एक गाडी घेऊन ये । "

बोडाणाला कोणीही बैलगाडी दिली नाही शेवटी आपले घर विकून त्याने खटारा खरेदी केला आणि तो घेऊन तो परत द्वारकेला गेला पुन्हा का आलास ? असे पुजाऱ्यानी विचारताच ' रणछोडरायाला डाकोर येथे घेऊन जाण्यासाठी आलो आहे ' असे त्याने उत्तर दिले.त्या रात्री पुजाऱ्यानी मदिराचा कडेकोट बदोबस्त केला परतु भगवान रणछोडराय मदिरातून बाहेर पडले आणि खटाऱ्यात बसून बोडाणाबरोबर डाकोरला गेले. बोडाणाला झोप मिळावी म्हणून बराच वेळ भगवतानी गाडीही हाकली भगवान आणि बोडाणा डाकोरला पोचले तो दिवस कार्तिक पौर्णिमा सवत १२१२ हा होता डाकोरमध्ये आनदाला पारावर राहिला नाही इकडे मदिरात मूर्ती नाही हे पाहून द्वारकेतले पुजारी हवालदील झाले ते तडक डाकोरला निघाले गोमती सरोवरात मूर्ती लपवून ठेवून बोडाणा त्याना सामोरा गेला तो दिसताच पुजाऱ्यानी सतापून त्याच्यावर तीराचा वर्षाव केला आणि त्याला ठार केले पण भगवताच्या पाषाणमूर्तीतून रक्ताच्या चिळकांड्या निघून गोमती तीर्थाचे पाणी लाल झाले. शेवटी मूर्तीच्या भारभार सोने स्वीकारण्यास पुजाऱ्यानी मान्यता दिली बोडाणाच्या बायकोपाशी सोन्याचा एक क्षुद्र अलकार दोता. पण तो मूर्तीच्या वजनापेक्षा अधिक वजनाचा भरला आणि तो घेऊन पुजाऱ्यांना निमुटपणे परतावे लागले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा

## प्रकरण ४.

# अहमदाबाद

अहमदाबादचे जुने नाव कर्णावती मुसलमानी अमलात अहमदाबाद हे नवीन नामकरण झाले अहमदाबाद गुजराथ राज्याची राजधानी आहे. कापड गिरण्यासाठी आणि कापूस व्यापारासाठी अहमदाबादचा नबर मुबईच्या खालोखाल लागतो शहर अतिशय मोठे, माणसानी गजबजलेले कोटया-धीश गिरणीवाले आपापल्या प्रासादात सुखी जीवन जगत आहेत. रोजची लाखो रुपयाची उलाढाल होत असते मालाने ठासून भरलेली दुकाने शहर-भर पसरलेली आहेत. वाहनांचा सुळसुळाट आहे सायकली, ऑटोरिक्षा, बसेस, खाजगी मोटारी, टॅक्सी, ट्रक सारख्या धावत असतात. मुबई पाहि-लेल्या लोकाना अहमदाबादमध्ये विशेष असे काही वाटत नाही पादचारी लोकाना रस्ते ओलाडण्यासाठी डोळयात तेल घालून कसरत करावी लागते महागाई मुबईसारखीच खुद्द अहमदाबादेत तयार होणारे कापडही स्वस्त मिळत नाही अहमदाबादचे खास असे वैशिष्टच आम्हाला तरी आढळले नाही नाही म्हणायला, गुजराथी भाषेचे आणि स्त्रियाच्या डाव्या खाद्यावरून घेतलेल्या पदराचे प्राबल्य जाणवते दुकानावरच्या पाटया गुजराथी व इग्रजी अशा दोन्ही भाषांत आढळतात केवळ इग्रजी असलेल्या पाटयाही कमी नाहीत

अहमदाबादचे नवीन रेल्वे स्टेशन मोठे आणि भव्य आहे आणि त्यास बारा प्लॅटफार्म आहेत सौराष्ट्रभर फिरणारी मीटरगेज रेल्वे अहमदाबादेहूनच सुरू होते

ब्रिटिशांच्या विरुद्ध चाललेल्या स्वातत्र्य सग्रामाच्या काळात गाधीजींच्या वास्तव्यामुळे अहमदाबादला अनन्य साधारण महत्त्व होते साबरमती आश्र-मात गाधीजी राहात आणि चळवळीची सूत्रे हालवीत सरदार वल्लभभाई पटेल, विठ्ठलभाई पटेल, महादेवभाई देसाई ही नररत्ने गुजराथनेच भार-ताला पुरविली पाण्यासारखा पैसाहि गुजराथने पुरविला काका कालेलकर आणि विनोबा भावे हे महाराष्ट्रीय महापुरुष गुजराथेत प्रसिद्धीला आले हेहि लक्षात ठेवण्यासारखे आहे

आम्ही दि १३-१२-६७ रोजी उजाडता अहमदाबादला पोहोचलो जेवणखाण करून दुपारी १२ वाजता अहमदाबाद पाहवयास निघालो आणि सध्याकाळी ५-३० वाजता स्टेशनवर परत आलो साडेपाच तासात जवळ जवळ ६० मैलाची बसची चक्कर झाली आम्ही पाहिली ती स्थळे अशी (१) स्वामी नारायण मदिर, (२) महावीर स्वामी मदिर, (३) दादा हारीची विहीर, (४) साबरमती आश्रम, (५) भद्रकाली मदिर, (६) झुलते मनोरे, (७) गीता मदिर (८) वेदमदिर, (९) काकरिया तलाव आणि (१०) बालवाटिका

स्वामीनारायण किंवा नर-नारायण मदिर प्रशस्त आणि प्रेक्षणीय आहे. स्वामीनारायण हे वास्तविक एका सज्जन गृहस्थाचे नांव छाप्रा गावचा हा माणूस अहमदाबादला स्थायिक झाला आणि धनवान व कीर्तिवान झाला अशा ह्या माणसाला हिंदू मदिराची अनास्था पाहवत नसे. त्याने आपल्या नावाचा एक सेवापथ निर्माण केला ह्या पथाचे प्रचारक निर्माण करण्याची शाळा ह्या मदिरात आहे. एखाद्या गावातले मदिर दुःस्थितीत आहे असे समजले की, स्वामीनारायण आपले दोन प्रचारक तेथे पाठवीत आणि लोकाच्या दातृत्वाला आवाहन करून आणि स्वत. मदत देऊन मदिराला सुव्यवस्थितपणा आणून देत. स्वामीनारायण पथ धर्मभेद मानीत नाही. कोणत्याही स्त्री-पुरुषाला प्रचारकाचे शिक्षण घेण्याची मुभा असते ह्या पथाचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही लहान मोठ्या कामाला एकच एक प्रचारक कधीही धाडला जात नाही. दोघांनी गेले पाहिजे असा दडकच आहे. एकच एक असला तर मोह पडून लबाडी करण्याची भीती असते. दोघे असले म्हणजे ही भीती राहत नाही. दोघाच्या साक्षीने घडलेली गोष्ट गुप्त राहू शकत नाही एकट्यावर विश्वास ठेवणे भरवशाचे नसते अशी समजूत ह्यामागे असावी. ती खरी की खोटी हा विवाद्य प्रश्न होऊ शकेल स्वामी नारायणानी हे मदिर स्वत ची आई, वडील, आणि स्वत चे म्हणून बांधले, पण आत्मगौरवाचा दोष येऊ नये म्हणूण नर-नारायण मदिर आणि देवी मदिर अशी नावे त्यास दिली आहेत.

**(२) महावीर स्वामी मंदिर**—कै. पडित नेहरूच्या धाकट्या भगिनी कै. सौ कृष्णा हाथीसिंग ह्याच्या आजेसासऱ्यानी हे मदिर दिलवाडा

येथील जगप्रसिद्ध जैन मंदिराच्या धर्तीवर आपल्या मातोश्रीच्या सोयीसाठी बांधविले त्यांच्या मातोश्री दरवर्षी दिलवाड्याला दर्शनासाठी जात असत पुढे त्या थकल्या पण दिलवाड्याला जाण्याची इच्छा तर स्वस्थ बसू देईना. म्हणून त्यांच्या लखपती पुत्राने हुबेहूब तसले मंदिर अहमदाबाद येथे बांधविले आणि जैनांचे २४ वे तीर्थंकर महावीर स्वामी ह्यांच्या मूर्तीची स्थापना केली. ह्या मंदिराची कलाकुसर अप्रतीम आहे मंदिरातील आणि आवारातील स्वच्छता आणि शांतता दुसरीकडे क्वचितच आढळेल. महाराष्ट्रात तर असले मंदिर सांपडणे शक्य नाही. आमच्या मंदिरातून बाजार भरलेले, भिकाऱ्यांचा सुळसुळाट, पुजाऱ्यांची अरेरावी, अस्वच्छता असे दृश्य दिसते. त्यामुळे दर्शनेच्छूची अल्पस्वल्प श्रद्धाहि डळमळू लागते महावीर मंदिरात ह्यांपैकी एकहि गोष्ट नाही देवाच्या स्नानासाठी फक्त पावसाचे पाणी साठविण्यासाठी खोल कुंड आहे दुसऱ्या कोणत्याही पाण्याचा उपयोग केला जात नाही दर्शनाला येणाऱ्यांना जप करण्याची इच्छा झाली तर उपयोगी पडाव्या म्हणून तुळशीच्या मण्यांच्या माळा ठेवलेल्या असतात जप करून परत जाताना माळा जागच्याजागी ठेवावयाच्या असतात महावीरस्वामीची मूर्ती आणि इतर तीर्थंकरांच्या मूर्ती संगमरवरी पाषाणाच्या असून सुबक आहेत सर्व मूर्तींच्या डोळ्यांच्या जागी खडे बसवून डोळ्यात खरी चमक निर्माण केली आहे मंदिरातील कोरीव काम अतिशय सुबक आणि नाजूक आहे. इतर फारसे काही पाहता आले नाही, तरी अहमदाबादेत हे मंदिर प्रत्येकाने अवश्य पहावे असे आहे

**(३) दादा हारीची सात मजली विहीर**– ज्या सुभेदाराने अहमदाबाद शहर पुनश्च वसविले त्याची सून इराणच्या सरदाराची मुलगी होती पहिल्या बाळंपणासाठी इराणमध्ये तिच्या माहेरी तिला पाठवायला तिची सासू राजी नव्हती कारण त्यावेळी प्रवास आजच्यासारखा सुलभ नव्हता आणि इराणला जाणे तर दिव्यच होते हरिया नावाची एक कुशल सुईण होती तिने पहिलटकरणीचे बाळंतपण अतिशय कुशलतेने पार पाडले आणि सुभेदारणीला नातू झाल्यामुळे फार आनंद झाला. तिने हरिया दाईला दोन जडजूड सुवर्णकंकणे बक्षीस दिली. हरिया

म्हणाली, ह्या कंकणांचा माझ्यासारख्या सामान्य सुईणीला काय उपयोग, त्या कंकणाच्या किंमतीतून एक सुंदर विहिर बनवा, म्हणजे अनेकांची पाण्याची गरज तरी भागेल. तिच्या इच्छेप्रमाणे एका कुशल गवंड्याकडून एक सुंदर सातमजली विहीर बांधण्यात आली. ह्या विहिरीत आता पाणी नाही, पण तिचे बांधकाम प्रेक्षणीय आहे. एका बाजूने पाच मजले उतरून दुसऱ्या बाजूने पाच मजले चढून येता येते. तळचे दोन मजले हल्ली बंद असल्यासारखेच आहेत सामान्य, अशिक्षित आणि गरीबीत दिवस काढणाऱ्या ह्या सुईणीच्या मनातील माणूसकी लाख मोलाची होती. सुवर्णालंकार प्रिय असा स्त्रियांचा लौकिक अद्यापही आहे, हे लक्षांत घेतले म्हणजे हरियाचा त्याग विशेष कौतुकास्पद वाटतो दाई हरियाची विहीर ह्या नावाचा अपभ्रंश होऊन, तिचे सध्याचे नाव दादाहारीची विहिर असे झाले आहे. स्त्रीचे कर्तृत्व बरबर पाहता एका पुरुषाला चिकटविले गेले आहे शेजारी एका इमारतीत सासू, सून, हरिया आणि गवंडी ह्यांच्या कबरी आहेत अगदी साध्या आहेत.

**(४) गांधीजींचा साबरमती आश्रम**– अहमदाबादपासून काही मैलांवर साबरमती नदीच्या तीरावर हा आश्रम उभारलेला आहे साध्या एकमजली इमारती लहान लहान खोल्यांचा हा आश्रम स्वच्छतेमुळे, शांततेमुळे, साधेपणामुळे आणि विशेष म्हणजे गांधीजींच्या अनेक वर्षांच्या वास्तव्यामुळे पवित्र वाटतो.

ज्या खोल्यांत गांधीजी व कस्तुरबा १९२८ ते १९३० पर्यंत राहात असत, त्यांना हृदयकुंज हे अन्वर्थक नाव आहे ह्याच कुंजात गांधीजींना दांडी यात्रेची स्फूर्ती झाली आणि १२–३–३० रोजी दांडीयात्रेसाठी गांधीजींनी प्रस्थान ठेविले दांडीयात्रा ही पुढील अहिंसात्मक स्वातंत्र्ययुद्धाची नांदी ठरली आणि जगाच्या इतिहासातली एक अजोड घटना म्हणून ती नोंदली गेली दांडीयात्रेची तुलना बुद्धाच्या सर्वसंग परित्यागाशी केलेली आहे व ती पटण्यासारखी आहे.

गांधीजींचे पट्टशिष्य विनोबा भावे आणि पट्टशिष्या मिराबेन ज्या खोलीत राहात असत, त्याहि प्रेक्षकाच्या मनात आदरभाव निर्माण करतात गांधीजींनी कातलेले सूत, त्याचे कापड, त्याचे सुदर्शन चक्र (चरखा), ते वापरीत

असलेला कुडता, त्यांना मिळालेली काही मानपत्रे, त्यांना आलेली पत्रे, त्यांच्या हस्ताक्षरांचे नमूने इत्यादीचे एक प्रेक्षणीय प्रदर्शन आहे गांधीजीची जीवनगाथा उलगडून दाखविणाऱ्या छायाचित्रांची कालक्रमानुसार केलेली मांडणी जुन्या स्मृतींना उजाळा देते

गांधी ग्रंथालय चांगले सुसज्ज आहे १ सहिष्णुता, २. अस्पृश्यता निवारण, ३. अभय, ४. स्वदेशी, ५. अपरिग्रह, ६ अस्तेय, ७ अस्वाद, ८ ब्रह्मचर्य, ९. अहिंसा १० सत्य आणि ११ शरीरश्रम ही गांधी-प्रणीत अकरा व्रते निरपवाद आहेत हे कोणीहि मान्य करील मेरा जीवनहि मेरा संदेश है हा गांधीजींचा संदेश ठळक अक्षरांत लिहिलेला आहे, आणि तो अर्थपूर्ण आहे माणूस जे जीवन जगतो तेच त्याचे खरे रूप असते, तोच त्याचा खरा संदेश असतो. मनुष्य पुष्कळ बोलतो, पण त्याप्रमाणे चालतोच असे नाही. म्हणूनच संतश्रेष्ठ तुकोबांनी म्हटले आहे "बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले".

१९३० साली साबरमती आश्रम सोडल्यावर पुन्हा गांधीजी तेथे गेले नाहीत त्यांनी वर्ध्याजवळ शेवगाव (सेवाग्राम) येथे आणखी एक आश्रम स्थापन केला व तेथे त्यांचे वास्तव्य अधूनमधून होऊ लागले

गांधीजींना जी पत्रे आली त्यातील एकावरील पत्ता

**M. K. Gandhi,**
**Wherever he may be**
**INDIA.**

हे पत्र गांधीजींना पोचले हे सांगायला नकोच.

(५) **भद्रकाली मंदिर**–ह्या मंदिरात साडेतीन चार फूट उंचीची काळ्या पाषाणाची उग्र मूर्ती आहे तोंडातून चांदीची जीभ बाहेर काढलेली दाखविली आहे. दर्शनासाठी गर्दी बरीच असते काली मातेची मंदिरे आपल्या भागात क्वचितच आढळतात

(६) **झुलते मनोरे**–स्टेशनापासून थोड्याच अंतरावर असलेल्या मशीदीचे दोन मनोरे प्रेक्षणीय आहेत. शेवटच्या मजल्यावरील झरोक्यापाशी जोर देऊन भिंत हालविली, की दगडी मनोरा हालू लागतो आणि त्याचे हालण

तेथे गच्चीत बसलेल्या प्रेक्षकाना स्पष्टपणे दिसते व जाणवतेहि. विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे एक मनोरा हालविला की दुसराहि न हालविता हालू लागतो. जुळ्या भावंडांसारखे हे मनोरे वाटतात. एकात निर्माण झालेली संवेदना दुसऱ्याला आपोआप जाणवते अशाच बांधणीचे दोन मनोरे स्टेशन-च्या अधिक जवळ असलेल्या मशिदीवर आहेत, पण ते हालत नाहीत मुसल-मानी अमदानीत अहमदाबादला १८ वेशी होत्या, त्यापैकी दोघीवरच झुलते मनोरे होते. त्यापैकी स्टेशनजवळचे दोन शाबूत आहेत. सात मैलांवरील एका वेशीवर दोन झुलते मनोरे आहेत. पण त्यातल्या एकाचा अर्धा भाग कोसळला आहे. प्राचीन मुसलमानी स्थापत्यकलेचा हा एक अजब नमुनाच म्हटला पाहिजे दोन्ही मनोऱ्यांचे पाये घालतानाच अशी काही करामत केलेली असावी की, एकाच्या हालचालीमुळे उत्पन्न होणाऱ्या लहरी दुसऱ्यापर्यंत पोहोचाव्यात व तेथे प्रगट व्हाव्यात

(७) **गीता मंदिर**—ज्या विद्यानंदस्वामींनी बडोद्याला गीतामंदिर स्थापन केले त्यांनीच हे मंदिरहि करवून घेतले मंदिराची बांधणी व आतील प्रशस्त असा शेट मोतीभाई हिराभाई सभामंडप त्याच धर्तीचा आहे भिंतीवर गीतेतले श्लोक अध्यायाच्या क्रमाने लिहिलेले आहेत तळमजल्या वर स्वामीजींचे छायाचित्र ठेवलेले असून त्याची पूजा होते. मागे भिंतीवर गीतोपदेशाचे भव्य चित्र आहे. तिसऱ्या मजल्यावर गीतेची सुंदर मूर्ती आहे सभामंडप असे न म्हणता होल हा शब्द वापरला आहे तो खटकतो अनेक भित्तीचित्रे सर्वत्र रंगविलेली आहेत.

(८) **वेदमंदिर**—वेदमंदिर ही नवीन कल्पना आहे. तळमजल्यावर वेदाच्या पोथ्या आहेत तिसऱ्या मजल्यावर सुंदर वेदमूर्ती असून, तिच्या चार हातांत चार वेद असल्याचे दाखविले आहे. प्रवेशद्वाराशी संकट विमो-चन मारुतीची सुबक मूर्ती असून, तिच्या पायदळी एक स्त्री दाखविली आहे. ती स्त्री म्हणजे शनीची साडेसाती होय. शनीची साडेसाती लागलेल्या माणसाने पापविमोचन मारुतीची भक्ती करावी, सेवा करावी म्हणजे साडेसातीचा त्रास कमी होतो असे समजतात.

(९) **कांकरिया तलाव**—कांकरिया तलाव मोठा आहे आणि तलावातच नगीनावाडी हा प्रासाद आहे. तेथे नौका-विहाराची सोय आहे.

( १० ) **बालवाटिका** – ( Children's Park ) बालवाटिका हे अहमदाबादचे एक प्रेक्षणीय स्थळ आहे. मुलांची करमणूक व्हावी अशा अनेक गोष्टी तेथे आहेत प्रारंभीच एक मोठी सीमेंटकाँक्रीटची नौका ठेवलेली आहे. मुलांसाठी बालवाचनालय, घोड्यावर बसण्याची सोय, दगडी पशुपक्षी, झोक्याची प्रतिकृती, विविध प्रकारचे निवडुंग वगैरे गोष्टी आहेत अर्थात कँटीन आहेच व तेथे गर्दीही पुष्कळ असते

प्रकरण ५.

# जुनागड आणि गिरनार

## जुनागड

दि १६–१२–६७ रोजी सकाळी १० वाजता आम्ही जुनागडला पोचलो स्वातंत्र्यापूर्वी जुनागड हे मुसलमान नबाबाचे संस्थान होते नबाबाने पाकिस्तानात विलीन होण्याची इच्छा व्यक्त केली आणि पाकिस्तानात पलायन केले बाकीची व्यवस्था करण्याचे काम आपल्या एका अधिकाऱ्यावर सोपविले गिरनार आणि सोमनाथ ही पवित्र तीर्थक्षेत्रे पाकिस्तानात जाणे हे भारताला लांछनास्पद ठरले असते तसेच वेरावळसारखे बंदर पाकिस्तानात जाणे आर्थिकदृष्ट्या अतिशय नुकसानीचे आणि संरक्षणदृष्ट्या धोक्याचे ठरले असते जुनागड संस्थानात नबाबाचे राज्य असले तरी बहुसंख्य जनता हिंदु होती ह्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन, सरदार वल्लभभाई पटेलानी भारतीय सैन्य पाठवून २४–१०–१९४७ रोजी विजयादशमीच्या शुभदिनी जुनागड ताब्यात घेतले. सरदाराची ही कारवाई भारताच्या इतिहासात अजरामर राहील ह्यांत संशय नाही त्यामुळेच सोमनाथाचे भव्य मंदिर पुन्हा उभारले जाऊ शकले आणि गिरनार भारतातच राहिले. प्रत्यक्ष जुनागड शहरात प्रेक्षणीय असे फारसे काही नाही

गिरनार व सोमनाथ भारतात राहिले हे खरे परंतु देशाची फाळणी झाल्यामुळे हिंदूची व शीखांची अनेक पवित्र स्थाने पाकिस्तानात गेली त्यांची व्यवस्था चांगली राखली जावी आणि भारतीयांच्या मनात त्याची स्मृती टिकून रहावी अशी व्यवस्था सरकारने केली पाहिजे. वास्तविक पाहता पासपोर्ट व व्हीसा लागणार नाही असे जिव्हाळ्याचे संबंध भारत आणि पाकिस्तान ह्या दोन्ही राष्ट्रात निर्माण झाले पाहिजेत.

(१) **सम्राट अशोकाचा शिलालेख**– एका इमारतीत सम्राट अशोकाचा एक शिलालेख एका प्रचंड खडकावर कोरलेला आहे शिलालेख म्हटला म्हणजे तो पाटीसारख्या सपाट कापीव शिळेवर कोरलेला असणार अशी आपली कल्पना होते परंतु जुनागड येथे संरक्षिलेला शिलालेख

वेड्यावाकड्या खडकाच्या पृष्ठभागावर त्या वेळी प्रचलित असलेल्या भाषेत व लिपीत कोरलेला आहे. खाली बसलेल्या पांढुरक्या हत्तीच्या पाठीवर आणि पोटावर लिहिलेले जसे दिसेल तसा तो दिसतो. त्यातील मजकुराचे इंग्रजी भाषांतर छापून घेऊन फ्रेममध्ये लावलेले आहे. ते बरेच लांबलचक असल्या-मुळे वाचण्याइतका वेळ नव्हता. ऊन, पाऊस, थंडी, वारा ह्यांपासून रक्षण करण्याची व्यवस्था केली आहे हे चांगले आहे.

(२) **श्री भवनाथ महादेव**– हे भगवान शंकराचे स्वयंभू स्थान आहे असे सांगतात. येथे शिवरात्रीला फार मोठा मेळा भरतो.

(३) **दामोदर कुंड**– हे चांगले बांधून काढलेले कुंड असून, बरेच मोठे आहे. येथे राधादामोदर मंदिर आहे व ते स्थान फार पवित्र मानले जाते असे दिसून आले.

(४) **सरक बाग**– ह्या प्राणिसंग्रहालयात गीरच्या जंगलातले भारतीय सिंह आणि सिंहिणी, वाघ आणि चित्ते सुस्थितीत सांभाळलेले पाहावयास मिळतात आणि ह्या वनराजांना पाहून समाधान वाटते. वनराजाला गर्जना करण्याचीहि त्या वेळी लहर आली व ती घनगंभीर गर्जना ऐकून, रघुवंशा-तल्या द्वितीय सर्गांत राजा दिलीपाला कुंठित करणाऱ्या सिंहाचे स्मरण झाले.

(५) **उपरकोट**-(वरचा किल्ला) हा किल्ला भुईसपाटच आहे. प्रवेशद्वारा-पाशी गणपतीची व हनुमानाची अशा पुरुष पुरुष उंचीच्या दोन मूर्ती आहेत. थोडे वर गेल्यावर एक तलाव, एक राजवाडा आणि एक तोफ दृष्टीस पडते.

(६) **संत नरसी मेहता ह्यांची समाधी**– ही समाधी हे जुनागडचे एक आकर्षण आहे. जुनागड ही नरसी मेहता ह्यांची जन्मभूमी, कर्मभूमी आणि समाधीभूमी आहे. नरसी मेहता ह्यांना गुजराथचे संत तुकाराम असे म्हणतात. तुकाराम महाराजांच्या अभंगाइतकीच नरसीजींची भजने गोड आणि अर्थगर्भ आहेत. 'वैष्णव जन तो तेने कहिये' हे नरसीजींचे भजन महात्मा गांधींनी आपल्या दैनंदिन भजनावलीत समाविष्ट केल्यामुळे सर्व भारत नरसीजींना एक थोर संत म्हणून ओळखतो.

नरसी मेहता वयाच्या सातव्या वर्षापर्यंत मुके होते. एका साधूकडे त्यांच्या आईने त्यांना नेले व त्या साधूने त्यांना 'राधे श्याम', असे म्हणा-वयास सांगताच त्यांना वाचा फुटली व ते बोलू लागले. पुढे आयुष्यभर

त्यांनी आपली वाणी भगवद्‌भक्तीपर भजने रचण्यात आणि जनतेची धार्मिक वृत्ती जिवंत करण्यात अपरिग्रहवृत्तीने झिजविली. काम, क्रोध, लोभ, मद, मत्सरादि षड्रिपूपासून ते सदैव अलिप्त राहिले. त्यांच्या चरित्रासहि आप-ल्याकडील संतांच्या चरित्राप्रमाणें अनेक चमत्कार चिकटलेले आहेत मंगळवेढ्याच्या दामाजीसाठी ज्याप्रमाणें भगवंताला विठू महार बनावे लागले, त्याचप्रमाणे नरसी सारख्या भक्ताचा शब्द खरा करण्यासाठी भग-वंताला सावळा सावकार बनून, सगुण रूपात प्रगट होऊन नरसीजींनी दिलेली हुंडी पटवून द्यावी लागली.

तुकारामाचे जसे अकारण शत्रू होते तसे नरसीजींनाहि होते. गावात मालदार सावकार कोण आहे, अशी चौकशी द्वारकेला निघालेल्या एका पांथस्थाने केली असता नरसीजींच्या निंदकाने त्यांचे नांव सांगितले. त्यावर विश्वास ठेऊन पांथस्त त्याच्याकडे गेला आणि त्यांचे दरिद्र्य पाहून प्रथम कचरला. तथापि श्रीमंत लोक केव्हा केव्हा हेतुपूर्वक दारिद्र्यासारख राहतात असे मानून पांथस्थाने नरसीजीपुढे पैसे ठेवले आणि त्याच्या द्वारकेच्या पेढीवर हुंडी मागितली. नरसीजींनी त्याची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला पण तो व्यर्थ गेला. नरसीजींनी शेवटी द्वारकेच्या सावळा सावकाराच्या नावावर हुंडी लिहून दिली आणि पांथस्थासमोरच त्याने दिलेली रक्कम गोरगरीबांना वाटून टाकली हे पाहून पांथस्थाला पुन्हा एकदा आश्चर्याचा धक्का बसला पण काही न बोलता तो द्वारकेला निघून गेला

द्वारकेला गेल्यावर त्याने सावळा सावकाराच्या पेढीची चौकशी केली परंतु ह्या नावाचा कोणी सावकार अथवा पेढी द्वारकेत नव्हतीच तर सापडणार कशी ? पांथस्थ मनात समजला की, जुनागडच्या लोकांनी आणि नरसी मेहत्याने आपल्याला चांगले बनविले, आपले पैसे अक्कल खाती खर्ची पडले असे मानून तो एका पारावर हताश होऊन बसला काही वेळाने एक शेटजी तेथे आले आणि सावळा सावकाराच्या नावावर कोणी हुंडी आणली आहे का ? ह्याची चौकशी करु लागले पांथस्थाची आशा पुन्हा पालवली आणि तो पुढे झाला. सावळा सावकाराच्या रूपात आलेल्या भगवान श्रीकृष्णाने हुंडी घेऊन रक्कम अदा केली आणि बघता बघता तो गुप्त झाला हे पाहताच पांथस्थही चकीत झाला आणि

बऱ्याच वेळाने त्याला भगवताची अगाध लीला कशी असते ह्याची जाणीव झाली आपण सावळा सावकाराला साधा नमस्कारहि आपण केला नाही याचे त्याला वाईट वाटले नरसीजीच्या अपूर्व भगवद्भक्तीची महतीहि त्याला पटली आणि तो नरसीजीचा भक्त बनला दामाजीची कथा आणि ही कथा ह्यामधील विलक्षण साम्य वाचकाच्या सहज लक्षात येईल. भगवताने मानवरूपाने प्रगट होऊन भक्ताचे सत्व राखण्याचा तो काळही गेला, भगवताशी एकरूप होणारे ते भक्तही गेले आणि त्याच्या अगदी उलट परिस्थिती आपण आज पाहात आहोत

तुकाराम महाराजांनी ज्याप्रमाणे सदुपदेशाने एका वारागनेचा तिला भक्ति-मार्गाला लावून तिचा उद्धार केला, त्याचप्रमाणे नरसीजीनी चचला नावाच्या वारांगनेचा उद्धार केला

वैष्णव जन तो तेने कहिये । जे पीड पराई जाणे रे
पर दुःखे उपकार करे तो । ये मन अभिमान न आणे रे

हे नरसीजीचे उद्गार आणि

जे का रजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथची जाणावा

आणि हे तुकारामाचे उद्गार एकच अर्थ प्रगट करतात भारतातील विविधतेत प्रतीत होणारी एकता ती हीच कबीर असो की तुळशीदास असो, नरसी मेहता असो की तुकाराम असो, त्यागराज असो की ब्रम्हानद असो सगळेच सत भगवद्भक्ताच्या, विश्वबधुत्वाच्या, परोपकाराच्या मुशीत ओतलेले दिसतात भक्ती कोणत्याही देवावर असो, आचरण सर्वांचे सारखेच निष्कलक आणि परहितरत. नि:स्वार्थी सताच्या शिकवणुकीमुळेच आपला भारत अजून टिकून आहे आणि टिकून राहणार आहे भारतीय सतांच्या चरित्रांचे जाणीवपूर्वक अध्यापन शाळा शाळांतून मोठ्या उत्सुकतेने केले गेले पाहिजे. शिक्षकाच्या आणि विद्यार्थ्यांच्या आचरणात त्याचे प्रतिबिंब उमटेल इतके ते प्रभावी झाले पाहिजे असे झाले तर निराळे नीतिशिक्षण व धर्मशिक्षण देण्याची गरजच राहणार नाही

नरसी मेहता ह्याचे समाधीस्थान अगदी साधे आहे काठेवाडी पगडी घातलेली नरसीजीची छोटी प्रतिमा एका बाजूस आहे, आणि भगवान श्री-

गोपाळकृष्णांची मूर्ती मधोमध उभी आहे नरसीजींच्या चरित्रातील अद्भुत प्रसंग निवडून ते साध्या चित्रांच्या रूपाने क्रमश मांडलेले आहेत

नरसी मेहता हे चांगले संतकवि आणि कीर्तनकार होते हुमायूनच्या कारकीर्दीच्या काळांत त्यांचा जीवनग्रंथ घडला.

## गिरनार

गिरनार पर्वत ४००० फूट उंचीचा आहे. पायथ्यापासून उत्तम बांधलेल्या पायऱ्या आहेत. सुरवातीला ३–४ पायऱ्या झाल्या की, थोडा फरसबंद रस्ता (landing) नंतर पुन्हा पायऱ्या अशी रचना आहे पुढे सलग पायऱ्यांची संख्या वाढत जाते व मधल्या थांब्याची लांबी कमी होत जाते पुढे पुढे २५–३० पायऱ्यांचे जिने चढावे लागतात आणि मग लहानसा विश्रांतीचा थांबा लागतो सर्व रस्ता सुरक्षित आहे. काही भागात दोन्ही बाजूस कठडे आहेत, तर काही ठिकाणी एकाच बाजूला कठडा आहे काही ठिकाणी शेकडो फुटाचा कडेलोट होईल असा सरळ खडक कठड्याखाली आहे पायऱ्या चांगल्या ६–७ फूट लांबीच्या असून, कठीण काळवटि दगडाच्या आहेत. त्यांचा पृष्ठभाग अजून तरी गुळगुळीत झालेला नाही. प्रत्येक पायरीची उंची सहा इंचाच्या आसपास आहे ज्यांनी इतक्या उंचीचा हा रस्ता तयार केला त्यांना किती कष्ट पडले असतील आणि किती दिवस लागले असतील ते सांगणे कठीण आहे काठेवाडातील संस्थानिकांनी ह्या रस्त्यांना खर्च केला रस्ता बांधून आदमासे १०० वर्षे झाली असे समजले.

गिरनारवर चढताना पांच ठळक टप्पे पडतात पहिला टप्पा सर्वात मोठा म्हणजे ४११० पायऱ्यांचा आहे. हा टप्पा संपला की आपण श्रीनेमीनाथ जैन मंदिरापाशी येऊन पोहोचतो दुसरा टप्पा ७४० पायऱ्यांचा असून तो श्रीअंबाजीदेवीच्या मंदिराशी संपतो तिसरा टप्पा ६५० पायऱ्यांचा असून आपणांस श्रीगोरखनाथ मंदिराशी नेऊन पोचवितो. गोरखनाथ मंदिर हे गिरनारचे सर्वोच्च टोक आहे ह्याचा अर्थ असा होतो की, ५५०० पायऱ्या चढून गेले की आपण ४००० फूट उंचीवर पोचतो. पायऱ्या जरी सहा सात इंचाच्या असल्या, तरी मधले सपाट थांबेही चढायचेच आहेत. त्यामुळे ८००० ऐवजी ५५०० पायऱ्यात काम भागते चौथा टप्पा हा ७५० पायऱ्या उतरून, ७५० पायऱ्या चढण्याचा आहे हा

टप्पा आपणास श्रीदत्तात्रेयाच्या पादुकापर्यंत नेऊन पोचवितो दत्त पादुकांच्या शिखराची उंची गोरखनाथापेक्षा किंचित कमी आहे. पाचवा एक टप्पा आहे, तो ३०० पायऱ्या उतरणे आणि तितक्याच चढणे अशा स्वरूपाचा आहे तो आपल्याला श्री दत्तात्रेयाच्या धुनीपर्यंत नेऊन पोचवितो. हा टप्पा गोरखनाथ आणि दत्तपादुका ह्याच्या दरम्यान एक फाटा असावा तसा आहे ह्याचा अर्थ असा होतो की, गिरनारचे पाचही टप्पे पूर्ण करण्यासाठी ७००० पायऱ्या चढाव्या लागतात व तितक्याच उतराव्या लागतात १०,००० पायऱ्या चढाव्या लागतात हे म्हणणे खरे नाही. अर्थात आजूबाजूनी इतर मंदिरे पाहावयाचें ठरविल्यास १०,००० पायऱ्या चढाव्या लागतात हे म्हणणे सयुक्तिक होईल, पण तसे करताना कोणी दिसले नाही

काही लोक विशेषत जैन लोक पहिला टप्पा गाठून परतले. काही जण अंबाजीचे दर्शन घेऊन परतले आणखी काही गोरखनाथापर्यंत येऊन परतले बाकीचे दत्तपादुकापर्यंत गेले ७००० पायऱ्याचा चढ ही सुद्धा सोपी गोष्ट नाही आम्हाला वयाच्या पासष्टाव्या वर्षी दत्तपादुकापर्यंत जाऊन परत पायथ्यापर्यंत उतरण्यास १० तास लागले (पहाटे ४–३० ते दुपारी २–३० ) ह्यातला एक तास देवदर्शन, निसर्गदर्शन, अल्पोपहार ह्यासाठी वजा केला तरी ९ तास लागलेच आमचा १४ वर्षे वयाचा मुलगा ६ तासात परत पायथ्याशी पोचला तरुणापेक्षा वृद्धांना चढणे व उतरणे फार अवघड जाते. सुरुवातीचा वेग हळुहळू मंदावत जातो. पुढे पुढे १५–२० पायऱ्या चढून झाल्या की, विसावा घ्यावा लागतो. नतर तीन दिवस चालताना, उठता बसताना पाय चागलेच दुखतात इतके असले तरी हे सर्व कष्ट सत्कारणी लागले असे वाटते पश्चात्ताप तर मुळीच होत नाही कधी न पाहिलेले सृष्टिसौंदर्य पाहून डोळे निवतात. ज्यानी ही तीर्थक्षेत्रे इतक्या उंचीवर निर्माण केली त्याच्याबद्दल नितांत आदर वाटू लागतो शारीरिक कष्ट आपणास कितपत झेपतात ते कळून येते व आत्मविश्वास वाढतो. शभर टक्के स्वच्छ हवा कशी असते ते प्रत्यक्ष अनुभवता येते सृष्टिकर्त्याची शक्ती व किमया पाहून, आस्तिक्य बुद्धी वाढते आणि आपले स्थान ह्या अफाट विश्वाच्या पसाऱ्यात कोठे आहे तेहि उमगते

एक मनुष्य म्हणजे महासागरातला एखादा जलकण किंवा अफाट वालुकामय प्रदेशातला एखादा वालुकाकण इतक्याच योग्यतेचा असतो. ह्याचा अर्थ आपण अगदीच क्षुद्र असे मानण्याचे कारण नाही कारण महासागर झाला तरी अनेक जलकणांच्या सभाराने बनलेला असतो. जलकणच नसले तर महासागरही संभवणार नाही आणि वालुकाकण नसले तर वाळवंटही संभवणार नाही मिठाच्या कणामुळे दूध नासावे त्याप्रमाणे रावण किंवा कंस ह्यांच्यासारख्या दुरात्म्यांमुळे सबंध मानवजातीला कलंक लागतो. याच्या उलट छत्रपती शिवाजी महाराज किंवा लोकमान्य टिळकासारख्या एखाद्या युगपुरुषामुळे अगर महात्मा गांधीजीसारख्या 'स्वराज्य' संपादकामुळे सबंध समाजाची पातळी उंचावते म्हणून कोणीही स्वतःला कमी लेखू नये आणि आपली सर्वांगीण योग्यता वाढविण्याचा सतत प्रयत्न करीत रहावे अहंकाराचा स्पर्श मात्र स्वतःला कधी होऊ देऊ नये

गिरनार चढावयास पहाटे सुरुवात करणे चांगले. पहिल्या २००० पायऱ्या चढेपर्यंत दूषित हवेचा थोडा त्रास होतो कारण ह्या भागात बरीच झाडी असल्यामुळे हवेंत कर्बद्विप्राणिलवायूचे प्रमाण अधिक असते व प्राणवायूचे प्रमाण कमी असते पण तो त्रास परवडतो कारण उन्हाचा त्रास टळतो जितके उशीरा निघावे तितका पुढे जाताना आणि परतताना उन्हाचा त्रास अधिक होतो चढता-उतरताना सहा फूट लांबीची बांबूची काठी हातात असली तर तिचा आधारासाठी चांगला उपयोग होतो अशा काठ्या पायथ्याशी ६ पैसे इतके अल्प भाडे घेऊन वापरण्यासाठी मिळतात. सावकाश चढले म्हणजे दम लागत नाही २५ पायऱ्या चढून झाल्या की थोडे थांबावे व मग पुढे जावे गिरनार सफरीसाठी एक संपूर्ण दिवस राखून ठेवावा त्यामुळे सावकाश चढता व उतरता येते आणि दर्शनासाठी व निसर्ग निरीक्षणासाठी पुरेसा वेळ देता येतो थोड्या थोड्या अंतरावर चहाकॉफीची, उसाच्या रसाची,आणि फसफसणाऱ्या पेयाची दुकाने आहेत त्यांना आश्रय जरूर द्यावा. किरकोळ खाद्य पदार्थही मिळतात थंडगार पाणी ठिकठिकाणी विनामूल्य मिळते एकट्याने चढण्यापेक्षा दोघा-तिघानी गप्पा मारत चढणे कमी कष्टदायक वाटते अजून किती चढ किती शिल्लक ह्याची चौकशी करू नये त्यामुळे चढ कमी तर होत नाहीच, पण अपेक्षित उत्तर मिळाले नाही तर विरस आणि धास्ती वाटते. शिवाय

मिळणारे उत्तर बरोबर असतेच असे नाही, आणि दिशाभूल मात्र होते.

ज्याना पायी जाता येईल असा आत्मविश्वास वाटत नाही, त्याच्यासाठी डोल्या मिळतात ही डोली म्हणजे २ फूट लाब आणि २ फूट रुद अशी नवारीने विणलेली चौकट असते शिक्यासारखी ती एका मजबूत वाशाला बांधलेली असते आणि दोघे भारवाहक ती खाद्यावर वाहून नेतात. डोलीत बसणाऱ्या माणसाच्या वजनानुसार डोलीला खर्च येतो ५५ किलोग्रॅमपर्यंत वजन असल्यास रु ५२ आणि त्यापेक्षा अधिक वजन असल्यास रु. ८५ घेतात डोली वाहण्याचे काम फार कष्टाचे असते, आणि आठवड्यातून दोनदाच करणे माणसाला झेपते माणसाला माणसाने वाहून नेणे योग्य की अयोग्य हा वादाचा विषय होईल माणसानी ओढावयाच्या रिक्शा अथवा बैलगाड्या तसेच सायकल रिक्शा, डोल्या, कड्या आणि दड्या ह्या गोष्टी वाईट तर खऱ्याच, कारण त्यात माणसाला पशूच्या पदवीला पोचविले जाते परतु त्या एकदम बद केल्या तर त्याच्या आधारे उपजीविका करणाऱ्या हजारो भारवाहकांना दुसरा व्यवसाय पुरविणे अशक्य होईल, आणि त्याची उपासमार होण्याचा प्रसग ओढवेल हा व्यवसाय सुरूच होऊ देता कामा नये हे पथ्य निदान इतर ठिकाणी तरी पाळावे आणि असा व्यवसाय करणाऱ्याची सख्या वाढू देऊ नये डोलीवाल्याना गिरनार चढताना, धापा टाकताना, घामाने निथळताना पाहिले की, नरेच केला हीन कीती नर', ह्या केशवसुताच्या उक्तीची आठवण होते माणसामाणसातली विषमता कोणत्या थराला पोचू शकते, ते ह्या व्यवसायावरून दिसून येते आणि वाईट वाटते

गिरनार चढताना होणारी जिवाची त्रेधा पाहिली म्हणजे माउट एव्हरेस्ट चढून जाणारा तेनसिंग तो चढ कसा चढून गेला असेल, याचे महदाश्चर्य वाटते आणि त्याच्यासारख्या गिर्यारोहकाच्या धैर्य, चिकाटी, निष्ठा, कष्टाळूपणा इत्यादी गुणाबद्दल कौतुक आणि आदर वाटतो हिमालयाच्या खालोखाल गिरनार पवित्र मानला जातो गिरनार हा पार्वतीचा भाऊ मानतात कारण पुराणात तसा उल्लेख आढळतो शकर पार्वतीच्या विवाहप्रसगी पाहुणे म्हणून आलेल्या देवाची त्याने इतकी सुदर व्यवस्था ठेवली आणि आदरातिथ्य केले की, भगवान विष्णू अतीव प्रसन्न झाले त्यानी

गिरनारला वर दिला की, आजपासून तू सर्व पर्वतांत अधिक पवित्र समजला जाशील आणि सर्व सिद्धी तुला अंकित होतील तुझ्या परिसरात तपश्चर्या करणाऱ्यांना तपसाफल्य लाभेल. आजपासून तुला गिरिनारायण ह्या नावाने ओळखतील. गिरिनारायण ह्या नावाचा अपभ्रंश होऊन गिरनार हे नाव रूढ झाले

श्रीअंबाजी म्हणजे पार्वती गिरनारवर वस्तीला कशी आली, याबद्दल एक आख्यायिका आहे. पूर्वी पर्वताना पंख होते. पर्वत पक्षांसारखे उडू लागले म्हणजे देवादिकांना फार त्रास होई. म्हणून इंद्राने पर्वताचे पंख तोडून टाकण्याचा सपाटा सुरू केला ह्या आपत्तीला भिऊन, गिरनार समुद्रात दडून बसला पार्वतीला आपल्या भावाला भेटण्याची इच्छा झाली, पण तो तर कोठे सापडेना भगवान शंकर आणि विष्णू त्याच्या शोधार्थ निघाले अंतर्ज्ञानाने त्यांनी गिरनार कोठे लपून बसला आहे ते ओळखले पाच योजने मागे सर अशी त्यांनी समुद्राला आज्ञा केली व ती शिरसावंद्य मानून समुद्र मागे हटला गिरनार पुन्हा प्रगट झाला आणि आपला लाडका भाऊ भेटल्यामुळे पार्वतीला फार हर्ष झाला आपल्या भावाला पुन्हा कोणापासून त्रास होऊ नये व त्याचे संरक्षण व्हावे म्हणून पार्वतीने अंबाजीच्या रूपाने गिरनारवर कायम वस्ती करण्याचे ठरविले, म्हणून श्रीअंबाजीचे मंदिर तेथे आहे अंबाजीची मूर्ती भव्य आणि ठसठशीत आहे सिंदूरचर्चित मूर्तीसमोर गिरिजावाहन सिंहाची मूर्ती आहे

**गोरखनाथ चरण पादुका** – गिरनारच्या ह्या सर्वांत उंच शिखरावर योगिराज श्रीगोरखनाथ ह्यांच्या पादुका व धुनी आहे गोरखनाथ हे मच्छिंद्रनाथाचे पट्टशिष्य मच्छिंद्रनाथ स्त्रीराज्यात रममाण झाले. त्यांना शोधण्यासाठी गोरखनाथ, ' चलो मच्छिंदर गोरख आया ', असा पुकारा करीत अनेक ठिकाणी भटकले गिरनार हे स्थान तपश्चर्येला फार अनुकूल असलेले पाहून, त्यांनी तेथे अनेक वर्षे तपश्चर्या केली तेथे त्यांनी ८४ सिद्धांना आणि राजा गोपीचंद, राजा भर्तृहरी ह्यांना सदुपदेश करून त्यांचा उद्धार केला गोरखनाथ मूळचे नेपाळमधील मृगस्थलीचे ते त्यांचे मुख्य ठिकाण. नेपाळची वनाहूत त्यांनीच केली. दगडापासून त्यांनी माणसे निर्माण केली, म्हणून नेपाळी लोकांना गोरखा (गुरखा) म्हणतात नेपाळात गोरखनाथांना अजून

मोठा मान आहे. तेथील चांदीची नाणी गोरखनाथाच्या नावाची असतात आणि तांब्याची पशुपतीच्या नावाची असतात गोरखपूर हे शहर गोरखनाथाचेच एक स्मारक गोरखनाथ हे वीतरागी, ब्रम्हचारी योगी होते. कोणत्याही मोहाला ते बळी पडणार नाहीत अशी सर्वांची खात्री होती. त्यांना सर्व सिद्धी साध्य झालेल्या होत्या नाथपंथीयामध्ये गोरखनाथांचे स्थान अति उच्च आहे 'जय आलख निरंजन' ही नाथपंथीयांची घोषणा सुप्रसिद्ध आहे

**श्रीदत्तात्रेयांच्या पादुका**–श्रीदत्तात्रेय हे अत्री ऋषी आणि अनसूया ह्यांचे सुपुत्र सर्व देवामधले सद्‌गुण ज्यांच्या अंगी एकवटले आहेत असा जगदोद्धारक सुपुत्र आपल्याला व्हावा अशी अत्री–अनसूया ह्या दांपत्याची इच्छा होती त्यासाठी अत्री ऋषीनी घोर तपश्चर्या केली इंद्राला पदभ्रष्ट होण्याची भीति वाटू लागल्यामुळे, त्याने अत्री ऋषींच्या तपाचरणाची बातमी ब्रह्मा-विष्णू-महेश यांना दिली तेव्हा संतुष्ट झालेले तिघेजण अत्री ऋषीकडे आले त्या वेळी अत्री ऋषी समाधीसुखात मग्न होते म्हणून तिन्ही देवानी सूक्ष्म रूपाने त्यांच्या हृदयात प्रवेश करून, त्याना जागृत केले आणि वर माग असे सांगितले अत्री ऋषींनी तुमच्यासारखा पुत्र व्हावा असे वरदान मागितले तथास्तु असे म्हणून देव अंतर्धान पावले पुढे यथाकाल अनसूया प्रसूत होऊन, मार्गशीर्ष शुद्ध पौणिमेला दत्तात्रेयाचा जन्म झाला ब्रह्मा-विष्णू-महेश ह्या तीन देवांच्या सद्‌गुणाचे एकत्रीकरण श्रीदत्तात्रेयांमध्ये झालेले असल्यामुळे भक्तानी त्याना तीन मुखें व सहा हात बहाल केले, परंतु एकमुखी दत्त मानणारेही पुष्कळ भक्त आहेत आणि एकमुखी दत्ताची मंदिरेही आहेत.

दत्तात्रेयाच्या जन्माची आणखी एक उपपत्ती आहे व ती महाराष्ट्रात सर्वश्रुत आहे अनसूयेचे सत्वहरण करण्यासाठी आपापल्या बायकांच्या आग्रहावरून तिन्ही देव अनसूयेकडे आले अतिथी म्हणून तिने त्यांचे स्वागत केले नग्न होऊन तू आम्हांला जेवायला वाढलेस तरच आम्ही जेऊ, असा पेच त्यानी त्या महासतीला घातला अनसूयेचा आपल्या सतित्वावर इतका दृढ विश्वास होता की, काहीहि अनुचित होणार नाही, अशी खात्री बाळगून तिने त्यांचे म्हणणे मान्य केले ते पाहताच देवांनाच लाज वाटली आणि


त्यांनी बाळरूप धारण करून, अनसूयेचे मातृत्व मान्य केले देवपत्न्यांचीही चांगली फजीती झाली पुढे यथाकाल अनसूयेच्या पोटी दत्तात्रेयांचा जन्म झाला दत्तात्रेयांनी भारतभर संचार केला अनेक चमत्कार केले जन्मभराचे रोगी बरे केले मेलेले जिवंत केले श्रीदत्तात्रेयाचे भक्त महाराष्ट्रात तर अनेक आहेत श्रीदत्ताचा निवास आहे अशी श्रद्धा असलेली नृसिंहवाडी, औदुंबर, गाणगापूर ह्यासारखी क्षेत्रे आहेत गुरुचरित्रासारखा अनेकांच्या नित्य पठणात असलेला ग्रंथ आहे

दत्तात्रेयाच्या प्रमुख स्थानी दत्ताच्या पादुकांचे महत्व आहे मूर्तीचे नाही भक्तगण चांदी सोन्याचे मुखवटे बनवितात, चित्रे काढतात हे वेगळे, परंतु श्रीदत्तात्रेय म्हणजे साधेपणा, शुचिता, पावित्र्य, त्याग आणि सेवा हेच खरे श्रीदत्तात्रेय हा भक्तवत्सल आहे, करुणानिधी आहे, सर्व शक्तिमान आहे तो ब्रह्मचारी आहे तपस्वी आहे अवधूत निरंजन आहे

गिरनार चढताना पहिल्या टप्प्यावर नेमीनाथ जैनमंदिर आहे आणि इतरही अनेक जैनमंदिरे आहेत त्यांची बांधणी साधारणपणे एकाच प्रकारची आढळते गिरनारच्या छायाचित्रावरून त्यांची कल्पना सहज येऊ शकेल जैन मंदिरांत तीर्थंकरांच्या ठराविक पद्धतीच्या व एकाच तोंडवळ्याच्या मूर्ती असतात काही ठिकाणी त्या काळ्या संगमरवराच्या असतात तर काही ठिकाणी पांढऱ्या संगमरवराच्या असतात, शिखरे पांढरी शुभ्र आणि विशिष्ट पद्धतीचीच असतात तज्ञांना त्यांत फरक दिसत असतील, पण सर्वसामान्य माणसांना त्यांतील फरक जाणवत नाही जशी दक्षिणेतही गोपुरे तशीच काठेवाड आणि राजस्थानातली जैन मंदिरे बांधताना काटकसर केलेली आढळत नाही कारण जैन समाज हा धनवान आणि धार्मिक वृत्तीचा आहे कोठेही जा जैनमंदिरातील स्वच्छता आणि शांतता निरपवाद आढळते घटकाभर बसावे असे मनापासून वाटते भारतांतील इतर मंदिराच्या विश्वस्तांनी आणि यात्रेकरूंनी ह्यापासून जरूर तो बोध घ्यावा आणि आपापल्या मंदिरांची अनास्था थांबवावी

गिरनारवर अंबाजीपर्यंत धर्मशाळा आहेत, पुढे नाहीत चहा, उसाचा रस ह्यांची दुकाने आहेत गिरनारवर इतर अनेक मंदिरे आहेत, कुंडे आहेत प्रत्येकाशी निगडित असलेल्या अनेक दंतकथा आहेत, भोळ्याभाबड्या

श्रीसोमनाथ – श्रृंगारदर्शन




श्रीद्वारकाधीश, द्वारका



श्रीकृष्णाचे पायास
जेथे बाण लागला ते भल्लकतीर्थ



सोलेरिअम, जामनगर

भक्तांना भुलविण्यासाठी ह्या कथा रचलेल्या असाव्यात असे त्या वाचताना वाटते. शास्त्रीय ज्ञानाला आणि बुद्धिवादाला न पटणाऱ्या बऱ्याच दंतकथा प्रत्येक क्षेत्रात आढळतात.

गिरनार पर्वतावरून दिसणारे सृष्टिसौंदर्य अपूर्व आहे. आम्ही गेलो त्याच्या आदल्या दिवशी बराच पाऊस पडला होता. हवेत दमटपणा व धुकेहि होते ३००० पायऱ्या म्हणजे २००० फूट चढून गेल्यावर खाली पाहिले की अनेक ढग दिसू लागतात. किंबहुना ढगांतूनच आपण वरती चढत असतो. ५००० पायऱ्या म्हणजे ३००० फूट चढण झाली की आपल्या भोवती क्षितिजापर्यन्त पिंजलेल्या कापसाच्या राशी पसरल्या आहेत असे वाटते. श्वेत समुद्र किंवा क्षीरसागर जणु काय आपल्या भोवती गोठला आहे अशी जाणीव होते खाली पायथ्याशी असलेले जुनागड शहर व आपण चढून आलेली चढण अजिबात लुप्त झालेली असते, बर्फाच्छादित शिखरे आपल्याला चोहोबाजूनी घेरून टाकीत आहेत असा भास होतो. एक डोली-वाला म्हणाला, "यही हमारा हिमालय है" आम्ही हिमालयाची बर्फा-च्छादित शिखरे केदार–बद्रीनाथ यात्रेत पाहिलेली असल्यामुळे त्याचे म्हणणे कांहीसे पटले. फरक इतकाच की, गिरनारवर भासमान होणारी हिमाच्छा-दित पर्वतराजी एकाच पातळीत दिसते, तर हिमालयातील धवल शिखरे एकापेक्षा दुसरे अधिक उंचीचे अशी गगनचुंबी दिसतात. सूर्यकिरणांमुळे ह्या कार्पास राशींना एक आगळीच शोभा प्राप्त होते. ढगाचा हा समुद्र त्यांच्या हालचालींनुसार बदलतो आणि तासाभरात लुप्त होऊन सर्वत्र धुकेच धुके पसरते. आम्ही परतू लागलो तेव्हा धुके खूपच दाट झाले आणि १०० मीटर पलीकडे स्पष्ट असे काहीच दिसेनासे झाले तथापि रस्ता चांगला दिसतो आणि धोका मुळीच नसतो. आम्ही ऐन उन्हात उतरलो पण धुक्यामुळे उन्हाचा चटका जाणवला नाही इतर ऋतूंत गिरनारवरून काही वेगळी दृश्ये दिसत असतील, प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्यांची कल्पना करणे अशक्य आहे.

गिरनार चढताना आणखी एक गोष्ट ठळकपणे लक्षात येते २५०–३०० फूट उंचीचे व एका बाजूने भिंतीसारखे सपाट व गुळगुळीत काळे पहाड

आपली सोबत करतात. त्यांना वळसे घालून आपण चढत असतां वरून खाली डोकावले की सरळ खोल दरी बघून छातीच दडपते. एखाद्या अति प्रचंड गजराजाने बैठक मारली आहे असा भास होतो वरवर जावे तसतशी वृक्षराजी विरळ होत जाते पक्ष्यांची सोबत सुटते. तसे पाहिले तर गिरनार महाबळेश्वरापेक्षा उंचीला कमीच आहे परंतु महाबळेश्वराप्रमाणे वरती पठार नाही आणि चढ खडा. नेमीनाथ आणि अंबाजी येथे थोडेफार सपाट पठार आहे, परंतु गोरख टेकडी आणि दत्तपादुका हे सुळक्यासारखी खडी शिखरे पन्नासपेक्षा अधिक लोक एकदम एका ठिकाणी बसणे अशक्यच. चढणाऱ्यांना उतरण्याची घाई असते आणि त्यामुळे एकाच वेळी गर्दी अशी होत नाही पायऱ्यांवर रहदारी चालू असते चढणारे विसावा घेताना इतरांना विचारतात, चढता आहात की, उतरत आहात? उतरत आहे म्हणणारा जास्त जवळचा वाटतो कारण चढणारे आपण अगदी एकटेच नाही असा दिलासा त्या थकलेल्या भागलेल्या जीवाला वाटतो. डोली वाहणाराचे कष्ट पाहिले म्हणजे आपले कष्ट काहीच नव्हेत असेहि चढणाराला वाटते आणि त्याला उमेद येते. गुरुदेव दत्त, जय सीताराम अशा घोषणा अधून मधून ऐकू येतात फारच थकलेला प्रवासी आता किती पायऱ्या शिल्लक आहेत असे उतरणाऱ्याला विचारतो आता अगदी नजीक आहे असे उत्तर आले की त्याला बरे वाटते. पण अजून पुष्कळ दूर आहे असे उत्तर आले की तो चिंतातूर होतो. जाववेल तितकेच जायचे असे आम्ही योजले होते पहिला नेमीनाथ मंदिरापर्यंतचा टप्पा गाठतानाच पाय दुखू लागले. वाटले, एथेच थांबावे, पण कोणी म्हणाले, अंबाजीपर्यंत तरी जा, [illegible] अंबाजीपर्यंत गेलो. तेथून गोरखनाथ शिखर आणि दत्तपादुका शिखर ह्यांचे दुरून दर्शन [illegible]

सहज जाऊ शकाल असे कोणी तरी म्हणाले आणि आम्ही पुढे निघालो गोरखनाथाचे दर्शन घेतल्यावर पाहतो तो दत्तपादुका अगदी जवळ आणि तितक्याच उंचीवर असल्याचे दिसून आले. दोन्ही शिखरांमधले सरळ अंतर ( as the crow flies ) फर्लांग दीड फर्लांगच असावे, परंतु आम्हीं पक्षी नसल्यामुळे ह्या ज्ञानाचा काहीच उपयोग नव्हता. दत्त पादुकापर्यंत जायचे म्हणजे ७५० पायऱ्या उतरणे आणि तितक्याच चढून जाणे आणि

परततांना पुन्हा ७५० पायऱ्या उतरणे व ७५० चढून जाणे आवश्यक असल्याची माहिती मिळाली. वाटले प्रथम ७५० पायऱ्या उतरावयाच्या आहेत. हे काही कठीण नाही त्या उतरलो, पण पुढच्या ७५० पायऱ्याचा चढ जेव्हा पाहिला तेव्हा थोडा वेळ मन द्विधा झाले. इतका खटाटोप केवळ ७५० पायऱ्यासाठी दत्तजयंतीच्या दिवशी दत्तकृपेने होणारे दत्तपादुकांचे पवित्र दर्शन टाळणं हे बरे नव्हे हा विचार अखेर प्रभावी ठरला आणि अतिशय कष्टाने त्या पायऱ्या चढून गेलो पादुकांच्या दर्शनाने आणि सृष्टिसौंदर्याने मन संतुष्ट झाले थंडगार पाणी पिऊन पुन्हा ७५० पायऱ्या उतरलो तो ७५० पायऱ्याचा चढ दत्त म्हणून पुढे उभा. पण आता माघार घेणे शक्य नव्हते सावकाश प्रत्येक २०–२५ पायऱ्या झाल्या की, थांबून विसावा घेत पुन्हा गोरखनाथ शिखर गाठले आणि सुटकेचा सुस्कारा सोडला आता केवळ उतारच ह्या विचाराने बरे वाटले. परंतु दमलेल्या पायांना उतरणेही चांगलेच जड जाते हा अनुभव आला जितका वेळ चढायला लागला तितकाच वेळ उतरावयासाठीही लागला पहाटे ४–३० वाजता निघालेलो आम्ही दुपारी २–४५ ला पायथ्याशी आलो, जलपान आणि चहापानासाठी लागलेला वेळ वजा केल्यास आम्हाला प्रत्यक्ष चढण्या उतरण्यासाठी लागलेला वेळ नऊ तास भरला म्हणजे दर ताशी आम्ही १००० पायऱ्या चढलो असे झाले. हा सर्व तपशील लिहिण्याचा हेतु एवढाच की, गिरनारचढ म्हणजे फार अवघड आहे असे कोणी मानू नये आम्ही वयाच्या पासष्टाव्या वर्षी आणि शरीरप्रकृति बेताची असताना जर गिरनार चढू शकलो तर ४०–५० शीच्या तरुणांना ही गोष्ट मुळीच कठीण वाटण्याचे कारण नाही अमुक इतक्या वेळातच चढले पाहिजे असे कोणतेही बंधन नसते सकाळी ५वाजता निघावे आणि सबंध दिवस मोकळा ठेवावा म्हणजे संध्याकाळी दिवे लागणीपूर्वी परत मुक्कामी येता येईल गिरनार म्हणजे निसर्गाचे एक लहानसे आव्हान आहे ते अवश्य स्वीकारावे तेनसिंग २९२०० फूट उंच कसा चढून गेला असेल, ह्याचा विचार करावा हिमालयात काही उत्तम बांधणीच्या पायऱ्या नाहीत सरळ कडे चढावे लागतात आणि तेहि अखंडपणे बर्फाच्छादित त्या मानाने गिरनारचा चढ म्हणजे आपल्या घरातला एखादा जिना चढण्यासारखेच होय आमच्या बरोबरचे काही लोक जुनागड स्टेशनवर मुक्काम

ठोकून राहिले, काही अबाजीपर्यंत यऊन परत फिरले. बरेचसे डोलीत बसून दर्शन घेऊन आले प्रत्येकाच्या काही अडचणी असतीलही. परतु ज्यांनी इतक्या जवळ जाऊन गिरनार पाहिले नाही, त्यांनी एक चांगली संधी गमावली हे खचित

पुढे चार दिवस उठता बसताना, चढता–उतरताना गुढघ, मांडचा, पोटऱ्या आणि पावले दुखली हे खरे. पाय शेकले व रगडले म्हणजे पुष्कळ बरे वाटते शिवाजी महाराजाचे रायगड, सिंहगड चढणारांना गिरनार अवघड वाटण्याचे मुळीच कारण नाही गिरनारला जावयाचे तर शक्य तर वयाला ५० वर्षे पूर्ण होण्यापूर्वी जावे. त्या वयांत जोम, उत्साह आणि जिद्द जिवत असते निदान असावयास हवी

पावसाने आमच्यावर मोठी कृपा केली. आदल्या दिवसापासून हवा पावसाळी असल्यामुळे भिती वाटत होती, परतु तसे घडले नाही. तथापि गिरनार पर्वत चढणाऱ्याची ये जा वर्षभर चालू असते असे चौकशीअती समजले.

गिरनार, जुनागड, सोमनाथ पाकिस्थानातच जावयाचे, परतु आपले नशीब बलवत्तर म्हणूनच कै सरदार पटेलांना हा भाग भारतात ठेवण्यात यश मिळविता आले हैदराबाद संस्थान काबीज करून आणि आध्र व महाराष्ट्रात वाटून देऊन, चार ज्योतिर्लिंगे वेरूळ, अजिठयाची लेणी, कै. वल्लभभाईंनी भारतातच सुरक्षित केली

हे त्याचे हिंदु, जैन आणि बौद्धांवर अनत उपकार आहेत ह्या सर्व स्थानाचे पावित्र्य टिकविणे व वाढविणे, त्यांना भेटी देऊन त्यांच्या देखभालीला आर्थिक सहाय्य देणे, त्यांच्यापासून स्फूर्ती घेऊन राष्ट्रोद्धाराच्या कामी त्याचे महत्त्व देणे हे प्रत्येक भारतीयाचे पवित्र कर्तव्य आहे.

— —

## प्रकरण ६.

# ज्योतिर्लिंग श्रीसोमनाथ

प्रभासपट्टण अथवा सोमनाथ येथे आम्ही दि. १७-१२-६७ रोजी सकाळी पोचलो प्रभासपट्टण हे गाव वेरावळ स्टेशनपासून तीन मैलावर आहे जुनागड जिल्ह्यातला वेरावळ हा एक तालुका आहे वेरावळ हे प्राचीन काळापासून प्रसिद्ध असलेले एक बंदरही आहे. परंतु अद्याप ह्या बंदराचा विकास झालेला नाही. मुख्य म्हणजे आगबोटी लागतील असा धक्का नसल्यामुळे, बोटी किनाऱ्यापासून दोन मैलांवर उभ्या राहतात आणि पडावाने उतारूंची व मालाची वाहतूक करावी लागते दर बुधवारी मुंबई-हून वेरावळला जाणारी उतारू बोट निघते. वेरावळपर्यंत पोचण्यास २४ तास लागतात, परंतु किनाऱ्यापर्यंत दोन मैल जाणे फारच त्रासाचे होते असे समजले.

भारतात बारा ज्योतिर्लिंगे आहेत १. सौराष्ट्रात सोमनाथ, २. श्रीशैल्य मल्लिकार्जुन आंध्र राज्यात, ३ मध्यभारतात उज्जैनीस महांकाळ, ४. मध्य-भारतात खांडवा-इंदोर रस्त्यावर नर्मदा तटाकी ओंकारेश्वर, ५. मराठ-वाड्यात परळी येथे परळी-वैजनाथ, ६ पुणे जिल्ह्यात भीमाशंकर, ७. भारताच्या दक्षिण टोकाजवळ श्रीरामेश्वर, ८ मराठवाड्यात औंढा गावी औंढा नागनाथ, ९ श्रीक्षेत्र वाराणसी येथे विश्वनाथ, १० नासिकजवळ त्र्यंबकेश्वर, ११. हिमालयात केदारनाथ आणि १२ मराठवाड्यात औरंगाबाद जवळ घृष्णेश्वर

बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घ्यावे असे गेली ३० वर्षे मनात होते आत्ता-पर्यंन्त अकरा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घडले होते सोमनाथ तेवढे शिल्लक राहिले होते त्याचे दर्शन घेण्याचा योग दि १६, १७, १८, असे तीन दिवस आला आणि मनाला आनंद झाला. ह्या तीन दिवसांत एक सोमवार आल्यामुळे विशेष समाधान झाले.

सोमनाथ मंदिराचा इतिहास रोमहर्षक आहे. नवीनच बांधलेल्या सोम-

नाथ मंदिराचे दर्शन घडताच डोळ्यांचे पारण फिटले. मंदिर फारच सुंदर, प्रशस्त आणि भव्य आहे अगदी समुद्राच्या काठी आहे. शांत आहे, स्वच्छ आहे, पवित्र आहे.

हे नवीन मंदिर पूर्वीच्याच जागी डौलाने उभे राहिलेले पाहून, आपल्या कबरीत चिरनिद्रा घेत असलेल्या गझनीच्या महमुदाची झोप उडाली असेल, असा विचार मनात येतो भारताच्या अस्मितेचे, जिवंतपणाचे जणु प्रतीकच असे हे मंदिर वाटते धन्य कै. सरदार वल्लभभाई पटेल आणि त्यांना साथ देणारे कै. काकासाहेब गाडगीळ ह्यांच्यासारखे त्यांचे सहकारी सरदार पटेलांनी मनावर घेतले म्हणून ह्या मंदिराची कल्पना सत्य सृष्टीत उतरली. नवानगरच्या जामसाहेबांनीहि मोठा पुढाकार घेतला आणि द्रव्य-सहाय्य मिळविले

सोमनाथाचे मंदिर पूर्वाभिमुख आहे. पश्चिमेला आणि दक्षिणेला समुद्र आहे उत्तरेला प्रभासपट्टण गाव आहे, पूर्वेला स्टेशनकडे जाणारी सुंदर सडक आहे मंदिराला तीन भव्य प्रवेशद्वारे आहेत. फक्त पश्चिमेला प्रवेशद्वार नाही. मंदिर तिमजली असून, वर मोठा कळस आहे कळसाच्याहीवर ध्वज-स्तंभावर रेशमी पताका फडकत असते. प्रवेशद्वारावर सुंदर नक्षीकाम केलेले आहे आणि देवदेवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत आतील खांबही प्रमाणबद्ध असून, साधे पण सुंदर आहेत. सर्व बांधकाम वालुकाअश्मात केलेले आहे आतील फरसकाम संगमरवरी दगडाचे आहे. पायऱ्या संगमरवरी दगडाने मढविलेल्या आहेत

सोमनाथ मंदिराचे बांधकाम भग्न मंदिराचे जे अवशेष सापडले, त्यावरून त्याबरहुकूम करण्याचा प्रयत्न केलेला आहे असे समजले. मंदिर भव्य असूनही अतिशय प्रमाणबद्ध आहे नक्षीकाम पुष्कळ असूनही भडकपणा कोठेही नाही.

मंदिराचा गाभारा खूपच प्रशस्त असून, सांबाची पिंडी तीन फूट उंचीची आणि सव्वा फूट रुंदीची काळ्या पाषाणाची आहे त्याच प्रमाणात शाळुंकाही प्रशस्त आहे. गाभाऱ्यात पुजाऱ्यांनाच प्रवेश आहे. इतरांना बाहेरून दर्शन घ्यावे लागते, पण गाभाऱ्यात भरपूर प्रकाश, मोठी मूर्ती आणि विशाल प्रवेशद्वार ह्यामुळे ते दुरूनही मनासारखे होते, आणि मनत तृप्त

होतो. सर्वमंदिरभर विजेचा लखलखाट असतो सोमनाथाच्या पिंडीमागे आदिशक्ती पार्वतीची सालंकृत सुबक मूर्ती आहे तिच्या उजव्या हाताला चतुर्मुख ब्रह्मदेवाची आणि डाव्या हाताला भगवान विष्णूची मूर्ती आहे मंदिराच्या प्रवेशद्वारातून आत पाऊल ठेवताच डावीकडे श्री गजाननाची आणि उजवीकडे श्री मारुतीची मूर्ती शुभ्र संगमरवरी पाषाणाच्या आहेत. पिंडीच्या मागे सोमनाथाचा चांदीचा मुखवटा आहे आणि त्यावर छाया धरणारी चांदीची शेषाची मूर्ती आहे सायंकाळच्या आरतीच्या वेळी हा मुखवटा शेषासह पिंडीवर चढवितात तुपाच्या दिव्यांची प्रभावळ झळकू लागते आणि एकंदर दृश्य फार सुंदर दिसते

सकाळी ७ वाजता, दुपारीं १२ वाजता आणि सायंकाळी सूर्यास्ताबरोबर अशी तीनदा आरती होते. सूर्यास्त प्रेक्षणीय असतो आरती साधारण १० ते १५ मिनिटे चालते आणि मंत्रपुष्प झाल्यावर संपते संध्याकाळच्या आरतीला भक्तवृंद बराच असतो. कोणीहि पैसे मागत नाही इच्छा असेल ती भेट पेटीत टाकावयाची असते

दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना सव्वा रुपया खर्चून एक आवर्तन करविता येते. साडेतीन रुपयांत अभिषेक होतो. साडेपाच रुपयांत पंचामृती संपुट-पूजा करविता येते आणि व्यायशीं रुपये दिल्यास महापूजा बांधविता येते. लघुरुद्र, महारुद्र, हेहि करवता येतात विशेष म्हणजे सक्ती कोणीच करीत नाही, इच्छा असेल त्याने पुजाऱ्याला सांगावयाचे म्हणजे व्यवस्था होते. दोन हस्तक आणि तिसरे मस्तक जुळवून मनःपूर्वक नमस्कार केला तरी चालते केलेल्या धर्मकृत्याबद्दल पावती मिळते. वासुदेव सदाशिव मोढे, ह्या नावाचे एक मूळचे महाराष्ट्रीय गृहस्थ गेल्या सात पिढ्या सोमनाथाचे एक पुजारी आहेत. घरात मराठीच बोलतात. मोठे सात्विक वृत्तीचे सज्जन आहेत यात्री सांगेल ते धर्मकृत्य करण्याची व्यवस्था करून देतात भीक मागून जगणारे लोक सोमनाथ येथे फार कमी आढळतात.

प्रभासपट्टण हे गाव महाभारत कालापासून प्रसिद्ध आहे भगवान श्रीकृष्णांनी ह्याच पवित्र वास्तूत देहोत्सर्ग केला. शेषावतार बळराम ह्यांनी ह्याच ठिकाणी पाताळात गमन केले हिरण्या, कपिला आणि सरस्वती ह्या नद्यांचा संगम येथे आहे. तेथे ससंकल्प स्नान करून, मग यात्रेकरू सोम-

नाथाच्या दर्शनाला जातात जुन्या सोमनाथ मंदिराचे अवशेष जमा केलेले एक म्युझियम आहे पाषाणावर किती लीलेने त्यावेळचे कारागीर खोदकाम करीत ते प्रत्ययाला येते. ज्या जागी हें पदार्थसंग्रहालय आहे, तेथे पूर्वी मशीद होती आणि मुसलमानांनी तेथे असलेले सूर्यमंदिर उध्वस्त करून मशीद बांधली असे सांगतात एक लहानसे सूर्यमंदिर पूर्वेला ३ फर्लांगांवर आहे.

सोमनाथ मंदिर वेदकालापासून प्रसिद्ध आहे असे मानले जाते वेदकाळी सोमराजाने सुवर्णमंदिर बांधले पुढे त्याचा नाश झाला त्रेतायुगांत शिवभक्त रावणाने रौप्य मंदिर बांधले पुढे महाभारत काळात भगवान श्रीकृष्णाने चंदनाच्या लाकडाचे मंदिर बांधले तेहि कालांतराने नष्ट झाले आणि नंतर भीम नावाच्या राजाने दगडी मंदिर बांधून जीर्णोद्धार केला. त्या काळी सोमनाथ मंदिर अत्यंत पवित्र आणि अत्यंत श्रीमंत होते. सोमनाथाची पिंडी अधांतरी बिनाआधार लोंबत असे अशीहि वर्णने आहेत तळघपोशीत भला मोठा लोहचुंबक असावा अशीहि वर्णने आहेत. पिंडी लोहाची असावी अथवा ह्याच्या उलट परिस्थिती असावी असेहि म्हणतात. महमुदाने भाला फिरवून पिंडी खरोखरच अधांतरी आहे का ते पडताळून पाहिले असेहि सांगतात भक्तांनी अनेक शतकांत वाहिलेल्या रत्नांचा, सुवर्णाचा, रुप्याचा फारच मोठा संग्रह सोमनाथ येथे होता. कोट्यावधी रुपये किमतीचे ते धन होते.

भारतापासून १४०० मैल अंतरावर असलेल्या गझनीच्या महमदाने इ स १००४ ते इ स १०२५ ह्या काळात भारतावर एकूण १८ स्वाऱ्या केल्या आणि अपार लूट मारली त्याच्या अठराव्या स्वारीत ३० जानेवारी १०२५ रोजी तो सोमनाथला येऊन पोचला. त्या वेळी सोमनाथाभोवती किल्ला बांधलेला होता महमदाला कडवा प्रतिकार झाला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही पुजाऱ्यांनीहि मूर्ती वाचविण्याच्या प्रयत्नांत आत्म-बलिदान केले

महमदाने अमानुष क्रौर्याने आडवे येणाऱ्या त्यांना कापून काढले. पिंडीवर प्रहार करून तिचे तुकडे केले पिंडीखालील भुयारांत शतकानुशतके संग्रहित केलेली दौलत बाहेर काढली १५ कोटी रुपये किमतीची ती दौलत होती. हिरे, माणके, मोती व इतर रत्ने लादण्यासाठी नऊ उंट लादण्यांत

आले, सैन्याने गावही लूटून नेले गुजराथचा त्यावेळचा राजा भीम महंमदाला भिऊन कच्छमध्ये पळून गेला. ही सर्व लूट कच्छच्या रणांतून परतताना त्याचे व त्याच्या सैन्याचे हाल झाले. त्याने नेलेल्या लुटीतला काही भाग व्रजदेव राजाने लुटला. पण ही लुटीतली लूट पुन्हा सोमनाथाला कधी परत आली नाही

महमदाने लिंगाचे चार तुकडे केले दोन मदीना आणि मक्का येथें पाठविले आणि दोन गझनीला जुम्मा मशिदीत दारापुढे ठेवले असे वर्णन इतिहासकारांनी केले आहे चंदनी दरवाजे नेले. काहीच्या मते लिंगाचा नाश झालाच नाही पूजाऱ्यांनी ते लपवून ठेवले महमदानतर सोमनाथ मंदिर हिंदु राजे आणि जनता ह्यांच्या प्रयत्नाने पुन्हा उभे राही व मुसलमानी राजे त्याचा पुन्हा विध्वंस करीत.

इ. स. १७८३ मध्यें इंदूरच्या पुण्यश्लोक राणी अहिल्याबाई ह्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. त्यांनी नवीनच मंदिर जवळ बांधले व तेथे मूळच्या लिंगाची स्थापना केली. हे लिंग त्यांनी तळघरांत स्थापन केले आणि बाहेर दुसरे एक तसलेच लिंग तयार करवून घेऊन बसविले त्यांनी एक धर्मशाळाही बांधविली मंदिराचा जीर्णोद्धार करावा अशी आज्ञा भगवान सोमनाथांनीच त्यांचे स्वप्नात येऊन दिली होती असेही म्हणतात. अहिल्याबाईनी बांधविलेले मंदिर मुख्य मंदिरापासून फर्लांगभर अंतरावर आहे व तेथेही पूजा, नंदादीप वगैरेची सोय केलेली आहे.

देहोत्सर्ग– त्रिवेणी संगमाच्या उत्तरेला फर्लांगभर अंतरावर देहोत्सर्गाची पवित्र जागा आहे एका लहानशा चौथऱ्यावर भगवान श्रीकृष्णांच्या पादुका आहेत. तेथेच एक पिंपळ आहे. स्थान हिरण्यानदीच्या काठी आहे. ह्या ठिकाणी श्रीकृष्णाने पार्थिव देहाचा त्याग केला आणि येथेच त्या देहाचे दान झाले. परमेश्वराने मानव रूपाने अवतार घेतला म्हणजे त्याला जन्ममरण, आधिव्याधी, संसारातील सुखदुःखे ह्यांना तोंड द्यावेच लागते श्रीरामाला वनवासाला जावे लागले आणि परत आल्यावर सीतेचा त्यागही करावा लागला माणसात राहावयाचे तर माणसांप्रमाणे वागावे लागते देहोत्सर्ग हे स्थान रमणीय आहे व तेथें श्रीकृष्णाबद्दलचा माणसाचा आदर वाढतो.

बलराम गुंफा–देहोत्सर्गापासून अगदी जवळ बलराम गुफा आहे तेथे

भिंतीवर शेषाचे चित्र आहे. बलरामाने ह्या ठिकाणी आपला मानवी अवतार संपवला आणि शेषाच्या रूपाने पाताळात प्रवेश केला. बलराम हा शेषाचा अवतार होता

**गीतामंदिर**–शेजारीच सुंदर व प्रशस्त कृष्णमंदिर आहे. त्यालाच गीता-मंदिर असेहि म्हणतात. तेथील प्रत्येक खांबावर एक असे भगवत्‌गीतेचे अठरा अध्याय संगमरवरी दगडावर सुबकपणे कोरलेले आहेत.

**भल्लकतीर्थ**–सोमनाथाहून वेरावळला जाताना मैलभर अंतरावर भल्ल-कतीर्थ आहे अवतारकार्य समाप्तीनंतर भगवान श्रीकृष्ण एका झाडा-खाली विसावत असताना, एका भिल्लाने मारलेला बाण त्यांच्या पायाला लागला व ते जबर जखमी झाले. आपली जखम ज्या कुंडात त्यांनी धुतली तेच भल्लक तीर्थ भिल्लाने बाण मारला तो भगवंताचे सुंदर डोळे पाहून त्याला हरिणच बसलेले आहे असे वाटले म्हणून भगवंतांच्या हरिणा-सारख्या डोळ्यामुळे त्याला असे वाटले की घन:श्याम वर्णामुळे वाटले ते कसे समजणार ? पुराणातील कथेनुसार हा भिल्ल म्हणजे रामायणांतील सुप्रसिद्ध वाली हा वानर राजा होता प्रभू रामचंद्राने वालीचा वध केला तो असमर्थनीय होता वालीनें रामाचा कोणताही अपराध केलेला नव्हता. ह्या वधाचा बदला तुला माझ्या कृष्णावताराच्या समाप्तीच्या वेळी घेता येईल, असे अभिवचन वालीला श्रीरामाने दिले होते तो बदला वालीने श्रीकृष्णाच्या पायाला जीवघेणा बाण मारून घेतला. अन्यायाचे परिमार्जन परमेश्वराला देखील टाळता येत नाही. कारण एखाद्या विनापराधी व्यक्तीला केलेली शिक्षा सर्वस्वी असमर्थनीयच असते भल्लक तीर्थाशेजारी एक मंदिर आहे तेथे भगवान कृष्णाची पूर्णाकृती देखणी मूर्ती विश्रांती घेत असलेली दाखविली आहे त्यांना बाण मारणारा भिल्ल क्षमा याचना करीत खाली बसलेला आहे.

**प्राची**–सोमनाथपासून २० मैलांवर प्राची तीर्थ आहे. प्राची म्हणजे पूर्वदिशा, ह्या ठिकाणी सरस्वती नदी पूर्ववाहिनी आहे म्हणून तिला विशेष पावित्र्य प्राप्त झाले आहे

भारतीय युद्धात कौरवांची हत्या झाल्यामुळे पांडवांच्या हातून गोत्रज-वधाचे महत्पातक घडले. त्या पापापासून मुक्त होण्यासाठी पूर्ववाहिनी

सरस्वती नदीत पिंडदान करण्याचा सल्ला श्रीकृष्णाने दिला आणि पांडवांना प्रभासपट्टण येथे पाठविले पांडवांनी त्यानुसार प्राची येथे येऊन सर्व मृत गोत्रजांना पिंडदान देऊन तर्पण केले व त्यांना स्वर्गाचा मार्ग खुला करून दिला, आणि ते स्वतःही पापमुक्त झाले. प्राची येथे मोक्षपिंपळ आहे त्याला पाणी घातले की, ते पितरांना पोचते अशी भाविकांची श्रद्धा आहे.

प्राचीचे महत्त्व किती आहे हे दर्शविणारी एक गुजराथी म्हणच आहे. ' सोवार काशी और एकबार प्राची ' एकवेळ प्राचीला जाणे म्हणजे शभर वेळां काशीला जाण्याइतके पुण्यप्रद आहे प्राचीच्या आसमंतात अनेक लहान सहान मंदिरे आहेत, वटपिंपळाचे वन आहे. स्थान रमणीय आहे वानर पुष्कळच आहेत आणि हातातून शेंगा घेऊन खातात आक्रमक वानर आढ-ळले नाहीत

गोरख मढी–सोमनाथ प्राची रस्त्यावर गोरखमढी म्हणजे गोरख-नाथांची गुफा आहे. नाशिकच्या सीतागुफेसारखीच ही गुफा आहे. खाली बसून आत उतरावे लागते, आत काळोखच असतो, पण नंदादीपाच्या प्रकाशात श्रीगोरखनाथांचे दर्शन होते. येथे गोरखनाथांनी तपश्चर्या केली. ही गुफा नदीच्या पात्राला लागून आहे शेजारी महंताचा मोठा वाडा आहे.

जुनागड-गिरनार, वेरावळ-सोमनाथ हा सौराष्ट्राचा भाग प्रत्येक भार-तीयाने अवश्य पाहवा असा आहे आणि ह्या प्रवासाला मार्गशीर्ष महिना हा उत्तम थंडी नाही, उन्हाळा नाही, सुंदर वनश्री, पाण्याची विपुलता ह्या अनुकूल गोष्टी. पाहावे तिकडे हिरव्या गालीच्यासारखी सुंदर शेते पाहून मन प्रसन्न होते बाजरी हे मुख्य धान्य भुईमूग, कांदे ही पिकेही महत्त्वाची. इतर पिके त्या मानाने कमी सोमनाथ येथे गोडे तेल रु २.८१ ला लिटर अशा भावाने मिळत होते. बाजरी, तांदूळ, गहू, ज्वारी, ह्यांचे भाव मात्र आपल्याकडच्या सारखेच आढळले ह्या भागांत २० किलोचे भाव सांगतात. उसाचे उत्पादनही वाढत आहे. कोडीनार येथे फार मोठा साखर कारखाना आहे वेरावळ हे मत्स्योत्पादनाचे मोठे केंद्र आहे आणि मासळी मुबलक मिळते सर्वांनी मासे खावे, मासे हे फार उत्तम अन्न आहे, असा प्रचार अधिकृतपणे केला जातो. खुल्या बाजारात सर्व धान्ये मुबलक मिळतात.

वेरावळ–सोमनाथ ह्या भागात मुसलमानांचा वरचष्मा बराच आढळतो.


खुद्द सोमनाथ येथे मुसलमान वस्ती ७००० आहे व हिंदु वस्ती ५००० आहे. नगरपालिकेत मुसलमानांचेच बहुमत असते. बहुसंख्यलोक गरीबच आढळतात खुद्द काठेवाडी शेतकरी–कामकरी विशिष्ट तऱ्हेचा फेटा घालतात कबरेपर्यंत पोचणारो चण्याचुण्यांची बंडी आणि खूपशी सैल अशी सुरवार हा पुरुषांचा पोषाख. स्त्रिया घागरा नेसतात आणि वर ओढणी व चोलका असतो. कापड जाडे भरडेच असते आंग्लविद्याविभूषित लोक पाश्चात्य पोशाख करतात व शाळकरी मुली स्कर्ट घालतात. लोक स्वभावाने सौम्य, सौजन्यशील आहेत भाषा आदबशीर. आरडाओरडा, भांडणतंटा आढळला नाही. सर्वसामान्य कामकरी माणूस अल्पसंतुष्ट, श्रद्धाळू, समाधानी आणि देवभोळा असतो भूमी सर्वत्र सपाट आणि जमीन सुपीक आढळते आगगाडीतून प्रवास करताना टेकड्या, डोंगर क्वचीतच दिसतात. काही ठिकाणी स्त्रिया मालाची गाडी ओढतानाही आढळल्या. शेतात राबणाऱ्याही अनेक भगिनी आढळल्या आपण अगदी परक्या मुलखात आलो आहो असे वाटत नाही. फरक काय तो पोषाखात. हीच विविधतेतील एकता

---

# पश्चिम भारताचे दर्शन

## ( सौराष्ट्र व राजस्थान )

# यात्रेचा मार्ग



## प्रकरण ७

# जामनगर आणि द्वारका

वेरावळ–राजकोट–जामनगर मार्गे आम्ही दि २० रोजी दुपारी जामनगरला धावती भेट देऊन रात्री ८ वाजता द्वारकेला येऊन पोचलो, आणि देवीभवन धर्मशाळेत मुक्कामाला उतरलो.

जामनगर ही पूर्वीच्या नवानगर संस्थानची राजधानी जामनगरच्या जामसाहेबानी सोमनाथ मंदिराच्या बांधकामाच्या बाबतीत मोठा पुढाकार घेऊन, सरदार वल्लभभाईंना चांगली साथ दिली, ह्याचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे

जामनगर– हे मोठे आणि सुंदर शहर आहे उत्तम रस्ते, प्रशस्त चौक, वाहनाची विपुल सोय, भली मोठी बाजार पेठ, मिश्रधातूच्या सुंदर वस्तूचे कारखाने, बांधणी नायाच्या साड्यांचे निर्मिती केन्द्र, आयुर्वेदीय औषधाचे कारखाने इत्यादि अनेक गोष्टींसाठी ते प्रसिद्ध आहे तेथील जैनमंदिर कमला नेहरू उद्यान, भीडभजन महादेव, गायत्री मंदिर, लाखोटा तलाव, लक्ष्मीनारायण मंदिर ही ठिकाणे प्रेक्षणीय आहेत

जामनगरमध्ये दोन गोष्टी अगदी नवीन आणि विशेष प्रेक्षणीय आहेत (१) सोलेरियम (सूर्यस्नान आरोग्यधाम) आणि (२) मणीभाई सुखधाम.

सूर्य प्रकाशामुळे अनेक रोग बरे होतात असा प्राचीन काळापासूनचा लोकांचा अनुभव आहे. सूर्यप्रकाशाच्या अभावी मानवादि प्राण्याची आणि वनस्पतींची वाढ खुंटते सूर्यकिरण जीवनसत्वेंही पुरवितात सूर्यापासून अनेक प्रकारचे प्रकाशकिरण भूतलावर येतात. त्यातले विशिष्ट किरण विशिष्ट रोगांवर लागू पडतात ह्या सिद्धान्ताचा अभ्यास करून त्याचे एक शास्त्र बनविले आहे आणि सूर्यस्नानोपचाराची तीन केंद्रे जगात स्थापन झालेली आहेत जामनगरचे सूर्यस्नानगृह हे भारतातले एकमेवाद्वितीय केंद्र आहे. ह्या केंद्रातल्या मधल्या तिमजली भागावरील वरचे दोन मजले वर्तुळाकार

फिरविता येतात आणि काचेच्या रंगीत तावदानातून हव्या त्या कानाचे, हव्या तितक्या तीव्रतेचे आणि हव्या तितक्या प्रमाणात सूर्याचे किरण रोग्याच्या दूषित भागावर पाडता येतात मुडदूस, हत्तीपाय, त्वचारोग, गंडमाळा व अस्थिक्षय हे क्षयरोगाचे प्रकार, लहान मुलांचे विशिष्ट रोग इत्यादींवर येथे उपचार केले जातात असे तेथील छायाचित्रे पाहून लक्षांत येते छायाचित्रांतले व्याधिग्रस्त रुग्ण पाहून मनाला फार वाईट वाटते. वैद्यकीय ज्ञान तर वाढते आहे, पण रोग्यांचे प्रमाण मात्र घटताना दिसत नाही कोणाला कोणता रोग केव्हा होईल ह्याचा नेम राहिलेला नाही बालकांपैकी दोनचार रुग्ण प्रत्यक्ष पाहून तर फारच वाईट वाटले बालरुग्णाला दररोज रुग्णालयांत आणावयाचे, त्याचे हाल पाहवयाचे व त्याला परत न्यावयाचे म्हणजे एक दिव्यच रुग्ण बरा झालाच-तर आई आजारी पडायची अशी स्थिति, तथापि इतर कोठे उपलब्ध नसलेली सोय जामनगरला आहे हेहि थोडे नाही येथे येणारे रुग्ण किती प्रमाणांत आणि किती वेळात बरे होतात ह्याची माहिती मिळाली नाही. ज्यांचा रोग फार पुढे गेला आहे असेच रुग्ण औषधोपचारासाठी येतात आणि त्यामुळे यश येत नाही असेच बहुधा घडते

(२) माणेकबाई मुक्तिधाम-नावावरून ह्या स्थळाच्या बाबतीत प्रवाशाची कल्पना होईल की, हे एखादे उपहारगृह किंवा उद्यान असावे, परन्तु हे जामनगर येथील हिंदूंच्या दहनभूमीचे, स्मशानाचे नाव आहे प्रवेश करतांच थोर संतांचे, पुढाऱ्यांचे, अवतारी पुरुषाचे, हुतात्म्यांचे पुतळे आणि त्या खाली सुंदर बोधवचने दृष्टीस पडतात हे एक उद्यानच आहे असे वाटते ज्यांनी मृत्यूला मित्र मानले, सुखदाता मानले, कस्पटासमान लेखले त्यांचे दर्शन मनाला आनंद देते स्मशानाची भयानकता, ओंगळपणा, सौंदर्याचा अभाव नष्ट करण्याचा हा एक जाणीवपूर्वक केलेला प्रयत्न आहे व तो बऱ्याच अंशाने सफल झालेला आहे उद्यान संपले की वर छप्पर असलेला पक्का ओटा आहे तीच दहनभूमी एकाच वेळी चार दहनक्रिया करण्याची सोय तेथे आहे पाण्याचे नळ आहेत बरोबर आलेल्यांना निवांत बसण्यास जागा आहे. मृत्यु हा जन्माइतकाच अटळ आहे जन्मलेल्या माणसाने, त्याची भीती बाळगणे आणि इतरांनी मृताबद्दल शोक करणे हे


अज्ञानाचे लक्षण आहे. मानवाचा जन्म दुसऱ्याला जगाला देण्यासाठी आहे घेण्यासाठी नाही देण्यासारखे जवळ काही नाहीसे झाले म्हणजे जीवनाला चिकटून राहण्यात काही अर्थ नसतो. म्हणूनच ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरी लिहून झाल्यानंतर अवतार समाप्ती केली आणि तुकाराम महाराजांनी वैकुंठी प्रयाण केले जगण्यासारखे जोपर्यंत काही जवळ आहे तोपर्यंतच मरणात मौज आहे. असे गडकऱ्यांनी म्हटले आहे ते खरेच आहे जो मरण पावतो त्याच्यापाशी जगण्यासारखे, देण्यासारखे काही राहिलेले नसते असे समजणेच सयुक्तिक असते मरणे हे जुनी वस्त्रे टाकून देण्याइतके मामुली आहे अशी ज्याची बुद्धी आहे, त्याला स्मशान म्हणजे सुखधाम वाटल्यास नवल नाही.

दिनांक २०–१२–६७ रोजी दुपारी ३–४५ वाजता आम्ही जामनगर सोडले आणि बरोबर ४ तासानी सायकाळी ७–४५ वाजता द्वारका येथे पोचलो. स्टेशनापासून गाव सव्वा दीड मैल आहे आणि चार चार माणसे घेणारे टांगे मिळतात द्वारकेत पुष्कळ धर्मशाळा आहेत आणि तीनशेपर्यंत क्षेत्रोपाध्ये उर्फ पंड्ये आहेत आम्ही ज्या धर्मशाळेत उतरलो ती १९२० साली बांधलेली असून तिमजली आहे विद्युत्प्रकाशाची सोय आहे मचळ पाण्याचा बराच खोल असलेला कुवा आहे पिण्याचे पाणी मात्र बाहेरून आणावे लागते. द्वारकाधीशाचे दर्शन घेण्यासाठी प्रत्येक गाडीने यात्रेकरू उतरतात आणि दर्शन घेतलेले यात्रेकरू चढतात. बारा महिने वर्दळ चालू असते. जन्माष्टमीसारख्या दिवशी भलीमोठी यात्रा भरते द्वारका समुद्रकिनारी आहे द्वारकाधीशाच्या मंदिरापासून पाऊण मैल अंतरावर गावापासून दूर आहे. अॅसोशिएटेड सीमेंट कंपनीचा सीमेंटचा कारखाना हे द्वारकेचे एक ठळक वैशिष्टच आहे. द्वारका गाव लहानच म्हणावा लागेल रस्ते कॉंक्रीटचे आहेत पण अरुंद आहेत


द्वारका नगरी—

गुजराथ राज्याच्या ओखामंडल तालुक्याचे द्वारका हे प्रमुख केंद्र आहे. तालुका मामलेदार आणि पहिल्या वर्गाचे न्यायाधीश ह्यांच्या कचेऱ्या येथे आहेत द्वारका ही मोक्षदायी सप्तपुरीपैकी एक पुरी आहे. अयोध्या, मथुरा, माया (हरद्वार) काशी (वाराणशी) कांची, अवन्तिका (उज्जैन) आणि

जलमंदिर, उदयपुर




सती मीराबाई उपासना – मंदिर, चित्तोडगढ




रुक्मिणी मंदिर, द्वारका





गिरनार पर्वत



द्वारकाधीश मंदिर, द्वारका

द्वारका ही सप्तपुरींची नामावली द्वारका चार धामांपैकी पश्चिमधाम आहे जगन्नाथपुरी, रामेश्वर, द्वारका आणि बद्रीनाथ ही चार धामे आद्य श्री शंकराचार्यांनी वैदिक धर्माच्या प्रसारासाठी स्थापन केली. भगवान श्रीकृष्णाच्या वास्तव्याने द्वारका नगरी पुनीत झालेली असल्यामुळे तिचे महत्त्व आणि पावित्र्य अनेक पटींनी वाढले आहे. समुद्रकाठी असल्यामुळे तिला समशीतोष्ण हवामानाचा लाभ झालेला आहे. द्वारका ही गुजराथेतील इतर शहराशी जोडलेली आहे मेहसाणा - वीरमगाव - ओखा रेल्वे मार्गावर द्वारका हे एक स्टेशन आहे ओखा हे गुजराथेतील महत्त्वाचे बंदर द्वारकेपासून तीन मैलांवर आहे. ओखाहून आगबोटीने पोरबंदर, कंडला, मुंबई, येथे जाता येते

द्वारकेच्या परिसरातील जमीन रेताड असल्यामुळे, तेथे फारसे काही पिकत नाही त्यामुळे व्दारकेहून कसलीच निर्यात होत नाही. ए सी.सी चे सीमेंट मात्र, द्वारकेहून मोठ्या प्रमाणात निर्यात होते. द्वारकेची लोकसंख्या अंदाजे १६,००० आहे. त्यामध्ये यात्रेकरूकडून होणाऱ्या दानधर्मावर जगणारे दुकानदार, क्षेत्रोपाध्ये, टांगेवाले अनेक आहेत सरकारी कर्मचारी आणि सीमेंट कंपनीतला नोकरवर्ग ह्याची संख्याही बरीच होईल. द्वारकेला सिव्हिल हॉस्पिटल, दोन माध्यमिक शाळा, पाच प्राथमिक शाळा, एक संस्कृत विद्येचे केंद्र इत्यादी शिक्षणसंस्था आहेत. द्वारकेला गोमती नदी आणि पश्चिमसमुद्र ह्याचा संगम आहे. द्वारका येथे एक उंची दीपगृह आहे. द्वारका कर्कवृत्ताच्या फक्त पाऊण अंश दक्षिणेला आहे.

**पौराणिक व ऐतिहासिक माहिती**– मथुरेवर जरासंध आणि कालयवन ह्याचे हल्ले वारवार होऊ लागल्यामुळे भगवान श्रीकृष्ण व त्याचे यादव ह्यानी स्थलांतर करावयाचे ठरविले व फिरता फिरता ते द्वारकेला आले ती जागा सर्वांना पसंत पडली व तेथे श्रीकृष्णाने विश्वकर्मा, इंद्र, आणि कुबेर ह्याच्या मदतीने सोन्याची द्वारका वसविली स्वतःसाठी त्याने श्रीकृष्ण महालय उर्फ हरिमंदिर बांधविले त्या वेळी लोक फार सुखी आणि संपन्न होते. श्रीकृष्ण त्याचा पाठीराखा होता त्यामुळे कशालाही कमतरता नव्हती, परंतु सुखासीन जीवनाचा परिणाम व्हावयाचा तो झालाच यादव

मंदिरासक्त बनले, बाहेरख्याली बनले श्रीकृष्णाच्या अवतारसमाप्तीच्या वेळी त्यांनी दुर्वास महाकोपी ऋषींची चेष्टा केली एका पुरुषाला लुगडे नेसविले आणि पोटाभोवती कपडे गुंडाळून त्याचे पोट गर्भवतीप्रमाणे मोठे केले. दुर्वास ऋषींपुढे त्याला उभे करून त्यांनी विचारले, ह्या बाईला मुलगा होणार की मुलगी ते सांगा. दुर्वास म्हणाले, ही बाई नाही. हा पुरुष आहे यादव म्हणाले, नाही ही बाईच आहे तिला काय होणार ते सांगा दुर्वासमुनी संतापले, ते म्हणाले, ह्या बाईला लोखंडाचे मुसळ होईल आणि ते सगळ्या यादवांचा नाश करील. दुर्वासाच्या शापाप्रमाणे सर्व घटना घडल्या यादव कृष्णाकडे गेले तो म्हणाला, हे विधिलिखित आहे. यावर उपाय नाही समुद्राचे पाणी एकदम उसळले आणि त्या पाण्याने सबंध सोन्याची द्वारका गिळून टाकली एक हरिमंदिर तेवढे शाबूत राहिले. ह्यावरून महाभारतकाळी द्वारका नगरी प्रसिद्ध होती एवढे अनुमान करण्यास हरकत नाही

दुसऱ्या अथवा तिसऱ्या शतकात नवीन द्वारका नगरी पुन्हा वसविली गेली ती दोनशे वर्षे टिकली आणि चौथ्या अथवा पाचव्या शतकात पुन्हा समुद्राने ती गिळली त्यावेळी सीरियाहून आलेला सक्कर बेलिम नांवाचा राजा तेथें राज्य करीत होता असे उल्लेख आहेत.

सहाव्या किंवा सातव्या शतकाच्या सुमारास द्वारका पुन्हा वसविली गेली व तीच हल्लीची द्वारका होय.

आद्य शंकराचार्यांनी येथे एक पीठ स्थापन केले तेहि सातव्या शतकातच असावे. तेव्हापासून आज तागायत द्वारका हे एक तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे ज्ञानदेव नामदेवादि संतांनी द्वारकेला भेट दिली होती. रामानुजाचार्य चैतन्य महाप्रभु, नरसी मेहता, भक्त बोडाणा आणि परम कृष्णभक्त मिराबाई ह्यांनींहि आपल्या निवासाने हा नगरी पावन केलेली आहे

**(१) द्वारकाधीश मंदिर अथवा जगतमंदिर**– द्वारकेचे हे प्रमुख स्थान हे मंदिर समुद्रसपाटीपासून १७ मीटर उंची असलेल्या टेकाडावर बांधलेले आहे प्रत्यक्ष मंदिराची उंची ५२ मीटर आहे. दक्षिणेकडे गोमती नदी वाहते. तिकडून मंदिरात प्रवेश करण्यासाठी ५६ पायऱ्या चढाव्या लागतात. उत्तर दरवाजाला मोक्षद्वार म्हणतात.

सोन्याची द्वारका समुद्राने गिळली तेव्हां कृष्ण महालय शाबूत राहिले. पुढे तेहि नष्ट झाले, पण त्याच जागी हल्लीचे मंदिर बांधले असा समज आहे

ह्या सात मजली मंदिराच्या बांधणीत लाकूड अथवा लोखंड ह्याचा यत्किंचित उपयोग केलेला नाही. पाचव्या मजल्यापर्यंत हल्लीदेखील सहज चढतां येते आणि द्वारकानगरी संगम व समुद्र ह्यांचे सुंदर दर्शन घडते. ह्या मंदिरातील शिल्पकला उच्च दर्जाची आहे आणि तिच्यात जैन, बौद्ध, ग्रीक आणि अॅमेरिअन शिल्पकलेचे वेगवेगळे नमुने आढळतात. ह्यावरून हे मंदिर बांधण्याचे काम अनेक वर्षे चालू असले पाहिजे व त्या काळात तेथील राज्यकर्तेही बदलले असले पाहिजेत असे अनुमान निघते.

पूर्ण मंदिर ७२ दगडी स्तंभावर आधारलेले आहे. मंदिराच्या शिखरावर सुवर्ण कळस आहे आणि त्यावर ६५ मीटर उंचीचा ध्वजदंड आहे ध्वजदंडाच्या वरच्या टोकाला अनेक ध्वज फडफडत असतात, कोणत्याही हिंदूला भगवान श्रीकृष्णाची पूजा करून आपल्या नांवाचा ध्वज लावतां येतो. मात्र ह्यासाठी विशिष्ट ब्राह्मणांना जेवण द्यावे लागते आणि इतरही खर्च करावा लागतो

तळमजल्यावर उच्चासनावर भगवान द्वारकाधीश उभे आहेत भगवताची चतुर्भुज मूर्ती काळ्या पाषाणाची अडीच तीन फूट उंचीची असून सुबक आहे. मूर्तीपुढे चांदीची प्रभावळ असून रंगीबेरंगी विद्युद्दीपाची माळ आहे. विजेचा झगमगाट असल्यामुळे दुरूनहि मूर्ती स्पष्ट दिसते. लांबूनच दर्शन घ्यावे लागते व ही प्रथा चांगली आहे. गाभाऱ्याला चांदीचा दरवाजा आहे त्या बाहेर थोड्या अंतरावर पुरुष आणि स्त्रियांसाठी वेगवेगळे भाग केलेले आहेत. भक्तांनी दिलेले पुष्पहार व तुळशी पुजारी भगवताला वाहातो.

द्वारकाधीशाची पहिली आरती सकाळी ७ ला होते ही काकडआरती ह्या आरतीच्या वेळी स्नान केलेले नसले तरी चालते दुसरी शृंगार-आरती १०-३० ते १०-४५ ह्या वेळात होते ह्या आरतीपूर्वी देवाला पोषाख चढवून सर्व सोन्याचे अलंकार घातलेले असतात एक हार केवळ पाचूचा आहे. भक्तांनी दिलेला पोषाखही चढविनात शृंगारदर्शनाला खूपच गर्दी असते. द्वारकाधीश श्रीमंत देव आहे भक्तगण विविध भोग चढवीत अस-

तात त्याचे भावही ठरलेले आहेत. सव्वा रुपया दिला तर १०८ तुळशीची पाने चढवितात. पाच रुपये दिले तर १००० तुळशीपत्रे चढवितात. भरलेल्या पैशाची पावती मिळते भोग चढविला की पुऱ्याचा प्रसाद मिळतो. ह्या पुऱ्या महिनाभर टिकतील अशा पक्क्या तळलेल्या असतात प्रसादाच्या पाकी-टात एक मोठी पुरी साखर चिकटवलेली असते आणि ८–१० बारक्या अस-तात आम्ही चाळीस जणांनी प्रत्येकी रु ५ वर्गणी देऊन, पीतांबर, कटिवस्त्र, उपरणे वगैरे वस्त्राचा भोग समर्पित केला तसेच रुक्मिणी मातेला पातळ व शाल अर्पण केली. आलेला प्रत्येक यात्रेकरू किमान सव्वा रुपयाचा भोग चढविनोच कोणी भजने गाऊन कोणी रागदारी गायन गाऊन, देवा-पुढे आपली हजेरी लावतात. सध्याकाळी ७–३० ला तिसरी आरती होते व तिलाही बरीच गर्दी असते दर्शनाचे आणि आरतीचे महात्म्य द्वारकेला बरेच दिसते. मंदिराचा सभामंडप आणि आवार प्रशस्त आणि स्वच्छ आहे साधू व वैरागी ह्यांची येजा पुष्कळ आहे भिकारी आहेत पण संख्या मर्यादित आहे

श्रीकृष्णाच्या मंदिरासमोर देवकी मातेचे छोटेसे मंदिर आहे डाव्या हाताला बळरामाचे मंदिर आहे. मंदिराच्या परिसरांत लहान मोठी २०–२५ मंदिरे आहेत श्रीमच्छंकराचार्यांचा द्वारकापीठ मठही मंदिराच्या आवारांतच आहे तेथेहि सव्वा रुपया देऊन पावती व प्रसाद मिळतो द्वारकाधीशाचे मंदिर बाहेरून कसे दिसते ह्याची कल्पना सोबतच्या छायाचित्रावरून थोडीफार येऊ शकेल

(२) **रूक्मिणी–माता मंदिर**–द्वारकेच्या उत्तरेकडील भागात दीड किलोमीटर अंतरावर रुक्मिणीचे पुरातन मंदिर आहे. कृष्णरुक्मिणीची सप्तपदी ह्याच मंदिराच्या आवारात झाली व त्या ठिकाणी एक लहानसा चौथरा आणि तोरण कोरलेली चौखांबी आहे मंदिर लहान असले तरी बाहेरून खालपासून वरपर्यंत नक्षीने आणि विविध कोरीव आकृतींनी नटवि-लेले आहे. खाऱ्या वाऱ्याच्या आणि उन्हाच्या माऱ्यामुळे आकृती झिजत चालल्या आहेत मंदिरात पांढऱ्या संगमरवरीची देखणी मूर्ती आहे ती सालंकृत असल्यामुळे सुंदर दिसते रुक्मिणीच्या मंदिरात तिचा भाऊ रुक्मी ह्याचेही छोटेसे मंदिर आहे येथून गोडे पाणी बऱ्याच अंतरावर असल्या

मुळे एक प्याऊ म्हणजे पाणपोई आहे रुक्मिणी मातेचे मंदिर तिचा पती द्वारकाधीश ह्याच्या मंदिरापासून इतके दूर कां ? असा प्रश्न प्रत्येकजण विचारतो व ते साहजीकच आहे

ह्या प्रश्नाचे उत्तर देणारी कथा उद्बोधक आहे आणि ती देवळात मोठमोठ्या तैलचित्रांच्या द्वारा चित्रित केली आहे.

श्रीकृष्णाच्या अष्टनायिकामध्ये अग्रस्थान रुक्मिणीला होते. ती श्रीकृष्णाची आवडती पट्टराणी आणि सर्वात रूपवती भावाचा कडवा विरोध बाजूस सारून तिने श्रीकृष्णाशी विवाह केला. प्राचीन काळांतला हा पहिलाच प्रेम-विवाह असावा रुक्मिणी ही लक्ष्मीचा अवतार रुक्मिणी म्हणजे जगन्माता निराकार, निर्गुण, परंतु मानवरूपात अवतार घेतल्यावर मानवी स्वभावाचे दोष आलेच आपण श्रीकृष्णाची पट्टराणी म्हणून तिला फार गर्व वाटे हे गर्वहरण करण्यासाठी श्रीकृष्णाने दुर्वास ऋषींची मदत घेतली.

भोजनाचे निमंत्रण देण्यासाठी कृष्ण आणि रुक्मिणी दुर्वासाकडे गेली दुर्वासांनी निमंत्रण स्वीकारले, पण एका अटीवर. ते म्हणाले, मी सध्या काही पूजाकार्यात गुतलेला आहे म्हणून प्राण्यानी ओढलेल्या वाहनात बसतां येणार नाही तुम्ही दोघे रथ ओढणार असाल तर मी येईन. कृष्ण रुक्मिणीने ते मान्य केले आणि ते स्वत. रथ ओढू लागले. रुक्मिणी लौकरच थकली आणि तिला तहान लागली श्रीकृष्णाने एका ठिकाणी पाय दाबून गंगेचा झरा निर्माण केला रुक्मिणी पाणी प्याली पण तिने पाणी पिण्यापूर्वी निमंत्रित अतिथि दुर्वास ह्याची परवानगी घेतली नाही. अतिथीला निमंत्रण दिल्यानंतर निमंत्रक गृहिणीने त्याच्या परवानगीशिवाय पाणीहि घेता कामा नये असा त्या काळी संकेत होता तो रुक्मिणीने मोडला म्हणून दुर्वासाचा अपमान झाला व ते रागावले त्यानी रुक्मिणीला शाप दिला की, तिने बारा वर्षे भगवंतापासून दूर निर्जन प्रदेशांत राहून तपाचरण केले पाहिजे. त्यामुळे तिला दूर एकांतात राहणे भाग पडले आणि म्हणून रुक्मिणीचे मंदिर कृष्णाच्या मंदिरापासून दूर बांधावे लागले काही वर्षांनी इतरांच्या मध्यस्तीने बारा वर्षांची मुदत कमी केली गेली आणि रुक्मिणीला भगवंतापाशी राहण्याची अनुज्ञा मिळाली. अशा रीतीने गर्वाचे घर खाली हे रुक्मिणीलाहि पटवून द्यावे लागले

**गोमती सागर संगम**—द्वारकाधीश मंदिरापासून फर्लांगभर अंतरावर गोमती नदी आणि पश्चिम समुद्र ह्यांचा संगम आहे वास्तविक गोमती ही नदी नसून, खाडी आहे. पाणी खोल आहे व भरती–आहोटीहि आहे. संगम म्हटला की, पावित्र्याची भावना होते म्हणून हा संगम म्हटला गेला आहे असे वाटते. गोमती नावाची नदी ह्या भागांत नाही. खाडीला एका ठिकाणी घाटहि बांधलेला आहे. संगमस्नान, गोमतीची ओटी भरणे, सौभाग्य-वायन अर्पण करणे इत्यादी धार्मिक कृत्ये येथे होतात संगमाजवळ एक लहानसे सूर्यमंदिर आहे

**दीपगृह**—संगमापासून फर्लांगभर अंतरावर १२० फूट उंचीचे दीपगृह आहे त्यात ५० लक्ष कँडल पॉवरचा फिरता दिवा सूर्यास्तापासून सूर्योदया-पर्यंत प्रकाशझोत फेकीत असतो स्वच्छ हवा असली तर ह्याचा प्रकाश ३० ते ३५ किलोमीटर अंतरावरील जहाजाना दिसतो. धुक्याच्या वेळी धुके संदेशाचा भोंगा ( Fog–Signal ) वाजविला जातो आणि तोहि ३०–३५ किलोमीटर अंतरावर ऐकू येतो

**पंचनदी तीर्थ**—गोमती नदीच्या दुसऱ्या तीरावर गोडया पाण्याचे पाच कुवे आहेत समुद्र प्रलयानंतर गोडे पाणी कोठेच मिळेना, म्हणून श्रीकृष्णाने पाच बाण मारून पाच तीर्थे निर्माण केली. त्या पाच कुव्यातले पाणी गोड आहे हे प्रत्यक्ष पाहिले चहूबाजूनी खाऱ्या समुद्राने वेढलेल्या ह्या भागात गोडे पाणी पाहून थोडेसे आश्चर्य वाटते. तेथे एक चांगले मंदिर आहे व एका कुंडात एक तरता पाषाण आहे ह्या मंदिरात जाण्यासाठी नाव आहे. ओहोटीच्या वेळी पायउतारहि असतो. आम्ही पाण्यातूनच गेलो गुडघ्याच्या थोडे वर पाणी होते

पंचतीर्थाच्या परिसरात नगरपालिकेने काही कुवे काढले, परंतु त्यांना खारेच पाणी लागले असे सांगण्यात आले

महाराष्ट्रात अलीबाग गांवाजवळ कुलाबा नांवाचा जो किल्ला शिवाजी-महाराजांनी बांधणेस सुरवात करून त्यांचे पश्चात पुरा झाला, त्यात काही मंदिरे व गोडया पाण्याच्या विहीरी आहेत, असे प्रत्यक्ष पाहून आलेली मंडळी सांगतात

श्रीआद्य शंकराचार्यांनी चार धामांची योजनापूर्वक आंखणी केली असावी.

भारताचे अखंडत्व आणि धार्मिक एकता तर त्यांना अभिप्रेत होतीच शिवाय यात्रेच्या निमित्ताने लोकांनी भारतभर भ्रमण करावे, नवीन मुलूख पाहावे, अनुभव घ्यावे, निरीक्षण करावे आणि विविधतेतील एकता ओळखावी हाहि त्यांचा हेतू असावा भारतातले विविध सृष्टिसौंदर्यही लोकांच्या नजरेस पडावे आणि परमेश्वरी शक्तीचा साक्षात्कार त्याना घडावा असेहि त्यांना वाटले असावे बद्रीनाथला जाताना नागाधिराज हिमालयाचे दर्शन व्हावे, पुरीला सागरदर्शन घडावे आणि समुद्रात होणारा सूर्योदय पाहावा रामेश्वर-कन्याकुमारीला तीन सागराचा संगम आणि एकाच ठिकाणाहून समुद्रात पूर्वेला होणारा सूर्योदय आणि पश्चिमेला होणारा सूर्यास्त पाहावा आणि द्वारकेला समुद्रात होणारा सूर्यास्त पाहावा पुरीचा उपसागर पश्चिमेच्या सागराच्या मानाने सौम्य हिमालयात विष्णू आणि कृष्ण, पुरीला आणि द्वारकेला श्रीकृष्ण आणि रामेश्वरला राम आणि शिव ह्या सर्वांचे दर्शन घेऊन अद्वैताचा साक्षात्कार होण्याची सोयही आचार्यांनी केली आहे.

द्वारकाधीशाचे मंदिर फार जुने झाले आहे. द्वारकापीठाच्या शंकराचार्यांनी ही गोष्ट पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांच्या नजरेस आणली. त्यांनी मंदिराची पाहणी करून जरूर ती योजना करण्याचे मान्य केले आहे, असे नुकतेच वर्तमानपत्रात वाचले व समाधान वाटले. भारतीय इतिहासाचे, संस्कृतीचे, शिल्पाचे साक्षीदार चांगले जतन करून ठेवणे हे केंद्र आणि राज्य सरकारचे कर्तव्यच आहे धर्मनिरपेक्षता ह्या राष्ट्रीय कार्याच्या आड येण्याचे काहीच कारण नाही ताजमहाल आणि गोलघुमट ह्याचेहि रक्षण केलेच पाहिजे

ज्यांनी पुष्कळ पैसा खर्च करून तीर्थक्षेत्रात धर्मशाळा बांधल्या त्यांचाही गौरवपूर्वक उल्लेख केला पाहिजे द्वारकेला मोठमोठ्या धर्मशाळा आहेत त्यामुळे प्रवासी लोकांची फार सोय होते निवारा, पाणी, संडासादि सोयी उपलब्ध आहेत

**द्वारकेच्या आसपासची दर्शनीय ठिकाणे–**

(१) **नागेश्वर महादेव**– द्वारका–ओखा रस्त्यावर हे सुंदर मंदिर आहे बारावे ज्योतिर्लिंग, दारुकावन असे तेथे लिहिले आहे, पण ते बरोबर नाही. द्वादश ज्योतिर्लिंगाच्या यादीत जो नागेश आहे तो हा नसावा द्वार-

केच्या परिसराला देव-वन हे नाव होते असेहि चौकशीअंती समजते.

(२) **गोपीतलाव**– हा तलावही ह्याच रस्त्यावर आहे. येथील पिवळ-सर मातीच्या गोपीचंदनाच्या कांड्या ६ पैशांना १५ इतक्या स्वस्त दराने मिळतात तलाव बरा आहे

(३) **बेट द्वारका किंवा बेट शंखोद्धार**– ओखाबंदरापासून तीन मैलां-वर बेट द्वारका आहे तेथे जाण्यासाठी वाफराने १५ मिनिटे लागतात. शिडाच्या नावेने गेल्यास तासभर लागतो तेथेहि कृष्णाचे मोठे मंदिर आहे आणि मंदिराच्या आवारातच रुक्मिणी, सत्यभामा ह्यांचीहि मंदिरे आहेत. शंखासुर नावाच्या राक्षसाचा वध भगवान विष्णूंनी येथे केला असे सांग-ण्यात येते मुद्दाम जाऊन पाहाण्यासारखे असे येथे काही आढळत नाही. येथील मंदिर वल्लभ संप्रदायाप्रमाणे बांधलेले असल्यामुळे, त्याला शिखर नाही ह्या बेटाला रमणद्वीप असेहि म्हणत, कारण श्रीकृष्णाचे अंतःपूर येथे असे.

(४) **मिठापूर**– द्वारकेपासून २० किलोमिटर अंतरावर टाटाचा मोठा कारखाना आहे ह्या ठिकाणी सोडा बाय कार्ब, हैड्रोक्लोरिक आम्ल, बी एच् सी लिक्विड क्लोरीन असे मूल्यवान रासायनिक पदार्थ समुद्राच्या पाण्यात असलेल्या क्षारांपासून तयार करतात. टाटा केमिकल्स असेच कार-खान्याचे नाव आहे. मिठापूर हे नावहि अन्वर्थकच आहे

**वखाला**– द्वारकेच्या उत्तरेस चार किलोमिटर अंतरावर वखाला हे छोटेसे गाव आहे. तेथील पाण्याचा अमाप साठा आहे तो द्वारकेतला सीमेंट कारखाना आणि मिठापूर येथील रासायनिक कारखाना ह्यांना उपयोगी पडतो द्वारकेभोवतालच्या मरूभूमीत वखाला येथे हिरवळ दृष्टीस पडते आणि आनंद वाटतो. येथे क्षयरोग्यांसाठी एक आरोग्यधाम आहे

**ओखा पोर्ट**– द्वारकेपासून २८ किलोमिटर अंतरावर ओखाबंदर आहे. हे एक चांगले बंदर आहे बोटी धक्क्याला लागतात सिंदिया स्टीम नॅव्हि-गेशन कंपनीच्या उतारू व माल बोटी येथून मुंबईकडे वाहतूक करतात.

ह्या बंदरापाशी बर्मा शेल, ऐसो, इंडिअन ऑइल ह्या प्रसिद्ध कंपन्यांच्या खनिज तेलाच्या मोठाल्या टाक्या आहेत घासलेट तेलाचे डबे बनविणेचा कारखाना आहे. ओखामंडल मेटल वर्क्स ह्या नावाचा ॲल्युमिनिअमची

भांडी बनविण्याचा कारखाना आहे तसेच मद्रासच्या कार्बोरेंडम युनिव्हर्सल लिमिटेड ह्या कंपनीचे बॉक्साइट कॅल्सिनेशन (भाजणे) प्लँट आहे. बॉक्साईटपासूनच शुद्धीकरणाने अल्युमिनिअम धातू मिळते.

द्वारकेची लोकसंख्या १६,००० आहे त्यामध्ये ए सी सी. कारखान्यात काम करणारी १००० कुटुंबे आहेत.

**उत्सव समारंभ**– द्वारकेत नेहमी निरनिराळे उत्सव चालू असतात. कार्तिकांत अन्नकोटोत्सव असतो माघ महिन्यात भडकेश्वर महादेवाची यात्रा असते. फाल्गुनात होलीकोत्सव आणि रंगोत्सव असतो वैशाखात निर्जला एकादशीची यात्रा श्रावणात रणमुक्तेश्वराची यात्रा, जन्माष्टमीचा उत्सव आणि आश्विनात नवरात्रीचा उत्सव असतो महाराष्ट्र, राजस्थान, उत्तर प्रदेश ह्या राज्यातून यात्रेकरू येत जात असतात दक्षिणेकडचे आणि बंगालकडचे यात्रेकरू मात्र आम्हाला तरी आढळले नाहीत.

हजारो वर्षे भारतीय जनतेच्या मनाला मोहिनी घालणाऱ्या आणि त्यावर सुसंस्कार करणाऱ्या कृष्ण–रुक्मिणी विवाह, सुभद्राहरण, सुदाम–पूजा, पारिजातकाचे स्वर्गातून आगमन आणि त्यामुळे रुक्मिणी–सत्यभामा ह्या मधील गमतीदार कलह ह्या गोष्टी जेथे प्रत्यक्ष घडल्या तो हा द्वारकेचा परिसर कोणाला आवडणार नाही ?

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
... (ठाणे शहर)

प्रकरण ८.

# सिद्धपूर अथवा मातृगया

द्वारका–राजकोट–मेहसाना–पालनपूर मार्गे सिद्धपूर रेल्वे स्टेशनला आपण पोचतो. पालनपूर – मेहसाना मार्गावर सिद्धपूर हे रेल्वे स्टेशन आहे. मातृगया असे ज्याला म्हणतात ते तीर्थस्थान स्टेशनपासून अर्ध्या मैलावर आहे. ह्या ठिकाणी भाविक हिंदु आपल्या आईचे श्राद्ध करतात आणि तिला मुक्तीची वाट मोकळी करून देतात मातृगयेला आईचे श्राद्ध केल्यानतर दरसाल आईचे श्राद्ध करावयाचे नसते बिहारमध्ये जे गया गाव आहे ती पितृगया तेथे विष्णुपदावर वडिलांचे श्राद्ध करावयाचे असते आणि सिद्धपूर येथे आईचे.

हे तीर्थक्षेत्र लहानच आहे हर्षबिंदुसरोवर, अल्पासरोवर आणि ज्ञानवापी कुंड किंवा विहीर ह्यात ससंकल्प स्नान करून श्राद्ध करावयाचे असते येथे श्राद्ध संकल्प सांगणारे श्री वासुदेवराव कोरासे नांवाचे महाराष्ट्रीय गृहस्थ आहेत परंतु श्राद्धानिमित्त किती खर्च करावयाचा ते ठरविण्याचा अधिकार क्षेत्रस्थ पंड्यांना आहे श्राद्धासाठी सव्वा पाच, सव्वा अकरा असे दर आढळले. आम्ही सव्वा अकरा रुपये देऊन पिंडदानयुक्त श्राद्ध केले आईने मुलासाठी सोसलेले गरोदरपण, प्रसूती, त्यानंतर मरेपर्यंत खाल्लेल्या खस्ता इत्यादींबद्दल १६ पिंड करावे लागतात आणि आई, आजी आणि पणजी (वडिलांची आई आणि त्याच्या वडिलाची आई) ह्याच्यासाठी ३ पिंड करावे लागतात श्राद्धसंकल्प एक तास चालतो येथे क्षौर करण्याची अपेक्षा दिसली नाही

वर जी दोन सरोवरे सांगितली ती सरोवरे नसून कुंडे आहेत अल्पा कुंड १००० फूट लांब व ८० फूट रुंद असून २–३ पुरुष खोल आहे चोहोंकडून चांगले बांधून काढलेले आहे आणि एका बाजूला चांगला घाट आहे. पाण्यात बरीच कासवे आहेत आणि पाणीहि थोडेच असते चोहीकडून पक्के बांधलेले आहे आणि पायऱ्या आहेत. पाणी थोडे असल्यामुळे फारसे स्वच्छ

नव्हते. ज्ञानवापी म्हणजे तर लहानसा कुवाच आहे, पाणी मात्र स्वच्छ आणि गोड आहे आणि ते पायऱ्या उतरून घेता येते

मातृगयेसबधी जी कथा समजली ती अशी ह्या भागात कर्दमऋषी आणि त्यांची पत्नी देवहूती ह्यांचा आश्रम होता. दोघेहि सत्वशील आणि भगवतभक्त होती त्याना सारख्या मुलीच होत गेल्या आपल्याला अत्यत गुणवान मुलगा व्हावा अशी त्याची इच्छा होती. परतु मुलगा काही होईना म्हणून कर्दम ऋषीनी घोर तप करण्यास प्रारभ केला. त्यानी २००० वर्षे तप केले आणि तपोबल इतके वाढविले की, इद्राला आपण पदभ्रष्ट होऊ अशी भिती वाटू लागली सर्व देव भगवान विष्णूकडे गेले आणि त्याच्या मदतीची त्यानी याचना केली. भगवान विष्णूनी कर्दमऋषीना दर्शन दिले आणि वर माग असे सांगितले

कर्दम ऋषी म्हणाले, तुझ्यासारखा मुलगा दे दुसरे काही नको हे उत्तर ऐकून भगवान विष्णू सतुष्ट झाले आणि त्याच्या डोळयातून हर्षसूचक अश्रू पडले ते अश्रू जेथे पडले, तेथे हे हर्षबिंदूसरोवर, म्हणून ते पुण्यदायक समजतात कर्दम ऋषीच्या नशीबी पुत्रसतान नव्हते, म्हणून प्रत्यक्ष भगवान विष्णूना देवहूतीच्या उदरी अवतार घ्यावा लागला. विष्णूचा हा अवतार म्हणजेच कपिल महामुनी होत हे कपिलमहामुनी अतिशय विद्वान होते ज्ञानवापीपाशी त्यानी आपल्या मातेला — देवहूतीला — साख्यशास्त्र सांगितले आणि तिला मुक्ती दिली म्हणून हे मातृमुक्तिस्थान उर्फ मातृगया ह्या नावाने प्रसिद्धीस आले

परशुरामाचाही ह्या तीर्थाशी सबध जोडलेला आहे. त्याने आपली माता रेणुका हिचा पित्याच्या आज्ञेवरून वध केला पुढे तिला जमदग्नीने परशुरामाच्या विनतीवरून पुन्हा जिवत केले हे खरे असले तरी मातृहत्येचे पातक परशुरामाच्या कपाळी लागले ते लागलेच त्यातून मुक्त होण्यासाठी परशुरामाने बिंदुसरोवरात आणि अल्पा सरोवरात स्नाने केली आणि तो मातृवधाच्या पातकातून मुक्त झाला परशुराम हा स्वत. परमेश्वराचा अवतार होता आणि अतिशय प्रतापी होता परतु मानवरूपात अवतरल्यावर मानवी सुख दुखे पापपुण्ये त्याच्याही मागे लागलीच पापाचे प्रायश्चित्त त्यालाही घ्यावेच लागले मानवी जीवन हे सुखदुखमिश्रित आहे हे प्रत्येकाने ध्यानात ठेवले

पाहिजे हेच जणु ह्या कथा सूचित करतात

कपिल महामुनी हे साक्षात विष्णूचा अवतार असल्यामुळे त्यांच्या दर्शना-साठी सोमनाथ महादेव रामेश्वर महादेव, कर्दमेश्वर महादेव, पातालेश्वर, कार्तिक स्वामी, त्यांच्या दर्शनासाठी येत हे सुचविण्यासाठीच जणु काय ह्या देवतांची छोटी छोटी मंदिरेहि बिंदु कुंडाभोवती आहेत कपिलदेव भगवान, देवहूतीजी, गया गदाधर भगवान ह्यांचीहि मंदिरे आहेत

सिद्धपूर हा गाव ३०–३५ हजार वस्तीचा आहे आणि सामान्य आहे मातृगया तीर्थाशिवाय प्रेक्षणीय असे येथे काही नाही

साबण लावुन कुंडात कपडे धुवू देत नाहीत हे योग्यच आहे.

**बाळाराम महादेव**–पालनपूर स्टेशनापासून ९–१० मैलांवर बाळाराम महादेव हे रम्य स्थान आहे बाळाराम नावाचा एक साधू येथे राहात होता पालनपूरचा नबाब ह्या ठिकाणी शिकारीसाठी गेला असता त्याला एक वाघ दिसला नेम धरीपर्यंत तो वाघाचा बच्चा झाला नंतर एक गोसावी दिसला आणि शेवटी महादेवाची पिंड प्रगट झाली. हा चमत्कार पाहून नबाबाने हे मंदिर बांधविले बाळाराम साधू तेथे राहू लागल्यामुळे त्याला बाळाराम महादेव असे नाव पडले गोमुखातून पिंडीवर पाण्याची धार बाराहि महिने अहोरात्र पडत असते आणि पाणी अतिशय स्वच्छ थंडगार आणि गोड असते सभोवती मोठमोठ्या वृक्षांची राई आहे जवळच नबाबाचा मोठा वाडा आहे.

प्रकरण ९

# माऊंट अबू · दिलवाडा · अंबाजी

अबू रोड स्टेशनपासून माऊंट अबू २८ किलोमीटर किंवा १८ मैल, अबू रोड स्टेशनपासून माउंट अबू समुद्रसपाटीपासून ४००० फूट उंचीवर ( म्हणजे पांचगणी इतक्या उंचीवर ) असलेले एक विस्तीर्ण पठार आहे राजस्थानचे ते प्रख्यात थंड हवेचे ठिकाण आहे. दिलवाड्याची विश्वविख्यात असलेली जैन मंदिरे येथेच असल्यामुळे, भारतीय आणि परदेशस्थ प्रवाशांची तेथे नेहमीच गर्दी असते बस सर्व्हिस असल्यामुळे जाणे येणे सुलभ झाले आहे.

महाबळेश्वर पांचगणीसारखेच हे ठिकाण आहे. उत्तम हॉटेले राहण्या-जेवण्याची सोय करण्यास सिद्ध असतात जलविहारासाठी नक्की लेक नावाचे विस्तीर्ण सरोवर आहे जिकडे तिकडे वृक्षांची दाटी आहे हवा थंड आणि प्रसन्न आहे आजूबाजूचे सृष्टिसौंदर्य रमणीय आहे. विस्तीर्ण क्रीडामैदान (Play Ground) आहे श्रीमंतांना सुखाने राहण्याची सर्व साधने उपलब्ध आहेत पवित्र स्थान म्हणूनहि त्याला महत्त्व आहे

अबूरोड हे गाव लहानच आहे, पण तेथे चांगल्या धर्मशाळा आहेत स्टेशन मोठे आणि सुसज्ज आहे, कारण अबूरोड हे पर्यटनकेंद्र आहे स्टेशनपाशीच एस् टी बस चा मुख्य थांबा (Stand) आहे

अबूचा पहाड सत्ययुगापासून अस्तित्वात आहे असे हिंदु लोक मानतात पृथ्वीवर आतापर्यन्त (१) सत्य किंवा कृत युग, देवाची ४८०० वर्षे ( ४८०० ३६० – १७,२८००० आपली वर्षे ) (२) त्रेतायुग देवाची ३६०० वर्षे (३) द्वापार युग देवाची २४०० वर्षे, अशी तीन युगे होऊन गेली असून, सध्यां कलियुग चालू आहे कलियुग ख्रिस्तपूर्व ३१०२ मध्ये सुरू झाले आणि देवाची १२०० वर्षे संपेपर्यंत चालणार आहे, अशी कथा सांगतात

हल्ली जेथें अबूचा पहाड आहे तेथें पूर्वी एक मोठा खड्डा होता. वसिष्ठ

ऋषींची कामधेनू नंदिनी एकदा चुकून त्या खड्ड्यात पडली त्यामुळे वशिष्ठांच्या नित्यकर्मात व्यत्यय येऊ लागला म्हणून भगवान शंकराने अर्बुद नावाच्या द्रुलगती नागराजावर बसून तावडतोब तेथे जा आणि नंदिनीला बाहेर काढ, अशी नंदिकेश्वराला आज्ञा केली त्याप्रमाणे नंदिकेश्वर निघाला परंतु दरम्यान सरस्वती नदीने त्या खड्ड्यात प्रवेश करून पाण्याची पातळी वाढविली आणि नंदिनी पाण्याबरोबर नावेप्रमाणे वर येऊन सुरक्षित बाहेर आली सरस्वती पुन्हा गुप्त झाली नंदिकेश्वराने आल्यासारखा तो खड्डा बुजवून टाकला भगवान शंकराने हिमालयाचा एक भाग तेथे धाडून दिला आणि अबूचा पहाड तयार झाला अर्बुद ह्या नावाने तो पहाड प्रथम ओळखला जात होता त्याचे संक्षिप्त रूप अबू असे झाले ह्या दंतकथेचा उगम पहाडाचे पावित्र्य वाढविण्याच्या इच्छेत दिसून येतो कोणी म्हणतात की, ही अरवली पर्वताची एक शाखा आहे परंतु अरवली आणि अबू ह्यांच्या दरम्यान १५ मैलांची, सपाटी आहे. कोणी म्हणतात की, भूकंप आणि ज्वालामुखीच्या उद्रेकाने अबूचा पहाड तयार झाला असावा ह्या तर्कांना व्यावहारिक महत्त्व अर्थातच नाही ११ मैल लांब आणि २ ते ४ मैल रुंद असे पठार आज दिसते व ते निसर्गसुंदर आणि थंड व स्वच्छ हवेमुळे आकर्षक झाले आहे हे खरे ह्या पठारावर ही कांहीं टेकाडे आहेत त्यापैकी गुरु शिखर हे सर्वांत उंच असून, त्याची उंची समुद्रसपाटीपासून ५६५३ फूट आहे त्याच्या पायथ्याशी ओरिया नावाचे खेडे आहे गुरुशिखरावर चढून गेल्यास एक छोटेसे शिवमंदिर, श्रीदत्तात्रयाच्या पादुका, वैष्णवप्रचारक रामानंद ह्यांच्या पादुका आणि एक मोठी घंटा दृष्टीस पडते

**अचलेश्वर महादेव आणि अचलगड**– अबूरोड स्टेशनवरून बस निघाली की, ४–५ मैल गेल्यावर घाट सुरू होतो घाट वळणावळणाचा आहे आणि दोन्ही बाजूस वृक्षराजी आहेत एका बाजूला पहाड आणि दुसऱ्या बाजूला दरी ही घाटाची ठराविक रचना येथेहि आहे निम्मा घाट चढल्यावर एंजिन तापते म्हणून बस काही वेळ थांबते. तेथे एक लहानसे मंदिर आहे.

त्यानंतर उरलेला निम्मा घाट चढून झाला की, आपण अचलेश्वर महा-

देव मंदिराशी पोचतो अचलेश्वर ही अबूची ग्रामदेवता आहे. अचल१५५८ मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे एका खळग्यात भगवान शंकराच्या पायाचा अंगठा आहे. त्याचीच पूजाअर्चा होते. खळग्यांत कापूर पेटविला की, हा काळ्या पाषाणाचा भलामोठा अंगठा स्पष्ट दिसतो त्याला तिबोटी गंध लावलेले असते आणि मध्यभागी तिलक असतो ज्या खळग्यात हे अंगुष्ठलिंग आहे तो पाताळापर्यंत खोल गेलेला आहे आणि आत कितीहि पाणी ओतले तरी ते जिरून जाते असे सांगतात. धारावर्ष राजानें सतत महा महिने पाणी ओतून पाहिले पण पाण्याचा थेंबहि खळग्यात शिल्लक राहिला नाही उलट अविश्वास दाखवून कसोटी पाहण्याचा प्रयत्न केल्या-बद्दल देवाचा त्याच्यावर कोप झाला आणि त्याचा निर्वंश होऊन प्रमार राजघराणे नष्ट झाले भगवान शिवाचा आंगठा येथे कसा आला? नंदिव-र्धनाने अबू पहाडाची रचना केली पण पहाड स्थिर होईना. सारखा हादरू लागला. त्याला स्थिर करण्यासाठी शिवाने आपला आंगठा पहाडावर जोराने दाबला पण तो तुटून पडला आणि तेथेच हे मंदिर उभारले गेले इ. स. ८१३ मध्ये हल्लीचे मंदिर उभारले गेले असे समजते.

ह्या मंदिरातला नंदी पितळेचा आहे व बराच मोठा आहे. त्याच्या अंगावर अत्याचाराच्या खुणा किंवा ओरखडे आहेत. हा नंदी इ स. १४१२ मध्ये बसवला असे समजते. अहमदाबादचा सुभेदार महमद बेगडा ह्याने गुप्त धनाच्या आशेने नंदीवर प्रहार केला मिळेल ती लूट मारून जेव्हा तो परत निघाला तेव्हा शंकराने त्याच्या सैन्यावर मधमाशांचे थवेच्या थवे सोडले आणि बरीचशी लूट टाकून त्याला आणि सैन्याला पळ काढावा लागला त्यातला एक त्रिशूळ मंदिराबाहेर उभा केला आहे नंदीशेजारी शिवभक्त कवी दुरास अधा ह्याचा पितळी पुतळा आहे. मुख्य मंदिरापाशी एक तोरण आहे तेथे राजे लोक सुवर्ण, रौप्य, धान्य, वस्त्रे ह्याच्या तुला करीत असत

**मंदाकिनी कुंड आणि महिषांचे पुतळे**– अचलेश्वर मंदिराच्या शेजा-रीच ९०० फूट लांब आणि २४० फूट रुंद असे एक कुंड आहे. त्याला मंदाकिनी कुंड म्हणतात आणि त्याचे पाणी गंगाजलाइतके पवित्र मानतात आम्ही पाहिले तेव्हां कुंडात फारसे पाणी नव्हते आणि होते ते स्वच्छही

म्हणते ह्या कुंडाच्या किनाऱ्याला तीन महिषाचे ( रेड्याचे ) पूर्णाकृती पुतळे आहेत व ते लांबून पाहिल्यास रेडेच वाटावे इतके हुबेहूब आहेत रेड्याचे पूर्णाकृती पुतळे जगात अन्यत्र कोठे नसतील

ह्या कुंडात प्राचीन काळी पाण्याऐवजी तूप असे ते पिण्यासाठी तीन राक्षस दररोज रात्रीं रेड्याचे रूप घेऊन येत असत. आदिपाल प्रमारने हे ओळखून शेजारी आदिपालाचा सुरेख पुतळा बसविला आहे. हा पुतळा पांढऱ्या संगमरवरी दगडाचा असून, पाच फूट उंचीचा आहे कर्नल टॉडने लिहिले आहे, इतका सुंदर पुतळा क्वचितच पाहवयास मिळतो डौके शिकारीच्या वेळी असावे तसे ऐटीत दाखविले आहे आणि चेहऱ्यावर दृढनिश्चय प्रतीत होतो आदिवासींप्रमाणे एकच कटिवस्त्र आहे कंबरपट्टयात खंजीर दाखविला आहे गळ्यातले मौक्तिक हार आणि हातापायांतील अलंकार शिकाऱ्याचा दर्जा दाखवितात हातात धनुष्य आहे, जोत्यावरील शिलालेखात फाल्गुन त्रयोदशी संवत १३२२ ( इ स १२६६ ) अशी नोंद आहे बरोबर सातशे वर्षे ह्या पुतळ्यांना झालीं आणि ते उघड्यावर असल्यामुळे ऊन, वारा, पाऊस ह्यांचा परिणाम झाल्यामुळे पृष्ठभाग झिजला आहे हे जाणवते परंतु ७०० वर्षांनंतरही पुतळे त्या मानाने बऱ्या अवस्थेत आहेत ज्या वेळी हे पुतळे बनविले गेले तेव्हा ते किती जिवंत आणि यथातथ्य वाटत असतील ह्याची कल्पना ते पाहून येते. वरील दंतकथा जरी न पटणारी असली, तरी तीन रेड्याचे पूर्णाकृती पुतळे उगाच कोणी केले असतील हे संभवत नाही


अचलेश्वर मंदिरापाशी उभे राहिले कीं, थोड्या उंचीवर एक खडक दिसतो बैठक मारलेल्या प्रचंड बेडकासारखा तो दिसतो, म्हणून त्याला बेडूक खडक असे म्हणतात दुसरा एक खडक प्रार्थनेच्या पवित्र्यात असलेल्या ख्रिस्ती परिचारिकेसारखा दिसतो त्याला नर्स रॉक म्हणतात

**अचलगड**–अचलेश्वर मंदिरापासून अचलगडाचा चढ सुरू होतो डोल्याही मिळतात हा चढ फक्त पाचशे फूट उंचीचा आहे हा गड इ स ९०० च्या सुमारास बांधवला असावा नंतर महाराणा कुंभाने त्याची दुरुस्ती करून वरचा तट इ. स १४५२ च्या सुमारास बांधवला त्यानंतर त्याकडे कोणी विशेष लक्ष दिलेले दिसत नाही


ह्या किल्याच्या वाटेवर दोन चांगली जैनमंदिरे आहेत ही जैन मंदिरे



तीन महिर्शे, माउट अबू




दिलवाडा, माउट अबू



अंबेर येथील राजवाडा



ब्रह्मदेवाचे मंदिर, पुष्कर



हवा महाल, जयपूर

राणा कुंभाच्या विधवेने विक्रम संवत १५१८ च्या सुमारास बांधली असे म्हणतात येथील मूर्ती पंच धातूच्या आहेत राणा कुंभ आणि त्याचा मुलगा उधा ह्यांचे पुतळे किल्ल्यावर आहेत श्रावण - भाद्रव नावाचा संयुक्त जलाशय असून तो नेहमी पाण्याने भरलेला असतो किल्ल्यावरून लांबवरचा दिसणारा देखावा भव्य आणि रमणीय आहे

चितोडगडावरील कीर्तिस्तंभ आणि मेवाडचा कुंभालगड महाराणा कुंभानेच बांधविले इ. स. १४३३ ते १४६८ पर्यंत राणा कुंभाने राज्य केले. रजपूतांच्या इतिहासात राणा कुंभाचे स्थान फार उच्च आहे

**कुमारी कन्या**—दिलवाडयाजवळ रस्त्याला लागून एक मंदिर आहे त्यात तीन पुतळे असून, त्यातला एक विद्रूप केलेला आहे ह्यांपैकी एक पुतळा वाल्मीकी नावाच्या ऋषीचा, विद्रूप केलेला पुतळा एका अबूनिवासी प्रौढेचा आणि तिसरा तिच्या मुलीचा—कुमारीकन्येचा ही अबूनिवासी प्रौढा विधवा होती आणि तिला एकच सुंदर मुलगी होती ह्या मुलीने आपल्यापासून दूर जाऊ नये, नेहमी आपल्या पदराला धरून राहावे अशी विधवेची स्वार्थी इच्छा होती, पण निसर्ग थोडाच स्वस्थ बसणार तपस्वी वाल्मीकी आणि कुमारी कन्या ह्याच्यामध्ये प्रेमभाव उत्पन्न झाला आणि त्या दोघांनी आपला विवाहबद्ध होण्याचा बेत तिला सांगितला आपल्या मुलीने विवाहबद्ध होऊन, आपल्यापासून दूर जावे हे तिला मान्य होणे शक्यच नव्हते मुलीच्या लग्नाच्या आड येणे हे जनरूढीला धरून झाले नसते, म्हणून तिने अट घातली की, जर वाल्मीकीने अबू पहाडाच्या शिखरापासून पायथ्यापर्यंत चांगला रस्ता एका रात्रीत बांधून दाखविला तरच त्या विवाहाला तिची मान्यता मिळेल तिला खात्री होती की, ही गोष्ट अशक्य कोटीतली आहे.

परंतु वाल्मीकी हा महान तपस्वी असल्यामुळे त्याचे अनेक देवांशी सख्य होते त्यांना त्याने मदतीला बोलाविले आणि सूर्यास्तावरोबर रस्ता बनविण्याचे काम सुरू केले. भरवेगाने रस्ता तयार होऊ लागला आणि तो सूर्योदयाच्या आत पूर्ण होणार, आणि वाल्मीकी पण जिंकणार असा रंग दिसू लागला. पण म्हातारी मोठी कावेबाज, तिने पहाट होण्याच्या अगोदर कोंबड्याच्या

आरवण्याचा आवाज केला आता सूर्योदय झाला, पण रस्ता अपुराच राहिला म्हानारीने वाल्मीकीला फसविले हे लक्षात येताच देव संतापले आणि त्यांनी दोघींनाहि शिळा बनवून टाकले. ते पाहून वाल्मीकीला अतिशय दु ख झाले, पण त्यावर उपाय नव्हता आपल्या भावी सासूचा अस्मीभूत देह त्याने विद्रूप केला आणि सूडाचे समाधान काही अंशी मिळविले. त्याने स्वत चा एक पुतळा तयार करवून त्याची कुमारी कन्येच्या अस्मीभूत शरीरासमोर स्थापना केली हेतु हा की, दोघांना एकमेकांकडे पाहत राहण्याचे सुख अनंत काळ लाभावे. कन्या हे परक्याचे धन असते ही सर्वमान्य रीत डावलून त्या विधवेने तीन जीवाचे जीवन मातीमोल केले.

**दिलवाडा येथील जैन मंदिरे**—अबूच्या पाहडाला भेट देणारा प्रत्येक मनुष्य दिलवाडा येथील जैनमंदिरे पाहिल्याशिवाय राहणे शक्यच नाही विश्वविख्यात जैन मंदिरे अशी पाटी दोन तीन ठिकाणी दिसते व तिचा खरेपणाही मंदिरे पाहतांच प्रत्ययाला येतो दिलवाडा येथे अशी मंदिरे आहेत हे रस्त्यावरून जाणाऱ्याच्या लक्षातही येत नाही ती आत आहेत आणि प्रवेशद्वारापाशी एकाद्या मोठ्या घराच्या भिंती दिसाव्या तसे दृश्य दिसते मंदिराच्या आसपास त्यांना वेढून पाच पंचवीस घरे आहेत एखाद्याचे डोळे बांधून त्याला रस्त्यावरून आत नेले आणि मंदिरात प्रवेश केल्यानंतर डोळ्यांवरची पट्टी काढली तर आपण एखाद्या स्वप्नमंदिरात आलो आहोत की, स्वर्गातल्या एखाद्या महालांत आलो आहोत असा संभ्रम उत्पन्न होईल अदृष्टपूर्व अशोकादी अनाकलनीय वास्तु आपण पाहात आहोत असे त्याला वाटेल त्याची मती गुग होईल आणि डोळे सानंदाश्चर्याने चमकू लागतील हृदयात गाढ आदरभाव जागृत होईल हे बघू की ते बघू, ह्याचा अर्थ समजून घेऊ की, त्याचा अर्थ समजून घेऊ, हे सर्व माणसानीच केले आहे की, मयासुराने असे प्रश्न त्याच्या मनात उभे राहतील दिलवाडा (देवळवाडा) येथे पाच जैनमंदिरे आहेत त्यापैकी (१) विमला वसिही आणि (२) लूना वसिही ही दोन विश्वविख्यात आहेत विमला वसिही मंदिर बांधण्यास १८ कोटी ५३ लाख रुपये खर्च आला आणि ते इ स १०३२ मध्ये बांधण्यात आले लूना वसिही बांधण्यास १२ कोटीपेक्षां थोडा अधिक खर्च आला लूना वसिही मंदिर इ स १२३२ मध्ये बांधले गेले

## विमला वसिहा–

हे मंदिर विमल शहा ह्याने बांधविले म्हणून त्याला विमला वसिही हे नांव आहे. विमलशहा राजा भीमदेव (पहिला) ह्याचा प्रधान होता. आदिशक्ति श्रीअंबादेवी हिने स्वप्नात येऊन तिनेच दाखविलेल्या जागेवर पहिला जैन तीर्थंकर आदिनाथ ह्याच्या स्मृत्यर्थ हे मंदिर बांधण्यात आले. २० वा तीर्थंकर मुनी सुव्रत ह्याचा पुतळा जेथे पुरलेला सापडेल तेथे हे मंदिर बांध, असा तिने विमलशहाला आदेश दिला. ती जमीन झाकण्यास जेवढे रुपये लागतील तेवढे देऊन विमलशहाने ती जमीन ५६ लक्ष रुपयांना विकत घेतली. प्रत्यक्ष मंदिर १४० फूट लांब आणि ९० फूट रुंद अशा जागेवर बांधलेले आहे.

सबंध मंदिर एकजात संगमरवरी दगडाचे बांधलेले आहे. लाकूड, लोखंड, वीट, सीमेंट, ह्याचे नाव निशाणही कोठे आढळत नाही. आत प्रवेश केला की, खाली आणि वर, पुढे आणि मागे आणि दोन्ही बाजूंना पांढऱ्या संगमरवराखेरीज काहीहि दृष्टीला पडत नाही आणि माणूस चकित होतो. विमला वसिहीत प्रवेश केला की, प्रथम हत्तीखाना दृष्टीस पडतो. हत्तींच्या छाव्याचे दहा संगमरवरी पुतळे आणि अश्वारूढ असलेली विमलशहाची पूर्णाकृती मूर्ती आपले लक्ष सहजच वेधून घेते. हत्तींच्या प्रतिमाही प्रमाणबद्ध आणि सुबक आहेत. मंदिरातील मुख्य भाग म्हणजे पहिला तीर्थंकर आदिनाथ ह्याचा श्यामलवर्ण भव्य पुतळा. डोळ्यांत रत्ने बसविलेली आहेत व ती चमकतात. गळ्यात रत्नाची माळ आहे. ह्या मंदिराच्या सभामंडपाचे छत ४८ खांबांवर आधारलेले आहे. मध्यभागी आठ खांब अष्टकोनात उभारलेले, त्यावर घुमट आहेत. घुमटाच्या आंतल्या पृष्ठभागावर अप्रतीम कोरीव काम, अप्रतीम नक्षीकाम आहे. छतहि संगमरवरीच असून, तेथील कलाकुसर अप्रतिम आहे. देव देवतांच्या मूर्ती असोत पशुपक्षी असोत, अथवा वेली, पाने व फुले असोत, प्रमाणबद्धता अद्वितीय आहे. फूटभर लांब आणि ६ इंच रुंदीच्या पाषाणावर आठ दहा आकृती रेखीवपणे खोदलेल्या पण उठावाच्या आढळतात. पाषाणाची कोरीव तोरणे पाहून अचंबा वाटतो, जोड तर अशी बेमालूम केलेली आहे की, जोड किंवा सांधा आहे हे उमगूच नये. आदिनाथाच्या सन्मानार्थंच मुख्य

मंदिर असल्यामुळे कलाकारानी आपले सर्व कौशल्य आणि हस्तलाघव तेथे जणु पणाला लाविले आहे असे वाटते लोण्यासारख्या किंवा मेणासारख्या मऊ पदार्थांवर जितक्या लीलेने व सफाईने कोरीव काम करता येईल तितक्याच कौशल्याने ह्या अनामिक शिल्पकारानी संगमरवरावर खोदकाम केलेले आहे आदिनाथाचे मंदिर हे येथील प्रमुख आकर्षण आणि म्हणूनच अत्यंत सुंदर आहे

आदिनाथाच्या मंदिराभोवती ५२ लहान लहान मंदिरे आहेत. त्यामध्ये जैनांच्या २४ तीर्थंकराचे एकाच आकाराचे व मुद्रेचे सुंदर पुतळे आहेत नैऋत्येकडच्या कोपऱ्यात माउंट अबूच्या ग्रामदेवतेचे श्रीअंबाजीदेवीचे मंदिर आहे हे मंदिर जुने आहे असे म्हणतात ह्या मंदिरावरून सबंध मंदिराची लांबी, रुंदी ठरविण्यात आली अंबाजीच्या मंदिराबाहेर नुकतेच धडावेगळे शिरकमल हातांत घेऊन उभा असलेल्या भक्ताचा पुतळा आहे आणि त्याचा कुत्रा तोंड वर करून रुधिरबिंदू तोंडात केव्हां पडतील ह्याची वाट पाहात आहे

देवीने स्वप्नात दिलेल्या दृष्टांतानुसार विसावा तीर्थंकर मुनिसूव्रत ह्याचा पुरलेला पुतळा विमलशहाला सांपडला त्याची स्थापना अंबाजी मंदिराच्या शेजारच्या मंदिरात केलेली आहे हा पुतळा इतर पुतळ्यापेक्षा वेगळा असल्याचे स्पष्ट दिसते तो काळसर पाषाणाचा आहे ५२ मंदिरे एकसारखी आणि आतले पुतळेहि एकसारखे हे जरी खरे असले, तरी मंदिराच्या दरवाजावरील सजावटीत फरक आहे प्रत्येक मंदिरापुढे चौखांबी सभामंडप आहे. प्रत्येक सभामंडपाच्या खांबावरील आणि छतावरील कोरीव कामात भिन्नता आहे प्रत्येक तीर्थंकराचे वैशिष्ट्य ह्या विविधतेत प्रतीत होते जैन वाङ्मयातील कथातले प्रसंग ह्या कलाकुसरीत गोवलेले आहेत हे सर्व बारकाईने अभ्यासावयाचे झाले तर कित्येक दिवस तेथे राहावे लागेल आणि माहितगाराच्या मदतीने खुलासा करून घ्यावा लागेल तासाभरात सर्व मंदिर पाहण्याचे काम संपविणाऱ्या आमच्यासारख्या प्रवासी लोकांच्या मनावर जो परिणाम होतो तो शब्दात व्यक्त करावयाचा झाल्यास, अतिसुंदर, अप्रतीम, अनाकलनीय कलाकृती धन्य त्या कलाकाराच्या चिकाटीची, कष्टाची आणि श्रद्धेची! ह्या शब्दात करावा लागेल सर एडविन अ‍ॅर्नाल्ड ह्या सुप्रसिद्ध

टीकाकाराने म्हटले आहे, अल्लाउद्दीनाच्या जादूच्या दिव्याची मदत असल्या-मुळे अशाप्रकारची कलाकृती निर्माण करणे शक्य झाले असावे कर्नल जेम्स टॉड म्हणतो, हे मंदिर भारतातील सर्व मंदिरात अगदी अद्वितीय आहे ताजमहाल वगळल्यास दुसरी कोणतीहि वास्तु ह्या मंदिराच्या जवळपास येण्यासारखी नाही आम्ही ताजमहाल अनेकदा पाहिला आहे. आमच्या मते विमल वसिही मंदिराशी ताजमहालची तुलनाच करता येणार नाही ताज-महाल अवाढव्य आहे, सुंदर आहे, प्रमाणबद्ध आहे पांढऱ्या संगमरवराचा आहे हे खरेच आहे, परंतु संगमरवरी दगडावरील खोदकामाचा नाजुकपणा, विविधता, कल्पकता आणि सौंदर्य ह्या बाबतीत ताजमहाल हा दिलवाडा येथील मंदिराच्या जवळपास उभा राहण्यासही पात्र नाही दिलवाडा येथील मंदिरे ताजमहाल बांधला त्यापूर्वी काही शतके बांधली गेली हेहि लक्षात घेतले पाहिजे

हजारो टन आणि एकजात पांढरा संगमरवर इतक्या उंचीवर कसा आणला असेल आणि त्यापासून इतक्या कलाकृती कशा निर्माण केल्या अस-तील, त्या कशा उभारल्या असतील आणि बेमालूम आणि पक्क्या सांधल्या असतील, हे एक कोडेच वाटते हे मंदिर विमलशहाच्या हयातीत पुरे झाले असणे अशक्य कोटीतले वाटते ह्या मंदिराने अनेक चित्रकारांना आणि शिल्पकारांना कवींना आणि लेखकांना स्फूर्ती दिली असेल आणि ह्यापुढेही देत राहील दिलवाड्याची जैन मंदिरे पाहण्याचे भाग्य लाभल्याशिवाय मला मरण येऊ देऊ नकोस अशी प्रार्थना प्रत्येक भारतीयाने परमेश्वराला करावी इतकी ह्या मंदिराची खचित योग्यता आहे.

विमल वसिही बांधविणारा विमलशहा हा केवळ शूर आणि राज्यकार्य-धुरंधरच नव्हता, तर अत्यंत उदार आणि धर्मनिष्ठ होता त्याला पुत्रसंतान नव्हते त्याने अंबेची आराधना केली अंबा त्याला प्रसन्न झाली मला पुत्र-संतान होऊ दे आणि माझ्या हातून अबूच्या पहाडावर सुंदर मंदिर बांधले जाऊ दे असे दोन वर त्याने मागितले अंबामाता म्हणाली, कोणताही एक वर मागून घे तेव्हा विमलशहाने पुत्रसंतान न मागता मंदिर बांधण्यात यश मिळावे अशी प्रार्थना केली आणि अंबामातेच्या कृपेने ती पूर्ण झाली हे आज प्रत्यक्ष दृष्टीला दिसते आहे. अबूच्या पहाडाच्या परिसराला त्यावेळी

चद्रावती असे नाव होते विमलशहा हा चद्रावतीचा राज्यपाल होता तो आणि त्याचा भाऊ नेढा हे चालुक्य, सोळंखी, राणा भीमदेव पहिला ह्यांचे डावे उजवे हात होते. नेढा होता सेनापती आणि विमलशहा होता मुख्य सचिव चद्रावतीचा सुभेदार धूमराज ह्याचा मुलगा धडुका ह्याने भीम-देवाविरुद्ध बड केले, पण ते दोघा भावानी मोडून काढले या यशाबद्दल विमलशहाला चद्रावतीचे राज्यपालपद देण्यात आले ह्या अधिकाराचा सदुपयोग करून त्याने विमल वसिही बाधून घेऊन माउट अबूला चिरतन विश्वविख्यातत्व प्राप्त करून दिले हा त्याचा मोठेपणा

ह्या दोन मदिराशिवाय आणखी तीन जैन मदिरे त्याच परिसरात आहेत पण ती अगदी साधी आहेत लूना वसिही मदिराच्या पश्चिमेला दिगबर जैन मदिर आहे. हे अगदी लहान आहे विमलवसिहीच्या पूर्वेला पित्त-लहारा मदिर आणि चौमुखा मदिर अशी दोन मोठी पण साधी मदिरे आहेत लूना वसिहीच्या दक्षिणेला कीर्तिस्तभ आहे ही सर्व मदिरे सगम-रवराची बनवलेली आहेत

**नखी सरोवर**—अबूच्या पहाडावरील प्रेक्षणीय स्थळांत नखी सरोव-राचा क्रमाक दिलवाडाच्या खालोखाल लागेल देवादिकांनी नखांनी जमीन खणून हे सरोवर तयार केले अशी दतकथा आहे अतिप्राचीन काळी बल्कली नांवाचा दैत्य फारच माजला आणि भूतलावरील यज्ञयागाची धर्मकृत्ये बद झाली त्याचा जुलूम असह्य झाल्यामुळे देवादिकानी सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवा-कडे गान्हाणे नेले त्यांनी अबूच्या पहाडावर जाऊन खडतर तपश्चर्या करावी असा सल्ला ब्रह्मदेवाने दिला त्याप्रमाणे देव तेथे गेले सुरक्षितपणे राहून तपश्चर्या करता यावी म्हणून त्यानी आपल्या नखांनी जमीन खर-वडून एक भला मोठा खड्डा तयार केला व त्यात ते राहू लागले. पुढे त्या खड्ड्यात पाणी साचून हे सरोवर तयार झाले. अजूनहि हिंदू लोक ते एक पवित्र तीर्थ मानतात त्याला प्रदक्षिणा घालतात. त्यात स्नान करतात व त्यातील पाणी तीर्थ म्हणून प्राशन करतात. हे सरोवर अदाजे अर्धा मैल लांब आणि पाव मैल रुद असून लब वर्तुळाकार आहे सरोवराभोवती डोंगर आहेत, पण ते अगदी भिडलेले नाहीत फक्त वायव्य कोपऱ्याला डोंगराचा आडोसा नाही. सरोवरात काही बारीकसारीक बेटे आहेत व त्यावरील

ताडवृक्षांनी सरोवराची शोभा वाढली आहे सरोवराभोवती सस्थानिकाचे राजवाडे, हिंदूंची मदिरे वाढली आहेत. सरोवराभोवती स्नानासाठी बाधलेले घाट आहेत. नौकाविहाराचीहि सोय आहे आजूबाजूच्या डोंगरांवरून झेपेल तितकी रपेट करणेची सोय हाहि एक चागला व्यायाम आणि निसर्ग-सौंदर्याची मेजवानी मिळण्याची सधी आहे नखी सरोवरापाशी गांधीपार्क नांवाचे सुदर उद्यान आहे

**लूना वसिही**—हे मदिर वस्तुपाल आणि तेजपाल ह्या दोन कलावतानी इ स. १२३२ मध्ये बाधून पूर्ण केले आणि आपला थोरला भाऊ लूना ह्याचे नाव त्याला दिले हे मदिर बावीसावा जैन तीर्थंकर नेमीनाथ ह्याच्या स्मृतीला अर्पण केलेले आहे. मध्यवर्ति मदिरात नेमीनाथाची काळ्या पाषाणाची रत्नजडित मूर्ती आहे ह्या मदिराची बांधणी २०० वर्षे उशीरा झालेली असल्यामुळे त्याच्या भव्यतेत साधेपणाचा मिलाफ झालेला असावा आणि नक्षीकामाचा अतिरेक कमी असल्यामुळे त्याचे सौंदर्य वाढले आहे ह्या मदिराचे स्तभ अधिक मोठे आहेत, पण त्यात बेडौलपणा मुळीच नाही

ह्या मदिराच्या घुमटाच्या आत समकेंद्र वर्तुळ आखून त्याचे विभाग पाडलेले आहेत आणि प्रत्येक विभागांत अप्रतिम कोरीव काम केलेले आहे एका विभागात वसताच्या आगमनाचे व वसतोत्सवाचे दृश्य रेखाटलेले आहे. वसतागमनाचा आनद चित्रित केलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मुखावर ओसडत आहे इतर विभागातून फुले, फळे, पक्षी, ह्याची गर्दी आहे विविध पावित्र्यांत उभे असलेले शूर योद्धे, देखणे यक्ष आणि अप्सरा ह्याचीहि गर्दी आहे हा घुमट म्हणजे स्थापत्यकलेचा परमोच्च नमुना आहे

मध्यवर्ति नेमीनाथ मदिराभोवती इतर तीर्थंकरांची लहान लहान मदिरे आणि प्रत्येकापुढे अप्रतीम खोदकामाचे चौखाबी मडप आहेतच

प्रवेशद्वारापाशी देराणी-जेठाणी के आलिया नावाने ओळखले जाणारे दोन मोठे कोनाडे आहेत हे कोनाडे दोघा शिल्पकाराच्या पत्नीच्या अध्यात्मिक कल्याणासाठी बाधले असे समजते प्रत्येकात १६ वा तीर्थंकर शातिनाथ ह्याचे सुबक पुतळे आहेत. ह्या कोनाड्यांना छोटयाशा मडपी सुबक स्तभावर बसविलेल्या आहेत त्याच्या साधेपणात आणि अतीव सुबकपणात

त्याचे सौंदर्य आहे प्रत्येक रेषा आणि पृष्ठभाग म्हणजे भूमितीच्या दृष्टीने आदर्श नमुने ठरतील ह्या दोन कोनाड्यांसाठी सवा लाख रुपये खर्च आला असे सांगितले जाते लूना वसिही ह्या मंदिरातही हत्तीखाना आहे हत्तींचा आकार, त्यांच्या अंगावरील कोरीव लवाजमा आणि तेथे असलेले संगमरवरात खोदलेले जाळीकाम सर्वच प्रेक्षणीय आहे खोदकाम कलेच्या कौशल्याची परिसीमा ह्या ठिकाणी गाठलेली आहे मण्यांची तोरणे एकाच संगमरवरी दगडातून कातून कोरून आणि छेद घेऊन केलेली आहेत एखादा ठोका जरा अधिक जोराने पडला की सर्व काम मातीमोल व्हावयाचे

दिलवाडा मंदिराचे शिल्पकार केवळ शिल्पकार नव्हते तर निसर्गाचा सूक्ष्म अभ्यास करणारे निसर्गपंडित, कल्पनाविलासात रंगणारे रसिक, कवी, श्रेष्ठ दर्जाचे चित्रकार होते शिवाय ते प्रसिद्धीपराङमुख होते त्यांनी आपली नावे कोठेही कोरलेली नाहीत आपण जे कष्ट करीत आहोत ती परमेश्वराची सेवा आहे आणि आपल्या अंगात असलेली कला पूर्णांशाने सत्कारणी लावणे हे आपले पवित्र कर्तव्य आहे, अशा श्रद्धेने त्यांनी वर्षानुवर्षे आपले हात आणि डोळे शिणविले

**रघुनाथजी मंदिर**– नखी सरोवराशेजारीच रघुनाथजीचे सुंदर मंदिर आहे प्रसिद्ध प्रचारक रामानंद ह्याने हे मंदिर चौदाव्या शतकात स्थापन केले मंदिराशेजारी निरनिराळया कवेन्या आणि धर्मशाळा आहेत.

**सनसेट पॉईंट**– महाबळेश्वरला जसा बॉम्बे पॉइंट तसा अबूच्या पहाडावर सूर्यास्त पॉइंट आहे ह्या ठिकाणापासून सूर्यास्ताची शोभा अपूर्व दिसते

**सेंट्रल पोलीस ट्रेनिंग कॉलेज**– अखिल भारतीय श्रेणीचे पोलीस अधिकारी ( Police officers ) तयार करण्याचे विद्यालय माऊंट अबू येथे आहे दरवर्षी १०० विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो

**श्री अंबाजी**– अबूरोड स्टेशनपासून नैऋत्येला १४ मैलावर श्री अंबाभवानीचे मंदिर पहाडावर आहे हा पहाड फारसा उंच नाही आणि वाटेवर दोन्ही बाजूस मध्यम उंचीच्या वृक्षांची दाटी आहे १४ मैलांपैकी पहिले ८ मैल राजस्थानात आणि उरलेले ६ मैल गुजराथमध्ये पडतात शक्ति

पंथियांचे हे पवित्र क्षेत्र आहे दर पौर्णिमेला फार मोठी यात्रा भरते सौराष्ट्र आणि राजस्थानातील लोकहि ह्या देवीला फार मानतात

देऊळ फार पुरातन आहे, कारण ते ७ व्या शतकातहि हल्ली इतकेच प्रसिद्ध होते असे इतिहासावरून दिसते

अंबाभवानीचे मंदिर चौरस असून, पांढऱ्या संगमरवराचे बांधलेले आहे बाहेरून मजबूत तटबंदी आहे अंबा भवानीची मूर्ती अगदी साधी आहे. अनेक वस्त्रालंकारांनी ती मढविलेली असते देवीला वाहण्यासाठी पंचखाद्या सारखा रुचकर मेवा मिळतो त्यात सोललेल्या व वाळवलेल्या शर्करावगुंठित भोपळ्याच्या बिया, साखरफुटाणे, खडीसाखर, काजू असे पदार्थ असतात देवळात यात्रेकरूंची ये जा पुष्कळ आढळली बाजारहि बराच मोठा आहे तुळजापूर आणि कोल्हापुरातील अंबाभवानीसारखीच ह्या देवीची प्रसिद्धी ह्या भागात आहे देवीपुढे तीन चार सिंहाचे पुतळे आहेत-

---

प्रकरण १०.

# भारताचे गुलाबी शहर – जयपूर

जयपूर हे भारतातले सर्वांत देखणे शहर अत्यंत पद्धतशीर रीतीनें रचलेले, नगर रचनेंचा एक आदर्श नमुना असे हे शहर आहे नवनिर्मित राजस्थान राज्याची ही राजधानी आणि पूर्वीच्या जयपूर संस्थानची राजधानी

जयपूरचा विस्तार १६ चौरस किलोमीटर असून लोकसंख्या अंदाजे ६ लक्ष आहे गुलाबी रंगाच्या दगडाच्या सुंदर इमारती, इमारतींवर शोभणाऱ्या अंबारीसारख्या मंडपी, सरळ रेषेत आणि एकमेकास समांतर असे लांबच लांब प्रशस्त रस्ते, रुंद पादपथ इत्यादीमुळे हे शहर पाहणाऱ्याचे मन ताबडतोब वेधून घेते नवीन इमारती भव्य, प्रमाणबद्ध व सुंदर आहेत. शहराभोवती नगरभिंत असून नगराला आठ वेशी आहेत त्याना पोळ म्हणतात सर मिर्झा इस्माइल रोड, चौडा रोड, चौपर, चांदपोळ, चौक बजार इत्यादी केंद्रे ठळकपणे नजरेत भरतात

जयपूर शहर इ स १२७८ मध्ये कच्छचा रजपूत महाराजा सवाई जयसिंग ह्यानें वसविले, तो पंडित, खगोलशास्त्रज्ञ, शास्त्र विषयाचा व्यासंगी, विद्वान, इतिहास संशोधक आणि मुत्सद्दी होता सवाई जयसिंग हा जहांगीर आणि शहाजहान ह्यांचा समकालीन होता आणि तत्कालीन ऐतिहासिक घटनामध्ये त्याने महत्वाचा भाग घेतला त्याने मोठ्या धोरणीपणाने राज्य केले सवाई जयसिंगाने हे शहर वसविले म्हणून त्याचे नांव जयपूर झाले सर मिर्झा इस्माइल जयपूरचे दिवाण असताना त्यांनीहि ह्या शहराच्या सौंदर्यात मोलाची भर घातली आणि विस्तार केला विद्यमान महाराज महाराजा सवाई मानसिंग आणि राणी गायत्रीदेवी ह्यांचेही ह्या शहराच्या विकासाकडे बारीक लक्ष आहे वेद काळात ह्या प्रदेशाला मत्स्य

देश असे नांव होते महाभारत काळी ह्याच प्रदेशात विराटनगरी होती असा काहीं लोकाचा दावा आहे उत्तरा आणि अभिमन्यु ह्याचा विवाह ह्याच नगरीत झाला ह्या सर्वाचा अर्थ इतकाच की, हा प्रदेश फार प्राचीन काळापासून प्रख्यात आहे

जयपूरचे नवीन स्टेशन फारच भव्य आणि सुदर आहे स्टेशनच्या बाहेर पडले की शहर सुरू होते

**हवा महाल**–ही गुलाबी दगडाची पाचमजली अरुद इमारत आहे हिचा दर्शनीभाग प्रेक्षणीय आहे आणि अनेक गवाक्षे, कमानी, छोटचा छोटचा मडपी ह्यामुळे ती उठून दिसते हा महाल महाराजा प्रतापसिंह ह्याने इ स १७९९ मध्ये बाधविला महाल ह्या शब्दाने जी कल्पना मनात येते ती हवामहालाच्या बाबतीत खरी ठरत नाही आपल्या-कडच्या एखाद्या खणाइतकीहि त्याची रुदी नाही काही लोक तर तिला एक विटेची भिंतच म्हणतात रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुका स्वत अदृश्य राहून पाहण्याची सोय राण्याना करून देण्यासाठी हा महाल बांध-विला. नाजुक राण्याना साजेल अशीच ही इमारत नाजुक आहे

**जंतरमंतर**–हवामहालाच्या आवारातच ही वेधशाळा आहे महाराजा जयसिंह दुसरा ह्याने ही वेधशाळा इ स १७१८ ते १७३४ ह्या काळात बाधवून घेतली हा स्वत मोठा खगोलशास्त्रज्ञ होता आणि तेथील काही यत्रे ह्याने स्वत च्या कल्पनेने बसवून करवून घेतली असे म्हणतात सूर्यचक्र ध्रुवतारादर्शक, नारीवलय, राशीवलय, क्रांतिवृत्त, जयप्रकाश, उन्नतांस यत्र, चक्रयत्र, यत्रराज अशी अनेक भव्य उपकरणे आहेत अशाच वेधशाळा उज्जैनी आणि दिल्ली येथे आहेत, पण जयपूरची ही वेधशाळा सर्वातच मोठी आहे असे तज्ज्ञाचे मत आहे

**रामनिवास बाग आणि आल्बर्ट हॉल**–ही बाग फारच विस्तृत आणि सुदर आहे रेखीव माडणी, प्रशस्त हिरवळी, कारंजी, लहान मोठे वृक्ष इत्यादींमुळे ही बाग अतिशय रमणीय आहे ह्या बागेत अनेक मोर आहेत आणि ह्या वृक्षावरून त्या वृक्षावर, वृक्षावरून धरणीवर आणि धरणीवरून वृक्षावर उडतात तेव्हा मन आनंदित होते केव्हाहि पाहिली तरी सारखीच सुदर दिसणारी बाग असे हिचे वर्णन करतात

ह्या उद्यानाला लागून अल्बर्ट हॉल ही अत्यंत सुंदर आणि भव्य इमारत आहे आणि तेथे जयपूरचे म्युझियम आहे इ स १८७६–८७ ह्या वर्षांत ही इमारत ५ लक्ष रुपये खर्चून बांधली एखादा राजवाडा आहे असे वाटावे इतकी तो सुंदर इमारत आहे किंबहुना जयपूरमध्ये इतकी देखणी इमारत दुसरी नाही रोमन, भारतीय पार्शियन स्थापत्यकलाचा संगम ह्या इमारतीत झाला आहे असे तज्ज्ञाचे मत आहे

**विजयस्तंभ**–जयपूरच्या मध्यभागी त्रिपोलिआ गेटाजवळ हा अष्टकोनी सात मजली जयस्तंभ आहे. त्याला इश्री घाट लाट, इश्री मिनार, विजय-स्तंभ, स्वर्गबाण अशी विविध नांवे आहेत. महाराजा इश्रीसिंग ह्याने सबंध शहरावर दृष्टिक्षेप टाकता यावा म्हणून हा मनोरा बांधवला प्रत्येक मजल्यावर सज्जे आहेत आणि शिखरापाशी मंडपी आहे एखाद्या उंचच उंच रखवालदाराप्रमाणे हा मनोरा जणु काय अहोरात्र जयपूरचे रक्षण करीत आहे असे वाटते

**गलथा**–गलथा हे कुंड आहे व ते हिंदु लोक पवित्र मानतात. चोहों-बाजूनी डोंगरानी वेढलेले हे एक तपोवन आहे आणि गालव मुनीनी येथें तपश्चर्या केली असे म्हणतात. डोंगरावरील एका गोमुखातून बारा महिने पाण्याची मंदशी लाट पडत असते आणि ते पाणी कुंडातून खाली वाहत जाते ह्या झऱ्याचा उगम प्रयत्न करूनही सापडलेला नाही आणि हे पाणी कोठे गडप होते तेहि समजत नाही असे सांगतात गालव ऋषींनी कोणाचा तरी कुष्टरोग बरा करण्यासाठीं हे पवित्रजल येथे आणले अशी दंतकथा सांगतात तप करायला हे योग्य स्थान आहे हे मात्र पटते.

**सिरोहीच्या राणीचा बगीचा**– गलथ्याच्या वाटेवर सिरोहीच्या राणीचा एक लहानसा पण सुंदर प्रासाद आणि त्याच्यासमोर एक सुंदरसा बगीचा आहे

**जयपूरचा बाजार**–जयपूर हे शहर व्यापाराचे मोठे केंद्र आहे मिश्र धातूच्या शोभेच्या सुबक वस्तू, संगमरवराचे खलबत्ते, पोळपाट, इमारती-च्या प्रतिकृती, देवताच्या मूर्ती जयपूरमध्ये तयार होतात. कारखान्यात तयार झालेल्या वस्तूचा बाजार तर मोठाच आहे बांधणी साडी ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सहावारी साड्या हे एक जयपूरचे वैशिष्ट्य आहे

बायकांची गर्दी साहजीकच अशा दुकानात जास्त असते जयपूरची नक्षीदार जाजमे प्रसिद्ध आहेत जरतारी भरतकाम हेहि जयपूरला फार सुबक होते. मिर्झा इस्माइल रोडने एक फेरी मारली तर अतिशय चांगली सजविलेली आकर्षक दुकाने पाहून आपणहि आठवणीदाखल काहीतरी घ्यावे असे वाटल्यावाचून राहात नाही. मोठमोठ्या काचेच्या तावदानाआड मांडलेल्या वस्तु पाहणे हा देखील एक सुखद अनुभव वाटतो इतक्या सुंदर वस्तु आपल्या भारतातल्या जयपूरमध्ये होतात ह्याचा अभिमानही वाटतो. जयपुरी नक्षीदार चढाव तर प्रसिद्धच आहेत पातळ, हलके आणि सुंदर नक्षीकाम केलेले चढाव घालण्यात ऐट आहे बंद बांधण्याची कटकट नाही. शिवाय ते साबण लावून धुता येतात असेहि समजले.

जयपूरची भाजीची दुकाने पाहून फार समाधान होते फुलवर आणि वांगी तर देखणी वाटतात आणि विपुल व स्वस्त मिळतात पेरू हे फळ तर फारच लोकप्रिय आहे. इतर फळांचीही रेलचेल आहे जयपूरला काहीही खरेदी न करणारा माणूस स्थितप्रज्ञच म्हणावा लागेल

**परित्यक्तं ग्रामम् आमेर किंवा अम्बेर**–जयपूरपासून पाच मैलावर राजस्थानची मध्ययुगीन राजधानी अम्बेर वसलेली आहे. अकराव्या शतकात शूर कछवा सरदारांनी मीनांचा पराभव करून हे गाव वसविले. चोहो बाजूनी डोंगर आहेत. अम्बेर हे नांव अम्बरीष ऋषीवरून पडले असे कोणी म्हणतात तर ते अम्बाभवानीदेवीवरून पडले असे कोणी म्हणतात. एका सुंदर तलावाच्या काठी एका डोंगरावर अम्बेरचा सुप्रसिद्ध किल्ला बांधलेला आहे हा किल्ला इ स. १६०० मध्ये महाराजा मानसिंग ह्याने बांधावयास सुरुवात केली आणि तो महाराजा सवाई जयसिंगाच्या कारकीर्दीत अठराव्या शतकात पूर्ण झाला. इतका भव्य आणि सुंदर किल्ला भारतात अन्यत्र नाही. दिल्लीचा लाल किल्ला आणि आग्र्याचा आग्रा फोर्ट अम्बेरच्या किल्ल्यापुढे फिके पडतील जयपूर राजधानी झाल्यापासून अम्बेरचे महत्व नष्ट झाले आणि आता एक प्रेक्षणीय स्थळ ह्यापेक्षा त्याला अधिक महत्व राहिलेले नाही म्हणूनच अम्बेरला परित्यक्त ग्रामम् असे म्हणतात.

अम्बेर किल्ल्याभोवती मजबूत तट आहे आणि किल्ला लढविण्याच्या

दृष्टीने तो बांधलेला आहे. महाराजा मानसिंग ह्याने तरुणपणीच अकबराची मर्जी संपादन केली आणि सेनापतीपद मिळविले मानसिंग अतिशय शूर आणि पराक्रमी होता. दिसायला तो वर्णाने काळा आणि कुरूप होता. एकदा अकबराने त्याला विचारले, राजाजी, ब्रम्हदेवाने सौंदर्याची वाटणी केली तेव्हा तुम्ही कुठे होतात हजरजबाबी राजा मानसिंगाने अकबराला चोख उत्तर दिले, जहापन्हा, त्या वेळी मी शक्तीचा संग्रह करीत होतो, अम्बेरचा किल्ला महाराज मानसिंगाला अकबराच्या कृपेमुळे आणि त्याच्या वंशजांना मोगल सम्राटाच्या कृपेमुळे बांधता आला ही गोष्ट मनाला खटकते आणि वाईट वाटते. राजा मानसिंग हा राणा प्रतापाचा समकालीन राणा प्रतापाने मरेपर्यंत स्वातंत्र्यासाठी कष्ट आणि हाल सोसले आणि मोगलांना शरण जाण्याचे साफ नाकारले ह्या उलट राजा मानसिंगाने मोगलाचे सार्वभौमत्व कबूल करुन सोन्याच्या पिंजऱ्यातले वैभव पत्करले आणि आयुष्यभर चैनीचे सुखविलास भोगले, त्याला बारा राण्या होत्या आणि अम्बेरच्या राजवाड्यात प्रत्येकीसाठी केलेली स्वतंत्र व्यवस्था दृष्टीस पडते. राजा मानसिंग अकबराचा मांडलिक न बनतां जर राणा प्रतापाला मिळाला असता तर भारताचा इतिहास काही वेगळाच झाला असता.

हे विचार मनात येत राहिल्यामुळे, अम्बेर हा किल्ला पाहतांना मनाला प्रसन्नता वाटली नाही एवढे मात्र खरे शोभिवंत व भव्य प्रवेशद्वार, संगमरवरी इमारती, शीशमहाल किंवा हजारो छोटे छोटे आरसे भिंतीत व छतात भव्य आणि प्रेक्षणीय ठिकाणे अम्बेर राजवाड्यात आहेत पट्टराणीसाठी जुनी रिक्षा आहे व तिच्यासाठी स्वतंत्र बंदिस्त रस्ता आहे.

अम्बेर किल्ला चढून जाण्यास हतीची सोय आहे. आम्ही पायीच चढलो. वरपर्यंत जाण्यास लहान मोटारीनी जाण्यासारखी सडकही आहे

## आमेर किंवा अम्बेर किल्ल्यातील प्रेक्षणीय स्थळें—

**राजभवन**—अम्बेर किल्ल्यावरील एका उंचवट्यावर राजभवन किंवा राजवाडा अगदी उठून दिसतो. मध्यकालीन शिल्पकलेचा उत्कर्ष येथे साधलेला आहे. संगमरवराचा उपयोग मुक्त हस्ताने केलेला आहे. प्रमाणबद्धता निर्दोष आहे ह्या राजवाड्यातून सभोवतालचे दृश्य अतिशय मनोहर दिसते. नैसर्गिक सौंदर्य आणि मानवनिर्मित सौंदर्य ह्याचा सुंदर संगम अम्बेर

किल्ल्यावर बांधलेला आहे

**दिवाण – इ – आम**—आग्रा दिल्लीच्या धर्तीवर पण तेथील दिवाण - इ - आमपेक्षा अधिक सुंदर असा येथील दिवाण - इ - आम आहे स्त्रियांसाठी जाळीदार भिंतीने बंदिस्त केलेला विभाग आहे. पहिल्या जयसिंगाने दिवाण इ - आम ही इमारत बांधविली. दिवाण इ - आमच्या छताला शारदीय पौर्णिमेची चांदणी म्हणतात

**दिवाण – इ – खास किंवा जयमंदिर**—खास लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी बांधविलेला हा महाल असून ह्यातच शीशमहाल किंवा काचमहाल आहे. भिंतीवर आणि छतावर बहिर्गोल आरशाचे हजारो लहान लहान तुकडे बसविलेले असून, त्यात एकाच वेळी असंख्य प्रतिबिंबे दिसतात व मोठी मौज वाटते भारतातील इतर शीश महालांपेक्षा हा शीशमहाल अतिशय सुंदर आहे दिवाण - इ खासच्या समोर मोठा बगीचा असून त्यांत अनेक कारंजांची व्यवस्था केलेली आहे दिवाण - इ खासच्या प्रत्येक खांबावर सुंदर महिरपी खोदलेल्या आहेत, जाळीदार अच्छादनी मंडपीमध्ये राजस्त्रियांना बसून समारंभ, मिरवणुकी वगैरे निर्वेधपणे पाहण्याची सोय केलेली आहे.

**सुखमंदिर**—दिवाण - इ - खासच्या समोर पण बगीचाच्या पलीकडे सुखमंदिर आहे उन्हाळ्याच्या दिवसात राजघराण्यांतील स्त्री - पुरुष येथील गारव्यात विश्रांतीसाठी जमत असत. पश्चिमेकडून थंडगार वारा येण्याची येथे सोय आहे छायेत असलेला संगमरवर तापत नाही हा त्याचा मोठा गुण आहे.

**काली मंदिर**—संगमरवरी दगडाचे बांधलेले हे काली किंवा शैलादेवीचे मंदिर अतिशय सुंदर आहे. कमलासनावर बसलेली धातूची बनविलेली वीस भुजांची अलंकारमंडित कालिका मूर्ती प्रेक्षकाचे लक्ष वेधून घेते. तेथेच दुर्गादेवीची श्यामलमूर्तीहि एका भागात आहे हिला आदि शक्तीचे प्रतीक मानतात महाराजा मानसिंगाने बंगाल जिंकून घेतल्यावर ही मूर्ती तेथून आणली.

अम्बेर येथील प्रेक्षणीय ठिकाणे वर्णनातीत आहेत. ती प्रत्येकाने समक्ष आणि सावकाशपणे पाहिल्याशिवाय त्यांच्या सौंदर्याची यथार्थ कल्पना येणे केवळ अशक्य आहे.

## प्रकरण ११.

# पुष्करतीर्थ व अजमेर

अजमेरपासून ७ मैल किंवा ११ किलोमीटर अंतरावर सुप्रसिद्ध पुष्कर-तीर्थ आहे हयाला ब्रह्मपुष्करतीर्थ असेहि म्हणतात पुष्कर येथे भारतात एकमेवाद्वितीय असलेले भगवान ब्रह्मदेवाचे प्रेक्षणीय मंदिर आहे

पुष्कर तीर्थाच्या उत्पत्तीसंबंधी पुढील कथा प्रसिद्ध आहे. सत्ययुगांत एकदा भगवान ब्रह्मदेवाला पृथ्वीवर यज्ञ करण्याची इच्छा झाली, परंतु यज्ञासाठी स्थळ कोणते निवडावयाचे ते लक्षात येईना म्हणून ब्रह्मदेवाने स्वर्गातून एक कमलपुष्प पृथ्वीवर फेकले. ते कमलपुष्प तीन ठिकाणी पडले व तिन्ही ठिकाणी उत्तम पाणी प्रगट झाले. प्रथम जेथे कमळाचा एक भाग पडला त्या स्थळाला ज्येष्ठ पुष्कर हे नाव पडले पुष्प-कर अशी पुष्कर ह्या शब्दाची व्युत्पत्ती मानतात.

ज्येष्ठ पुष्कर येथे ब्रह्मदेवानें एक योजन भूमी यज्ञासाठी निश्चित केली ब्रह्मदेव यज्ञ करणार हे समजल्यावर इंद्रादि सर्व देवदेवता यज्ञासाठी उप-स्थित झाल्या आपल्या जामदारखान्यासह कुबेर आला विश्वकर्मा, बृहस्पती इत्यादी देव कामाला लागले. ब्रह्मदेवाने आपली पत्नी सावित्री हिलाहि निमंत्रण धाडले व त्या कामावर आपला पुत्र नारद ह्याची योजना केली. ऋषिपत्नींना घेऊन तू ये असे नारदाने सावित्रीला सांगितले. सावित्रीने पवन देवाला ऋषिपत्नींना निमंत्रण देण्यासाठी धाडले

इकडे यज्ञाचा शुभ मुहूर्त जवळ येत चालला तरी सावित्री आली नाही. ब्रह्मदेवाने यज्ञासाठी दुसरी पत्नी करण्याचे ठरवून इंद्राला वधूसंशोधनासाठी रवाना केला. इंद्राला एक सुंदर गुर्जर तरुणी अरण्यांत आढळली इंद्राने तिला गाईच्या मदतीनें शुद्ध करून यज्ञमंडपात आणले आणि ब्रह्मदेवाने

वेधशाळा, उज्जैन



पिचोला सरोवर, उदेपूर




राणा प्रताप व त्याचा घोडा चेतक





नऊ मजली विजयस्तंभ, चितोडगड →

सात मजली कीर्ती– स्तंभ आणि

जैन मंदिर, चितोडगड ↓








उदयपूर येथील राजवाडा



जोहारकुंड, चितोडगड



गोपाळ मंदिर, उज्जैन



रुक्मिणी मंदिरापुढील
सोमनाथमंदिराचे प्रवेशद्वार, द्वारका



महाकाळेश्वर मंदिर, उज्जयिनी



संत मीराबाई मंदिर, चित्तोडगड

तिच्याशी विवाह करून गायत्री असे तिचे नांव ठेवले. ब्रह्मदेव आणि गायत्री ह्यांनी पुण्याहवाचन ठेऊन यज्ञकर्माला प्रारभ केला. काही वेळानें सावित्री आली आणि पाहते तो आपल्या पतीशेजारी गायत्री बसलेली मत्सराने पेटलेली सावित्री स्वस्थ थोडीच बसणार ? पृथ्वीतलावर पुष्कर खेरीज अन्य कोठेही तुझी पूजा केली जाणार नाही असा तिने नवऱ्याला शाप दिला त्यामुळे भारतात पुष्करखेरीज अन्य कोठेही ब्रह्मदेवाचे मंदिर आढळत नाही. गायत्रीला गाईनें शुद्ध केले होते म्हणून, तू विष्टा भक्षण करशील आणि तुझे मुख अपवित्र राहील असा गाईला शाप दिला शिव, विष्णू, इंद्र, पवन, कुबेर ह्या सर्वांना तिने शाप दिले ब्रह्मदेवाने तिचा क्रोध शांत करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, गायत्री तुझी दासी होईल असे आश्वासन दिले, परतु सावित्री बधली नाही ती रागारागाने निघून गेली आणि शेजारच्या एका डोंगरावर तपश्चर्या करू लागली ती अद्याप त्या डोंगरावर मूर्तिरूपाने आहे सावित्री निघून गेल्यावर सर्वांनी गायत्रीपाशी सावित्रीनें दिलेल्या शापांचे निराकरण करण्याचे उपाय सुचविले गायीला ती म्हणाली तुझे मुख जरी अपवित्र राहिले तरी लोक तुला पवित्र मानतील ब्रह्मदेवाला तिने दिलासा दिला की, पुष्करतीर्थात स्नान करून तुमचे दर्शन घेतल्याशिवाय कोणाचीहि चार धामाची यात्रा परिपूर्ण होणार नाही सावित्रीच्या शापामुळेच विष्णूला पुढे रामावतार घ्यावा लागला

ब्रह्मपुष्करतीर्थ नावाचा जो तलाव पुष्कर येथे आहे तो खूपच विशाल असून पाणी चागले आहे हे तीर्थ सर्व तीर्थात पवित्रतम तीर्थ आहे तलावाच्या चारी बाजूनी बावन्न सुदर घाट बांधलेले आहेत. ब्रह्मघाट आणि गौघाट हे मुख्य घाट होत. महात्माजी, पडित नेहरू आणि शास्त्रीजी ह्यांच्या अस्थींचा कांही भाग पुष्कर तीर्थात विसर्जित करण्यात आला. पुष्कर येथे अनेक धर्मशाळा आहेत त्यांत एक महाराष्ट्रीय धर्मशाळाहि आहे

पुष्कर येथे शेकडो मदिरे आहेत. त्यातले मुख्य मदिर ब्रह्मदेवाचे हे मदिर काहीसे उंचावर बांधले असून, सुस्थितीत असल्यामुळे प्रेक्षणीय आहे. मदिरात ब्रह्मदेवाची चतुर्मुख सुदर मूर्ती आहे गायत्रीची मूर्ती अर्थात

आहेच नवीन रङ्गनाथजी मदिर शेट मगनीरामजी बांगड ह्यांनी नुकतेच बनविले असून, त्यावर सुदर गोपूर आहे डोंगरावर सावित्री मंदिर लहान असले तरी त्यातील मूर्ती सुदर आहे

पुष्कर हे निसर्गरमणीय स्थान आहे. कार्तिकी पौर्णिमेला पुष्कर येथे मोठी यात्रा भरते.

**अजमीर**–अजमीर हे राजस्थानमधले एक महत्त्वाचे शहर असून, जयपूर पासून १३६ किलोमीटर अतरावर आहे फुलेरा–मारवाड रेल्वे मार्गावरचे हे महत्त्वाचे स्थानक आहे, रघुवशातल्या प्रसिद्ध अज राजाची ही राजधानी होती ह्या शहरावर गझनीचा महमद, महमद घोरी, तैमूरलग आणि अकबर ह्याच्या स्वाऱ्या झाल्या पृथ्वीराज चौहानाने महमद घोरीचा अनेकदा पराभव केला पण शेवटी तो अयशस्वी ठरला आणि पकडला गेला त्याला क्रूरपणे ठार करण्यात आले

जयपाल चौहान नावाच्या धनगराने सातव्या शतकात हे शहर वसविले असेहि समजतात त्याने तारागड नावाचा मजबूत डोंगरी किल्लाहि बाधला इ स १५५९ मध्ये अजमीर जिकून घेतल्यावर, अकबराने हा किल्ला बाधवून घेतला असेहि सांगतात अरवली पर्वताच्या उच टेकड्यानी अजमीर शहर वेढलेले आहे. त्यामुळे त्याला एक विशेष सौदर्य प्राप्त झाले आहे ह्यात सशय नाही कोंदणात बसविलेल्या रत्नासारखे ते दिसते तारागड हा किल्ला आणि अनासागर हा विस्तीर्ण तलाव आणि त्याला लागून असलेले दौलत उद्यान ह्यामुळे अजमीरचे सौदर्य खुलून दिसते, ख्वाजा मोइनुद्दीन खिस्ती ह्या मुसलमान सताचा दर्गा हे अजमीरचे एक खास वैशिष्ठ्य आहे ह्या दर्ग्यामुळे अजमीर हे मुसलमानाचे पवित्र क्षेत्र बनले आहे ह्या दर्ग्यात दोन मोठे हडे असून एकात ७० मण तादुळाचा आणि दुसऱ्यात २८ मण तादुळाचा भात शिजतो असे सांगतात ख्वाजा मोइनुद्दीन खिस्ती ह्याच्या उरूसाच्या वेळी फार मोठ्या सख्येने मुसलमान यात्री येथे येतात तेव्हा ह्या हड्याचा उपयोग करतात भारतातला हा सर्वात मोठा दरगा आहे

**दौलतबाग** –ही जहांगीर बादशहाने करविली आता तिचे नाव सुभाषबाग ठेवले आहे प्रवेशद्वाराशी नेताजी सुभाष ह्यांचा पुतळा आहे स्वामी-

भक्त पन्नादाईचा पूर्णाकृती पुतळा बागेत आहे स्वत च्या मुलाचा बळी देऊन वाचविलेल्या राजपुत्राला घेऊन पळून जात असताना ती ह्या उद्यानात विसावली होती उद्यान प्रेक्षणीय आहे

**आनासागर**–हा विस्तीर्ण पण कृत्रिम तलाव आहे. आनाजी चौहान ह्या शूर वीराने ह्याच ठिकाणी असंख्य शत्रूची कत्तल केली म्हणून त्याचे नाव ह्या तलावाला दिले आहे संगमरवरी दगडाच्या दोन टुमदार पण सुंदर इमारती, तलाव आणि उद्यान ह्यांच्या दरम्यान आहेत त्याहि प्रेक्षणीय आहेत शहाजहान बादशहाने हा तलाव बांधला

**अढाई दिन की झोपडी**–महमद घोरीने केवळ अडीच दिवसात ही प्रशस्त दगडी इमारत उभी केली असे म्हणतात. पण ते खरे नाही हे एक मोठे जैन मंदिर होते. त्याची अडीच दिवसांत महमद घोरीने मशीद बनविली असे दिसते सर्व बांधकाम मंदिराचे आहे हे कोरीव कामावरून स्पष्ट दिसते अनेक सुंदर खांब आणि कमानी, नक्षीकाम केलेले छप्पर इत्यादीमुळे ही इमारत म्हणजे एक प्रशस्त सभामंडप वाटतो ही इमारत पाहून मन विषण्ण होते

**सोनामंदिर**–भगवान श्री ऋषभदेव दिगंबर जैन मंदिर प्रेक्षणीय आहे सोन्याचा मुलामा सर्वत्र दिलेला असल्यामुळे सोनामंदिर हे नाव शोभून दिसते जैन वाङ्मयातले अनेक प्रसंग ह्या मंदिरात चित्रित केलेले आहेत

**तारागड**–चौहान राजा अजयपालाने हा किल्ला ८०० फूट उंच डोंगरावर बांधलेला आहे आणि जणु काय तो अजमीरच्या रक्षणासाठी खडा आहे असे वाटते वरती गेल्यावर थंड वाऱ्याच्या झुळुकीमुळे फार प्रसन्नता वाटते वरती एक मशीद आणि प्राचीन इमारतींचे अवशेष आहेत वरून अजमीर शहर आणि त्याचा परिसर ह्यांचे सुंदर दर्शन घडते आणि चढण्याचा शीण नष्ट होतो असे सांगतात किल्ल्याभोवती भक्कम तटबंदी आहे तारागडामुळे अजमीरला भारताचे जिब्राल्टर म्हणतात

## प्रकरण १२.

# . मेवाड

### भारतीय इतिहासांतील सोनेरी पान

मेवाड ह्या राजस्थान राज्याचा एक भाग बनल्यामुळे त्याला राजकीय-दृष्ट्या स्वतंत्र अस्तित्व राहिले नाही हे खरे असले, तरी राणा प्रताप आणि मीराबाई ह्यांच्या वास्तव्याने आणि कर्तबगारीने पुनीत झालेले मेवाड भारतीय इतिहासात नेहमी गौरवानेच उल्लेखले जाईल, ह्यात संशय नाही. देशभक्ती, शौर्य, आणि असीम स्वार्थत्याग ह्यांचा प्रकर्ष मेवाडच्या इतिहासात पदोपदी दृष्टीस पडतो मिराबाईच्या कृष्णभक्तीमुळे मेवाडच्या इतिहासात अध्यात्माचाहि परमोत्कर्ष झाला मेवाडचे निसर्गसौंदर्यही अतिशय विलोभनीय आहे पन्नादाईने राजघराण्याचा अंकुर वाचविण्यासाठी पोटच्या पुत्राचे केलेले बलिदान जगाच्या इतिहासात सदैव अजोडच राहील

सूर्यवंभव इक्ष्वाकू वंशातल्या प्रभू रामचंद्राच्या ज्येष्ठ मुलाचे लवाचे आम्ही वंशज असे मेवाडच्या राजघराण्यातले पुरुष मानीत आले लवाने आपली राजधानी अयोध्येहून लाहोरला हालविली आणि त्या घराण्याची एक शाखा गुजराथेत इदोर येथे स्थिर झाली इदोरचा अपराजित नावाचा राजा बंडखोर भिल्लाच्या अत्याचाराला बळी पडला त्याचा मुलगा बाप्पा रावळ त्यावेळी तान्हा मुलगा होता सुदैवाने त्याला वाचविण्यात आले आणि सुरक्षिततेसाठी त्याला मेवाडची भग्नावशेष राजधानी नागदा येथे हालविण्यात आले ही गोष्ट आठव्या शतकाच्या प्रारंभी घडून आली. बाप्पा रावळाने इ स ७३४ मध्ये चितोडगड काबीज केले आणि हिंदूचा सूर्य ही पदवी घेऊन राज्यकारभार सुरू केला, बाप्पा रावळाच्या वंशजांनी महाराणा भूपालसिंग ह्याने इ स १९४९ मध्ये आपले राज्य भारतीय संघ-राज्यांत विलीन केले बाराशे वर्षे अखंडितपणे राज्य करणारे दुसरे घराणे जगाच्या इतिहासात सापडणार नाही तसेच सतत ८०० वर्षे मेवाडच्या मूळ पुरुषाने जिंकून घेतलेल्या भूप्रदेशावर स्वतंत्र राहून राज्य करण्याचे भाग्य दुसऱ्या कोणत्या घराण्याला क्वचितच लाभलेले असेल.

बाप्पा रावळाचा वंशज राणा उदयसिंह ह्याने इ. स. १५५९ मध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीने चितोड सोडले आणि उदयपूर शहर बसविले. तेव्हा-पासून उदयपूर ही मेवाडची राजधानी झाली आणि ३९० वर्षे राजधानी म्हणून गाजली. १९४९ मध्ये झालेल्या विलीनीकरणानंतर उदयपूर हे राजस्थान राज्यातले एक जिल्ह्याचे ठिकाण बनले. ३९० वर्षांच्या काळात २२ महाराणे झाले.

राजस्थानचे क्षेत्रफळ १,३१,९४३ चौरस मैल आणि त्यापैकी मेवाडने व्यापलेला भूभाग १२,९४१ चौरस मैल आहे. लोकसंख्या वीस लाख आहे आणि त्यापैकी शेकडा ८६ इतकी लोकसंख्या ग्रामीण आहे.

मेवाडाचे ब्रीदवाक्य, 'जो दृढ राखे धर्म को, तोहि राखे करतार' हे आहे. जो आपल्या धर्माचे दृढतेने रक्षण करतो, त्याचे परमेश्वर रक्षण करतो.

मेवाडात भिल्लांची लोकसंख्या बरीच मोठी आहे. भिल्ल लोक हाडा-पेराने मोठे असतात आणि पुष्कळ भिल्ल सैन्यात भरती होतात.

प्रकरण १३

# उदयपूर

उदयपूरला सौंदर्याचे वसतिस्थान, पृथ्वीवरील नंदनवन, साकार झालेले सौंदर्य अशा शब्दांनी गौरविले जाते व ते यथार्थच आहे पूर्वेकडील व्हेनिस, सरोवराचे शहर, सूर्योदयाचे शहर, मंदिरांचे शहर, राजवाड्याचे शहर, ऐतिहासिकतेचे शहर अशी अनेक नावे उदयपूरला निरनिराळ्या लोकांनी दिलेली आहेत निसर्गसौंदर्य आणि मानवनिर्मित सौंदर्य ह्या दोहोंचाहि सुरेख संगम उदयपूर शहरात झालेला आहे

फ्रेंच प्रवासी पिअरी लोटी म्हणतो, जसजसे आपण उदयपूरजवळ जातो तसतसे हिमधवल राजवाडे आणि मंदिरे दूर अंतरावरून दृष्टीपथात येतात सभोवती वृक्षाच्छादित उंच डोंगराचे कडे पडलेले दिसते नैसर्गिक सौंदर्याच्या कोंदणात हे शहर म्हणजे शांतता आणि गूढता याचे निधान आहे असे वाटते.

इ स. १९०२ साली लॉर्ड कर्झनने उदयपूरला भेट दिली तो म्हणतो. सौंदर्यसंपन्न ठिकाणात सर्वांत अधिक सौंदर्यसंपन्न आणि राजस्थानातील भव्य असे हे शहर आहे. अद्भुतरम्यता आणि शौर्य ह्यासाठी प्रसिद्ध असलेल्या येथील राजवंशाला ह्या शहराची पार्श्वभूमि विशेषच शोभून दिसते

दुसरा एक फ्रेंच प्रवासी म्हणतो जर एखाद्या प्रवाशाला अडीच दिवस हिंदुस्थानात घालवावयाचे असतील, तर त्याने एक दिवस उदयपूरमध्ये, एक दिवस काश्मीरमध्ये आणि अर्धा दिवस आग्रा येथे घालवावा आणि खुशाल परत जावे

रूडयार्ड किपलिंग हा कवी म्हणतो उदयपूर शहर पाहिल्याशिवाय भारताची सफर कधीच पूर्ण होणार नाही

सुप्रसिद्ध फ्रेंच पत्रकार अँटालिओ गौडिआ म्हणतो. उदयपूर येथील अद्भुतरम्य प्रासाद, नीलमण्यासारखी सरोवरे, रंगीबेरंगी रेशमी वस्त्रांनी पऱ्यासारख्या भासणाऱ्या स्त्रिया, तेथील पुष्पसमृद्ध उद्याने एक कोपरा असावा असे वाटते. शहर सोडताना मला फार वाईट वाटले

आणखी एका प्रवाशाने उद्गार काढले हिंदुस्थानात मी जितके प्रासाद पाहिले त्यात उदयपूर आणि फत्तेपूरसिक्री येथील प्रासाद मला सर्वांगसुंदर वाटले

सर अर्नोल्ड टॉइनबी ह्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या इतिहास–लेखकाने म्हटले आहे. चित्रांवरून आणि छायाचित्रांवरून उदयपूरच्या सौंदर्याची कल्पना मुळीच येत नाही आज मी उदयपूर प्रत्यक्ष पाहिले आणि माझे डोळे तृप्त झाले

पंडित नेहरूंना उदयपूर फार आवडायचे उदयपूरच्या निष्कलंक इतिहासाबद्दल आदर, निसर्ग सौंदर्याबद्दल प्रेम आणि तेथील संस्कृतीबद्दल कौतुक वाटत असल्यामुळे ते वारंवार उदयपूरला भेट देत.

सरोवरांच्या,पर्वतांच्या, शिल्पाकृतींच्या, इतिहासाच्या आणि संस्कृतीच्या सौंदर्याचा सुरेख संगम उदयपूर येथे झालेला असल्यामुळे, हे शहर सर्वांच्या प्रेमास पात्र झाले आहे व्हेनीस पाहा आणि मग मरा असे म्हणतात उदयपूरच्या बाबतीत असे म्हणावेसे वाटते की, उदयपूर पाहा आणि पुन्हा पुन्हा पाहण्यासाठी दीर्घकाळ जिवंत राहा.

उदयपूरचे हवामान समशीतोष्णच म्हणावे लागेल ऐन उन्हाळ्यात कमाल तपमान ४२ सें. असते आणि ऐन हिवाळ्यात किमान तपमान ४ से इतके उतरते. पाऊस अवघा ६० सें. मी. पडतो

टांगा हे येथील बहुसंख्य जनतेचे वाहन. एका टांग्यात चार माणसे आरामात बसू शकतात दरही माफक असतात शहराच्या सर्व भागांत बसची सोय आहे टॅक्सीही सहज उपलब्ध होतात

उदयपूरला लाकडी खेळणी चांगली आणि स्वस्त मिळतात ह्याशिवाय कलाकुसरीने नटलेले फर्निचर, छापाच्या साड्या, कातड्याची हलकी फुलकी पादत्राणे, धातूची सुंदर भांडीं व इतर शोभेच्या वस्तु उदयपूरच्या बाजारात विपुल मिळतात . मेवाडात कशाची कमतरता अशी दिसली नाही. धान्ये, भाजीपाला,फळफळावळ व इतर खाद्य पदार्थ भरपूर प्रमाणात उपलब्ध असतो, आणि आपल्या इकडच्या मानाने पुष्कळच स्वस्त असतो.

## उदयपूरमधील सरोवरे

१) **पिचोला सरोवर**–हे सरोवर उदयपूर शहराच्या पश्चिम सीमे-

जवळ असून, रेल्वे स्टेशनपासून ५ किलोमीटर अंतरावर आहे. हे सरोवर चार सरोवराचे मिळून बनलेले आहे. १ मूळचे पिचोला सरोवर. २. रंग-सागर ३ स्वरूप सागर आणि ४ दूध तलाव सरोवराची उत्तर-दक्षिण लांबी ५ किलोमीटर पूर्व-पश्चिम ३ किलोमीटर, आणि खोली ८ किलोमीटर आहे क्षेत्रफळ ४ चौरस किलोमीटर आहे. सरोवरात बेटासारखे असलेले दोन राजवाडे असून, त्यांची नावे जगमंदिर आणि जगनिवास अशी आहेत. ते पाहण्यासाठी मोटार बोटीची तर आहे नैऋत्येकडे व्हेल रॉक ( देव-माशासारखा भासणारा खडक ) हा प्रेक्षणीय खडक दिसतो. सूर्यास्ताच्या वेळची शोभा फार रमणीय दिसते. उन्हाने न्हालेल्या डोंगरांची आणि राजवाड्यांची प्रतिबिंबे पाण्यात चमकताना फार शोभिवंत दिसतात. सध्याकाळी पिचोला सरोवराचा पृष्ठभाग शंभर नंबरी सोन्याच्या आरशा-सारखा दिसतो महाराणा लखाच्या राजवटीत (१३८२–१४१८) हा तलाव तयार केला गेला

२) **फतेहसागर**– हे सरोवर महाराणा जयसिंहाने १६७८ मध्ये प्रथम बांधले अतोनात पाऊस पडल्यामुळे ते फुटले आणि सहेलिओंकी बाडी ह्या सुंदर उद्यानाचा नाश झाला. महाराणा फतेसिंहाने तें हल्लीच्या स्वरूपात पुन्हां बांधून काढले, त्यासाठी सहा लक्ष रुपये खर्च आला. त्याचे नाव फतेहसागर ठेवण्यात आले फतेहसागरच्या सर्व बाजूंनी पक्का कठडा बांधलेला असून, त्याला कॅनॉट बंड म्हणतात त्याची लांबी ८४० मीटर असून सरोवराचे क्षेत्रफळ ४ चौरस किलोमीटर आहे. फतेहसागराजवळून जाणारा सुंदर रस्ता सापासारखा नागमोडी असल्यामुळे त्याला सर्पन्टाइन ड्राइव्ह असे म्हणतात. नौकाविहाराची सोय आहे आणि तलावातील बेटा-वर सुंदर उद्यान आहे. फतेहसागराच्या शेजारी नगरपालिकेने बनविलेले खडकोद्यान आहे ( Rock Garden ) हे उद्यान टेकडीवर बनविलेले आहे. त्याला आता जवाहर उद्यान हे नाव दिलेले असून, उद्यानातल्या उंचात उंच जागी राणा प्रतापचा अश्वारूढ ब्राँझचा पुतळा प्रेक्षकांना स्फूर्ती देण्यासाठी खडा आहे

३) **उदयसागर तलाव**–महाराणा उदयसिंहाने इ स. १८५९ ते ६५ ह्या काळात बांधलेला हा तलाव रेल्वे स्थानकापासून १३ किलोमीटर अंत-

रावर आहे निसर्गसौंदर्य आणि असीम शांतता ह्यामुळे ह्या सरोवराचा आसमंत अतिशय मनोहर आहे ४ किलोमीटर लांब, अडीच किलोमीटर रूंद आणि नऊ मीटर खोल असलेल्या ह्या तलावाचे क्षेत्रफळ साडेदहा चौ. किलोमीटर आहे पावसाळ्यात ते वाहू लागते, तेव्हाची शोभा काही वेगळीच असते ह्या तलावाच्या परिसरातच इ सं १६८० मध्ये महाराणा राजसिंहाने औरंगजेबाचा पराभव केला

४) **बडी तलाव**– हा तलाव उदयपूरपासून सहा किलोमीटर अंतरावर ईशान्येला आहे हा तलाव इ. स. १६८४ मध्ये बांधून काढण्यात आला. ह्याचे क्षेत्रफळ चार चौ ~~किलोमीटर असून खोली अठरा मीटर~~ आहे जुन्या भाषेत अठरा मीटर म्हणजे दहा पुरुष. येथील हवापाणी उत्कृष्ट असल्यामुळे येथे चारशे खाटांचे एक क्षयरोग रुग्णालय स्थापन केले आहे २ मे १९६० रोजी डॉ राजेंद्रप्रसाद ह्यांनी त्याचे उद्घाटन केले

**जयसमुद्र**–उदयपूरच्या आग्नेय दिशेला ५१ किलोमीटर अंतरावर असलेला हा तलाव जगातील गोड्या पाण्याच्या कृत्रिम तलावांपैकी फार मोठा तलाव समजला जातो १४ कि. मीटर लांब, १० कि. मीटर रुंद आणि ३० मीटर म्हणजे १७ पुरुष खोल असा [illegible] आहे. त्याचा परीघ ४८ किलोमीटर आणि क्षेत्रफळ ५२ चौ. कि मीटर आहे सभोवती ३०० मीटर उंचीचे डोंगर आहेत आणि तलाव समुद्रसपाटीपासून ३०० मीटर उंचीवर आहे पाणलोटाचे क्षेत्रफळ १३८० चौरस कि मीटर आहे. तलावात सात बेटे असून त्यावर भिल्लांची वस्ती आहे. लहान लहान होड्यांतून ते वाहतूक करतात

हा तलाव महाराजा जयसिंगाने गोमती नदीला बांध घालून तयार केला ह्या तलावाचे उद्घाटन २ जून १६९१ ह्या दिवशी झाले आणि त्या दिवशी महाराजा जयसिंगाने ह्या तलावाला पायी प्रदक्षणा घातली आणि स्वतःच्या वजनाइतक्या वजनाचे सोने दानधर्म म्हणून वाटले

ह्या तलावात माशांचीहि विपुलता आहे तलावाच्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग केला जातो. आसपासच्या घनदाट जंगलात शिकारीचीहि सोय आहे सरोवरापर्यंत उत्तम रस्ता असून दररोज बसची जा ये चालू असते.

**राजसमुद्र तलाव**–उदयपूरपासून ६८ कि मीटर अंतरावर हा तलाव

आहे सहा कि मीटर लांब, अडीच कि मीटर रुंद आणि १६.२ मीटर म्हणजे नऊ पुरुष खोल असा हा तलाव आहे. राजनगर आणि कन्कोली ही दोन शहरे ह्या तलावानें जोडलेली आहेत हा तलाव महाराणा राजसिंग ह्याने बांधला व त्यासाठी ४० लक्ष रुपये खर्च केले १ फेब्रुवारी १६७६ ला ह्या तलावाची वास्तुशांत झाली स्वतःच्या महाराणीच्या आणि नातवाच्या वजनाइतक्या वजनाचे ६५ लक्ष रुपये किंमतीचे सोने दानधर्मात खर्च केले. दुसऱ्या महायुद्धात हे सरोवर वर्ल्ड ओअरलाइन्सने सी–प्लेन तळ म्हणून उपयोगात आणले होते

ह्या तलावाला उत्कृष्ट बांधलेले सुंदर घाट आहेत नऊ चौकी ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या संगमरवरी दगडाचे बांधकाम अप्रतीम आहे माऊंट अबू येथील दिलवाडाच्या जगप्रसिद्ध मंदिरातील नऊ चौकीमध्ये १०१७ संस्कृत श्लोकाचे राजप्रशस्ती हे काव्य संगमरवरी दगडांवर कोरून काढलेले आहे इ स. १६७५ मध्ये केलेले हे काम असून दगडावर खोदलेले इतके विस्तृत लिखाण जगात दुसरे नसावे.

वरील तलावाखेरीज २४ कि. मीटर अंतरावरील बागदरा तलाव हाहि प्रेक्षणीय आहे बागदरा तलावाभोवती घनदाट अरण्य आहे आणि कायमची मकाणे बांधून शिकारीची सोय केलेली आहे. वनभोजनासाठीहि हा तलाव विशेष लोकप्रिय आहे

ह्या तलावामुळे उदयपूरच्या परिसराचे सौंदर्य व वैभव कितीतरी पटीने वाढले आहे बसच्या सोयीमुळे आणि उत्तम पक्क्या सडकामुळे हे तलाव पाहणे सर्वांना सहज सुलभ झाले आहे. उदयपूरला भेट देणाऱ्या प्रत्येकाने हे तलाव अवश्य पाहावे आणि आपल्या डोळ्याचे पारणे फेडून घ्यावे

## उदयपूरमधलि राजप्रासाद

**सरोवर काठचा राजवाडा सिटी पॅलेस**–उदयपूरला निसर्गाने डोंगरांच्या कोटाची देणगी दिली आणि प्रचंड सरोवराना पाणी दिले मानवाने अत्यंत सुंदर असे राजप्रासाद उभे करून निसर्गदत्त सौंदर्यात मोलाची भर टाकली उदयपुरातील पिचोला सरोवराच्या काठीं बांधलेला राजवाडा आणि सरोवरातील बेटावर बांधलेले जगमंदिर आणि जगनिवास हे राज-

वाडे बांधण्यास किती संगमरवर खर्ची पडला असेल त्याची गणती करणें अवघड आहे

पिचोला सरोवराच्या काठीं उभा असलेला राजवाडा दक्षिणोत्तर १५०० फूट लांबीचा आणि पूर्व पश्चिम ८०० फूट रुंदीचा आहे त्याचा अत्युच्च भाग त्यापासून १०० फूट उंचीचा आहे इंग्लंडमधील सुप्रसिद्ध राजवाडा विंडसर कॅसल ह्याच्याशी ह्या राजवाड्याची तुलना करतां येईल असे फर्गसन ह्या स्थापत्यविशारद इतिहासकाराने म्हटले आहे. कठिण काळवटी दगड आणि संगमरवर बांधकाम वापरले असून, राजवाडा अत्यंत मजबूत आहे. खरे पाहतां हा एक राजवाडा नसून अनेक राजवाड्यांचा समूह आहे दुसऱ्या मजल्यावर मुद्दाम माती पसरून एक बगीचाहि केलेला आहे व त्यात मोठाली झाडे देखील आहेत अष्टकोनी मनोरे आणि वर सुंदर मेघडंबऱ्या संगमरवरी तोरणांची मालिका, भिंतीवर चित्रित केलेले सुंदर मोर, संगमरवरी दगडाची कलापूर्ण फरशी इत्यादी अनेक प्रेक्षणीय वैशिष्ट्ये ह्या राजवाड्यात आहेत ह्या प्रासादात तीन महाल विशेष प्रेक्षणीय आहेत बडी महाल ( उद्यान प्रासाद ) हा राजनगर येथील संगमरवराचा असून, तो इ. स १६९८ ते १७१० ह्या काळात बांधला. ह्यांत उद्यान असून अखंड संगमरवराची बनविलेली दोन मोठी पिपे आहेत दिलखुष महालात सुंदर चित्रे आणि विशेषत काचेवर काढलेली सुंदर चित्रे आहेत

मोती महालातहि काचेवर काढलेली नयनमनोहर चित्रे आहेत हा राजवाडा पाहण्यास माणशी १५ पैसे तिकीट आहे.

**जगमंदिर**– पिचोला सरोवरातील एका खडकावर हा राजवाडा बांधलेला आहे बेटावर असल्यामुळे त्याला आगळेच सौंदर्य लाभले आहे. एकरंगी रेषारहित निर्मळ संगमरवराचा उपयोग सढळपणे केलेला आहे विविध रंगी काचेच्या तुकड्यांनी बनविलेली सुंदर चित्रे, संगमरवराचे बनविलेले गजराज, प्रशस्त अंगणे, उद्यान आणि वृक्षराजीमुळे ह्या प्रासादाचे सौंदर्य प्रेक्षकांना आश्चर्यचकित करते. शहाजहान बादशहा राजपुत्र खुर्रम असतांना उदयपूरला राहात असे आणि त्याच्याच सल्ल्यानुसार महाराजा अमरसिंग आणि नंतर महाराजा करणसिंग ह्यांनी हा प्रासाद १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात तयार करविला येथें राहात असतानाच राजपुत्र खुर्रम ह्याने

ताजमहालाची आकृती आपल्या मनात निश्चित केली असे म्हणतात

**जगनिवास**—हा राजप्रासादही पिचोला सरोवरातील बेटावरच असून त्याने चार एकर क्षेत्रफळ व्यापलेले आहे महाराणा जगतसिंग दुसरा ह्याने हा प्रासाद बांधवून घेतला. ह्याचा भाग संगमरवराचा बांधलेला असून, ऐतिहासिक चित्रे, सुंदर खांब, स्नानगृहे, पाण्याच्या टाक्या, सुंदर लाकडी सामान इत्यादिमुळे प्राचीन काळांतील राजाची कलाभक्ती, उच्च अभिरुची आणि सौंदर्यदृष्टी प्रत्ययास येते. ह्या प्रासादाचे रूपांतर आता लेक पॅलेस हॉटेल ह्या नांवाच्या विश्रामगृहात झालेले आहे

संगमरवराचे सौंदर्य, टिकाऊपणा, निर्मळपणा आणि विपुलता ह्याचा पुरेपुर उपयोग १६ व्या आणि १७ व्या शतकांतील राजे रजवाड्यांनी आणि मोंगल सम्राटांनी केला आणि अनेक प्रासाद उभारले. दोन तीनशे वर्षे झाली तरी ते जणु नुकतेच बांधले आहेत असे वाटते, त्यांचा टिकाऊपणाही आश्चर्यचकित करणारा आहे त्या वेळच्या कामगारांना स्थापत्यशास्त्राचे ज्ञान हल्लीसारखे विस्तृत व विपुल नव्हते. सीमेंट कॉंक्रीट जगात कोठेच माहीत नव्हते सर्व बांधकाम चुन्यातच होत असे, पण तो चुना इतका पक्का की, सीमेंट कॉंक्रीटने त्यापुढे ओशाळावे, विजापूरचा गोलघुमट काय, आग्र्याचा ताजमहाल काय, उदयपूरचे राजवाडे काय आजच्या स्थापत्यविशारदांना बांधताहि येणार नाहीत त्यांनी बांधलेच तर ते इतकी वर्षे टिकणार नाहीत. त्यावेळचे कामगार जीव ओतून, प्रामाणिकपणाने भेसळ न करता भरपूर वेळ घेऊन कामे करीत. म्हणून दक्षिणेतील मंदिरे, अजंठा, वेरूळ इथली लेणी आणि उत्तरेकडील प्रासाद काळावर मात करून अद्याप उभे आहेत

## मंदिर व तीर्थक्षेत्रे –

उदयपूरचा परिसर जसा सरोवरासाठी आणि राजप्रासादासाठी प्रसिद्ध आहे तसा तो अत्यंत प्रेक्षणीय आणि पवित्र मंदिरांसाठीहि प्रसिद्ध आहे पाषाणावरील खोदकाम कलेचा परमोत्कर्ष ह्या मंदिरांतून आढळतो भव्यता, सद्‌भिरुची, ऐश्वर्य, धर्माभिमान, पावित्र्य, भक्तिभाव इत्यादींचा सुंदर संगम ह्या मंदिरांतून आढळतो

**जगदीश मंदिर**—खुद्द उदयपुरात एन गजबजलल्या वस्तीत जगदीश मंदिर खडे आहे हे मंदिर त्यावेळचे १५ लक्ष रुपये खर्च करून महाराणा जगतसिंह पहिला ( इ स १६२८ ते १६५३ ) ह्याने बांधविले. ह्या मंदिरांत प्रवेश करण्यासाठी ३२ पायऱ्या चढून जाव्या लागतात इतके ते उंचावर बांधलेले आहे. प्रत्यक्ष मंदिर २४ मीटर उंचीचे आहे आणि मंदि-रात भगवान विष्णूचा काळ्या पाषाणाची चतुर्भुज सुंदर मूर्ती असे मंदि-रातील आणि बाहेरची पाषाणातली कलाकुसर अप्रतिम आहे त्या खोदीव चित्रातून अनेक कथा चित्रित केलेल्या आहेत

**उदयपूरमधील जैन मंदिरे**—उदयपूरमध्ये तीस जैनमंदिरे आहेत आणि त्यापैकी दोन विशेष प्रसिद्ध आणि प्रेक्षणीय आहेत ती म्हणजे १. शीतल-नाथजी मंदिर आणि २ वसुपूजयती मंदिर. दोन्ही मंदिरे महावीर स्वामीची आहेत शीतल नाथजीचे मंदिर उदयपुरातले सर्वात जुने मंदिर असे म्हण-तात काचेवरील जडावाची अत्यंत सुंदर चित्रे हे ह्या दोन्ही मंदिराचे वैशिष्ट्य आहे

**एकलिंगजीचे मंदिर**—उदयपूर पासून नं ८ च्या राष्ट्रीय सडकेवर २१ किलोमीटर अंतरावर भगवान एकलिंगजीचे पुरातन मंदिर आहे. हे मंदिर मूलत बाप्पा रावळाने आठव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात बांधले मुसल-मानांच्या विध्वंसकवृत्तीचा तडाखा ह्या मंदिरालाही वारंवार बसला पण प्रत्येक वेळी तत्कालीन रजपूत राजांनी त्याचा जीर्णोद्धार करून, त्याला अधिकाधिक सुंदर आणि मजबूत बनविण्याचे काम केले एकलिंगजीच्या कृपेने आपल्याला मेवाडचे राज्य मिळाले अशी बाप्पा रावळाची श्रद्धा होती व आपल्याला जो एकलिंगजीला आपले कुलदैवत मानी. तीच परंपरा व श्रद्धा नंतरच्या महाराण्यांनीहि अखेरपर्यंत पाळली आणि एकलिंगजीपासून सतत स्फूर्ती घेतली. महाराष्ट्रात जशी 'हर हर महादेव' ही युद्धघोषणा वीरांना स्फूर्ती देत असे, तशी 'भगवान एकलिंगजीकी जय' ही घोषणा रजपूत योध्यांना स्फूर्ती देत असे

मंदिरात भगवान एकलिंगजींची ( शंकराची ) काळ्या संगमरवराची बनविलेली चतुर्भुज भव्य मूर्ती आहे सायंकाळी ७ ते ७–२० च्या दरम्यान होणारे आरतीच्या वेळचे दर्शन खरोखरच प्रेक्षणीय असते आणि प्रेक्षकाच्या

मनांत भक्ती जागृत करण्यास समर्थ असते मदिराला दुमजली प्रवेशव्दार असून, गाभाऱ्यावर पिरॅमिडच्या आकाराचे छत आहे आणि त्यावर उत्कृष्ट खोदकाम केलेला कळस आहे

मदिरांत शकराच्या तांडवनृत्याची चित्रे आहेत. १. उभा तांडव, २. प्रलय तांडव, ३ कालिका तांडव, ४ आनद तांडव, ५ त्रिपुर तांडव, ६ गौरी तांडव अशी त्याना नावे दिलेली आहेत. कालिका, अबा आणि गणपती ह्यांचीही मदिरे आहेत त्यात लकुलिश पथीयांचे भगवान लकुलिशाचे मदिर अतिशय सुदर आहे हे मदिर इ स ९७१ मध्ये नागदाचा राजा नरवाहन ह्याने बाधविले लकुलिश पथाचे भारतांतले हे एकमेव मदिर आहे आणि शिल्पकलेतील सौंदर्याच्या दृष्टीने केवळ अव्दितीय आहे तेथील सुबक, सुदर आणि वैविध्यपूर्ण खोदकाम पाहून मन आश्चर्याने थक्क होते

**नाथद्वारा–**

नाथव्दार हे आपल्याकडील पढरपुराप्रमाणे मदिराचे गाव आहे आणि उदयपूर पासून ४८ किलोमिटर अतरावर क्र ८ च्या राष्ट्रीय सडकेवर आहे. वल्लभाचार्य पथी वैष्णवाचे नाथव्दार हे प्रमुख तीर्थक्षेत्र असून, तेथील मदिरात श्रीनाथाचे म्हणजे लक्ष्मीपती भगवान विष्णूचे अथवा त्याचाच अवतार असलेल्या श्रीकृष्णाचे मदिर हे प्रमुख आहे पढरपूरला ज्याप्रमाणे भक्ताची ये जा दररोज चालू असते तशीच नाथव्दारलाही असते

नाथव्दार मदिर हे भारतातील अत्यत श्रीमत मदिरापैकी एक मदिर आहे असे म्हणतात

श्रीनाथाची मूर्ती काळया पाषाणाची व्दिभुज आहे आणि ८ वर्षाच्या मुलाच्या उचीइतकी उच आहे डावा हात उचावलेला असून, गोवर्धन पर्वत उचलून धरलेला आहे उजवा हात खाली केलेला असू , जगत्कल्याणात गुतलेला आहे असे मानतात सकाळी ११–३० वाजता राजभोग असतो नाथव्दार येथे दहा बारा धर्मशाळा आहेत व त्यातून दर्शनार्थी वस्ती करतात देवाला मूल्यवान वस्तूचें आणि खाद्य पदार्थाचे भोग भाविक भक्ताकडून चढविले जातात आणि प्रसाद म्हणून नतर दुकानातून विकले जातात

वल्लभाचार्यांना फाल्गुन शु ११ गुरुवार विक्रम सवत १५४६ रोजी भगवान कृष्णाने स्वप्नात दर्शन देऊन, आपण गिरिराजवर प्रगट झाल्याचा

संदेश दिला वल्लभाचार्यांनी मूर्तीचा शोध करून एक लहानसे मंदिर बांधले संवत १५७६ मध्ये त्यांनी नवीन मंदिर बांधविले

वल्लभाचार्यांचा जन्म चम्पारण्यात वैशाख कृ ११ संवत १५३५ ह्या दिवशी झाला लहान वयातच त्यांनी भारतीय तत्वज्ञानाचा अभ्यास करून त्यांत प्रावीण्य मिळविले आणि तीन वेळा भारतभर भ्रमण केले अनेक विद्वानांना त्यांनी वादात जिंकले श्रावण शु ११ संवत १५५० मध्ये त्यांना भगवंतांनी ब्रह्मसंबंधाची दीक्षा दिली आणि जीवाच्या उद्धाराचा सुलभ मार्ग सांगितला ब्रह्मसंबंधाची दीक्षा ही वल्लभाचार्य पंथात अतिशय महत्वाची गणली जाते ब्रह्मसंबंध म्हणजे जीव आणि ब्रह्म ह्यांचे तादात्म्य 'श्रीकृष्ण शरणं मम' हा त्यांचा नामस्मरणाचा मंत्र मानला जातो भगवत्प्राप्तीच्या मार्गाला पुष्टिमार्ग असे नाव दिले आहे पुष्टिमार्गी लोक राग, शृंगार आणि भोग अशी भगवत्सेवेची तीन अंगे मानतात रागकीर्तन हे भक्तीचे प्रमुख अंग आहे त्यामुळे मन चटकन एकाग्र होते शृंगार म्हणजे मूल्यवान वस्त्राभरणांनी प्रभूचा शृंगार करणे भोग म्हणजे विविध खाद्यपदार्थ श्रीनाथजींना विधिपूर्वक अर्पण करणे

वल्लभसांप्रदायी कृष्णावताराला पूर्णावतार आणि भगवान श्रीकृष्णाला पूर्ण ब्रह्म मानतात श्रीनाथ आणि श्रीकृष्ण एकरूपच आहेत. श्रीनाथजींची मूर्ती हे भगवताचे प्रतीक नसून साक्षात् भगवंतच आहेत असे वल्लभपंथीय मानतात त्यामुळे श्रीनाथाची पूजा करावयाची नसते, तर सेवा करावयाची असते

वल्लभाचार्यांना श्रीमदाद्यशंकराचार्यांचा मायावाद मान्य नाही. जग हे मिथ्या न मानता ब्रम्हस्वरूपच मानतात म्हणून जग हे सत्य आहे ब्रम्हस्वप्नच मानतात म्हणून जग हे सत्य आहे ब्रम्ह हे सत्, चित्, आणि आनंदरूप आहे म्हणून ब्रम्हापासून सर्व जीवांची उत्पत्ती होते म्हणून जीवाजीवात भेद मानता येत नाही. जाती, वर्ण, स्त्री–पुरुष ह्यांत भेद नाही सर्वांना समान सेवाधिकार आहे. माया संबंध रहितो शुद्ध इत्युबधते बुधै त्यालाच शुद्धाद्वैत ब्रम्हवाद असे म्हणतात

श्रीनाथाचे मंदिर भारतातील इतर मंदिरापेक्षा वेगळे आहे. ते अतिशय साधे आहे मंदिराबाहेर चांगला मजबूत कोट आहे.

नाथद्वाराचे हवापाणी चांगले आहे. चोहो बाजूनी डोंगराचे कडे, बनास नदीचा झुळू झुळू वाहणारा प्रवाह, लहानमोठे जलाशय, वृक्षराजी इत्यादीमुळे निसर्गसौंदर्य चांगले आहे

**हळदीघाट**—नाथद्वारापासून १३ मैल अंतरावर सुप्रसिद्ध हळदीघाट आहे राणा प्रताप ह्याने इ स. १५७६ मध्ये अकबराच्या सैन्याबरोबर निकराची झुंज दिली. राणा प्रतापचा पराभव झाला हे खरे पण हळदीघाटाच्या युद्धाचा समरप्रसंग रजपुताच्या इतिहासात सुवर्णाक्षरानी लिहिला गेला आहे. राणा प्रताप आणि त्याचा घोडा चेतक ह्या दोघानीहि पराक्रमाने आणि स्वामिभक्तिमुळे इतिहासात अमरत्व प्राप्त करून घेतले आहे राणा प्रतापच्या आवडत्या घोड्याने, चेतकाने, येथेच आपल्या धन्यासाठी प्राणाचे बलिदान केले. चेतक चबुतरा ह्या नावाने बांधलेली त्याची साधी समाधी शेजारीच आहे. आपल्याकडे पावनखिंडीला जे महत्व आहे. तेच हळदीघाटाला राजस्थानात आहे.

## उदयपूरमधील बगीचे

### (१) सहेलिओं की बडी – मैत्रिणींचा बगीचा.

फतेहसागराच्या पूर्वेला हे सुंदर उद्यान आहे पूर्वीचे उद्यान वाहून गेल्याने महाराणा फतेहसिहाने हे उद्यान पुन्हा बनवून घतले ह्याला कारंजाचे उद्यान असेहि म्हणतात. फुलझाडांचे सुंदर ताटवे, हिरवळीने शोभणारी अंगणे, कमळांनी शोभणारी कुंडे, थुई थुई उडणारी असंख्य कारंजी, मोठमोठे वृक्ष इत्यादीमुळे हे उद्यान पृथ्वीवरचे नसून नंदनवनातले आहे असे वाटते. कमळ कुंडाचे आणि त्यातील कारंजाचे रक्षण करण्यासाठी शुभ्र संगमरवरी अखंड पाषाणाचे चार हत्ती आहेत कारंजी सुरू झाली की, ह्या हत्तींच्या सोंडेतूनहि पाण्याचे फवारे उडू लागतात. मध्यभागी असलेल्या गोलाकार इमारतीच्या वळचणीतूनहि पाण्याच्या धारा सुरू होतात. आणि पाऊस पडू लागला आहे असे वाटू लागते पावसाचा आवाजही येऊ लागतो. सूर्यप्रकाश चांगला असला तर, ह्या कारंजातून अनेक इंद्रधनुष्ये दिसू लागतात. आतुलनीय सौंदर्याचा साक्षातकार होतो

सहेलिओंकी बडी हे बोलपट निर्मात्याचे आवडते ठिकाण झाले आहे आणि आपण पाहतो त्या बोलपटातली अनेक सुंदर दृश्ये येथीलच असतात.

२) **सज्जन निवास उद्यान**–ह्या उद्यानाने शभर एकर जागा व्यापलेली आहे सुदर डाबरी रस्ते, विजेचा लखलखाट, प्रशस्त हिरवळी, विविध प्रकारचे व्हानमोठे वृक्ष इत्यादींमुळे हे उद्यान अतिशय शोभिवत दिसते उद्यानात राजवाड्यासारखी प्रशस्त इमारत आहे, तेथे पुराणवस्तु सग्रहालय, चित्रालय, आणि सरस्वतीभुवन नावाचे अत्यत दुर्मिळ ग्रथ असलेले ग्रथालय आहे उद्यानाच्या परिसरातच एक सुदर प्राणिसग्रहालयही आहे

३ ) **नगरपालिकेचे खडकावरचे उद्यान :** फत्तेहसागर तलावाच्या किनारी एका टेकडीवर खडक फोडून हे सुदर उद्यान बनविलेले आहे चेतक घोड्यावर आरूढ झालेल्या राणा प्रतापाचा पूर्णाकृती ब्राँझचा पुतळा टेकडीच्या सर्वोच्च भागात असल्यामुळे तो प्रेक्षकाचे लक्ष तात्काळ वेधून घेतो येथून फतेहसागराचा देखावा अतिशय मनोहर दिसतो

४ ) **नगरपालिकेचे नेहरु बालोद्यान :–**

नगरपालिकेच्या कचेरीच्या परिसरात हे नवीन उद्यान खास मुलासाठी बनवून घेतले आहे लबवर्तुळाकार जलाशय, कारजी, बाके, हिरवळी, सुदर आणि रगीबेरगी झाडेझुडपे, सीमेंट कॉंक्रीटचे बनविलेले चित्रविचित्र प्राण्याचे पुतळे, झोपाळे, घसरगुड्या इत्यादी बालकाना आवडणाऱ्या गोष्टीमुळे ह्या उद्यानाला एक आगळीच शोभा आली आहे

५) **बेटावरचा बगीचा**–फतेहसागर तलावातल्या एका बेटावर एक सुदर उद्यान निर्माण केलेले आहे ह्या जलवेष्टित उद्यानाची शोभा मन मोहून टाकते.

उदयपूरमध्ये अनेक उद्याने आहेत सुदर उद्याने कशी असावीत ह्याचा आदर्श येथे पहावयास मिळतो

---

## प्रकरण १४.

# चितोडगड

चितोडगड हे भारताचे पवित्रतम राष्ट्रीय तीर्थ आहे आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी चितोडगडावर आणि त्याच्या परिसरात लक्षावधी रजपूत वीरांनी आपले रक्त पाण्यासारखे वाहविले आणि प्राणाचे बलिदान केले आपली अब्रू वाचविण्यासाठी आणि शत्रूच्या हातून आपली विटबना होऊ नये म्हणून, हजारो भगिनींनी आपल्या लाडक्या मुलामुलींसह धडधडत्या अग्निकुंडात निर्भयपणे उड्या घेऊन स्वर्गाचा मार्ग धरला. अल्लाउद्दीन खिलजीने चितोड काबीज केल्यावर पद्मिनीसारख्या त्रिभुवन सुंदरीने हाच मार्ग पत्करला चितोड जिंकूनही अल्लाउद्दीनच्या हाती चितोडगडावर काहीहि लागले नाही त्याला दिसले ते जोहाराचे प्रचंड चिताकुंड, शरमिंधा होऊन त्याने आपले मस्तक नमविले असेल.

बाप्पा रावळाच्या वंशजाचे शौर्य, त्यागवृत्ती, राष्ट्रप्रेम, स्वामीभक्ती ह्यांची गाथा चितोडगडमधील प्रत्येक दगड आपल्या मूक भाषेत प्रवाशाला सांगत असतो. चितोडगडाने अनेक देशभक्तांना स्फूर्ती, धैर्य आणि शक्ती दिलेली आहे रजपूत वीर पडले तरी कधीहि वाकले नाहीत शरीरे धारातीर्थी पडली पण मने कधी मोडली नाहीत ते कधी शरण गेले नाहीत. संख्याबळापुढे हार खावी लागली तर त्यात कमीपणा नसतो इ. स १४४८ मध्ये राणा कुंभाने बांधविलेला कीर्तिस्तंभ आजही रजपूतांच्या अजिंक्य वृत्तीची साक्ष देत खडा आहे

बाप्पा रावळ, कुंभ, राणा प्रताप, भामा शहा, पद्मिनी, मीराबाई पन्ना ही नररत्ने आणि नारीरत्ने ह्याच चितोडगडावर फिरली, राहिली अलौकिक कामगिरी करून अमर झाली त्यांचे स्मरण चितोडगडला गेल्यावर झाल्यावाचून राहात नाही आणि अभिमानाने छाती भरून येते

मोगलाच्या जुलुमाखाली भारताचे इतर भाग चिरडले जात असताना मेवाड हा एकच भाग असा राहिला की, ज्याने मोगलाचे आधिपत्य कधी

मानले नाही एकट्या राणा सगाने अठरा घनघोर युद्धाचे नेतृत्व केले त्याचे शरीर ८९ जखमाच्या व्रणानी भरून गेले, आणि त्याचा एक डोळा निकामी झाला अवयव वेडेवाकडे झाले, पण त्याने शरणागती पत्करली नाही राणा सगाने बाबराचा दोनदा दणदणीत पराभव केला इ स १५१९ मध्ये त्याने माळव्याचा सुलतान दुसरा महमद ह्याचा पराभव करून त्याला कैद केले, पण काहीहि खडणी न घेता मुक्त केले मुसलमान इतिहासकारानीहि ह्याबद्दल त्याची स्तुती केली आहे. महमदाने त्याला आपला रत्नजडित मुकूट आणि सोन्याचा कमरबद नजर केला इ स १५२८ मध्ये बाबराने तिसरी स्वारी केली आणि राणासग युद्धांत मारला गेला सिंधपासून अरवलीपर्यंत आणि यमुनेच्या तीरापासून माळव्यापर्यंत त्याचे राज्य होते त्याच्यापाशी ८०,००० घोडदळ होते. १५२८ च्या युद्धात राणा सगाचा पराभव बाबराने केला खरा पण तोहि तलवारचा सरदार कुवर रायसेन आयत्यावेळी आपल्या ३५,००० घोडदळासह बाबराला मिळाला म्हणून. जखमी राणासग बाबराच्या हाती सापडला नाही. त्याला त्याच्या एकनिष्ठ अनुयायांनी युद्धाच्या धुमश्चक्रीत बसवा येथे नेले व तेथे तो मरण पावला राणासग हा मिराबाईचा सासरा भोजराज हा राणा [illegible] पुत्र आणि मिराबाईचा पती

**पन्नादाईची स्वामीनिष्ठा** – राणा सगाच्या मृत्यूच्या वेळी त्याची पत्नी राणी कर्णावती गरोदर होती त्यामुळे तिला सती जाता आले नाही यथाकाल प्रसूत होऊन तिला उदयसिंह हा मुलगा झाला. त्यावेळी राणा सगाचा तिसरा मुलगा विक्रमादित्य हा राणा होता. हा मुलगा आणि राज्याचा भावी वारस सात वर्षाचा असताना इ स. १५३५ मध्ये गुजराथचा सुभेदार बहादूरशहा ह्याने चितोडवर हल्ला केला ह्या युद्धात रजपूताचा पराभव झाला आणि उदयसिंहाची विधवा आई कर्णावती हिने जोहार करण्याचा निश्चय केला परतु बालराजा उदयसिंहाची देखभाल कोणी करावयाची हा प्रश्न तिला पडला. तिने आपली विश्वासू दासी आणि उदयसिंहाची दाई हिला आपल्या मुलाबरोबरच उदयसिंहालाहि वाढविण्यास सांगितले व पन्नाने ते मान्य केले राणी कर्णावतीने १३००० स्त्रियासह जोहार केला विक्रमादित्य नालायक असल्यामुळे,

## प्रकरण १४.

# चितोडगड

चितोडगड हे भारताचे पवित्रतम राष्ट्रीय तीर्थ आहे आपले स्वातंत्र्य टिकविण्यासाठी चितोडगडावर आणि त्याच्या परिसरात लक्षावधी रजपूत वीरांनी आपले रक्त पाण्यासारखे वाहविले आणि प्राणाचे बलिदान केले. आपली अब्रू वाचविण्यासाठी आणि शत्रूच्या हातून आपली विटंबना होऊ नये म्हणून, हजारो भगिनींनी आपल्या लाडक्या मुलामुलींसह धडधडत्या अग्निकुंडात निर्भयपणे उड्या घेऊन स्वर्गाचा मार्ग धरला अल्लाउद्दीन खिलजीने चितोड काबीज केल्यावर पद्मिनीसारख्या त्रिभुवन सुंदरीने हाच मार्ग पत्करला चितोड जिंकूनही अल्लाउद्दीनच्या हाती चितोडगडावर काहीहि लागले नाही त्याला दिसले ते जोहाराचे प्रचंड चिताकुंड, शरमिंधा होऊन त्याने आपले मस्तक नमविले असेल.

बाप्पा रावळाच्या वंशजाचे शौर्य, त्यागवृत्ती, राष्ट्रप्रेम, स्वामीभक्ती ह्यांची गाथा चितोडगडमधील प्रत्येक दगड आपल्या मूक भाषेत प्रवाशाला सांगत असतो. चितोडगडाने अनेक देशभक्तांना स्फूर्ती, धैर्य आणि शक्ती दिलेली आहे रजपूत वीर पडले तरी कधीहि वाकले नाहीत शरीरे धारातीर्थी पडली पण मने कधी मोडली नाहीत ते कधी शरण गेले नाहीत. सख्याबळापुढे हार खावी लागली तर त्यात कमीपणा नसतो इ स १४४८ मध्ये राणा कुंभाने बांधविलेला कीर्तिस्तंभ आजही रजपूतांच्या अजिंक्य वृत्तीची साक्ष देत खडा आहे

बाप्पा रावळ, कुंभ, राणा प्रताप, भामा शहा, पद्मिनी, मीराबाई, पन्ना ही नररत्ने आणि नारीरत्ने ह्याच चितोडगडावर फिरली, राहिली, अलौकिक कामगिरी करून अमर झाली त्यांचे स्मरण चितोडगडला गेल्यावर झाल्यावाचून राहात नाही आणि अभिमानाने छाती भरून येते.

मोगलांच्या जुलुमाखाली भारताचे इतर भाग चिरडले जात असताना, मेवाड हा एकच भाग असा राहिला की, ज्याने मोंगलांचे आधिपत्य कधीहि

सरदारानी त्याला पदभ्रष्ट केले आणि त्याचा चुलत भाऊ बनबीर ह्याला बालराजा उदयसिंह ह्याच्या नावे राज्यावर कारभारी नेमले, परतु बनबीराला स्वत राजा होण्याची इच्छा झाली त्याने विक्रमादित्याचा वध केला आणि राज्य बळकावले राणा सगाचा निर्वंश केल्याशिवाय आपला मार्ग निष्कटक होणार नाही म्हणून त्याने बालराजा उदयसिंहाला ठार करण्याचे ठरविले हाती नगी समशेर घेऊन तो पन्नादाईच्या महालाकडे निघाला ही बातमी लागताच पन्नाने आपल्या पोटच्या मुलाला उदयसिंह राजपुत्राचे कपडे घालून त्याच्या पलगावर झोपविले आणि उदयसिंहाला लपवून ठेविले बनबीराने राजपुत्र उदयसिंह कोठे आहे ? असे पन्नाला विचारले तिने पलगाकडे बोट दाखविले बनबीराने एकाच घावात तिच्या मुलाला ठार केले आणि मोठ्या दिमाखाने आणि आनदाने तो निघून गेला. आपल्या पोटच्या मुलाला अश्रूनी मूठमाती देऊन पन्ना दाईने उदयसिंहासह चितोडगडहून प्रयाण केले अनेक सकटांना तोड देत, लपत छपत तिने अखेर कुभालगड गाठला गडकरी आसा शाह देवपुरा ह्याने राजपुत्राची जबाबदारी पत्करली आणि पन्ना एकदाची निर्धास्त झाली तिने केलेल्या त्यागाला जगाच्या इतिहासात तोड सापडणार नाही पन्नाने वाचविलेल्या उदयसिंहाचा मुलगा म्हणजेच राणा प्रताप राणा प्रतापाचे नाव भारतात कोणाला माहीत नाही ?

**साध्वी मीराबाई :**—चितोडगडचा किल्ला साध्वी सत मिराबाई हिच्या निवासाने पुनीत झालेला आहे तिच्यासाठी तिच्या सासऱ्याने राणा सगाने बाधविलेले श्रीकृष्णाचे मदिर आजहि सुस्थितीत आहे मीराबाई ही जोधपूरची राजकन्या. लहानपणापासूनच तिला कृष्णभक्तीची आवड होती एका साधूने तिला गिरिधर गोपालाची सुदर मूर्ती भेट म्हणून दिली ती मूर्ती मिराबाईला द्यावी, असा त्याला स्वप्नात दृष्टात झाला होता. एकदा मिराबाई वरातीची मिरवणूक पाहात होती वराकडे बोट करून मिराबाईने आईला विचारले, हा कोण ? आई म्हणाली, हा नवरा. मिराबाईने विचारले, माझा नवरा कुठे आहे ? तिची आई विनोदाने म्हणाली, तुझ्या हातातला गिरिधर गोपाल हाच तुझा नवरा. मिराबाईने ते खरेच मानले आणि तेव्हापासून ती गिरिधर गोपाल हाच आपला पतिदेव, हाच आपले जीवन सर्वस्व, जीवन साथी, ह्याची भक्ती हेच आपले जीवितकार्य असे मानू

लागली, मेरे तो गिरिधर गोपाल, दुसरा न कोइ हा तिचा जीवनमंत्र झाला गिरिधर गोपालाच्या भजनपूजनात ती आपला बहुतेक वेळ घालवू लागली.

राणा संगाचा ज्येष्ठ मुलगा भोज ह्याच्याशी तिचा इ स. १६१६ मध्ये यथासांग विवाह झाला ती आपली पत्नीची कर्तव्ये यथायोग्य पार पाडण्याचा प्रयत्न करी, परंतु ती भोजाशी कधीच समरस झाली नाही आणि तोहि तिची योग्यता आणि विशेषत तिचे मन कधीच समजू शकला नाही, परंतु त्याने तिला कधी विरोध केला नाही की त्रास दिला नाहीं ती युवराज्ञी होती, पण सांसारिकदृष्टया दु खीच राहिली कारण तिला सांसारिक सुखाची आवडतच नव्हती साधुसंताची सेवा करावी, त्यांची भजने ऐकावी, स्वत भजनें रचावी, ती गिरिधर गोपालापुढे देहभान विसरून जाई, त्याच्यापुढे नृत्य करावे, त्याची विविध प्रकारे आळवणी करावी ह्यांतच तिचे मन रमे मिराबाई युवराज्ञी झाली, पण राज्ञीपद तिला लाभले नाही विवाहानंतर सहाच वर्षांनी राणा संगाच्या ह्यातीतच भोजराज मृत्यू पावला आणि मिराबाई पाशरहित विधवा झाली राणा संगाला तिचे कौतुक वाटे व तो ह्यात असेपर्यंत तिला फारसा त्रास झाला नाही त्याच्या मृत्यूनंतर भोजाचा सावत्र भाऊ राणा रतनसिंग गादीवर आला त्याचाही मिराबाईच्या भजनपूजनाला विरोध नसे, परंतु रतनसिंग तीनच वर्षांनी इ स १५३१ मध्ये युद्धात ठार झाला आणि भोजराजाचा दुसरा सावत्रभाऊ विक्रमादित्य गादीवर आला तो त्या वेळी केवळ १५ वर्षांचा होता, पण अगदी नालायक होता, त्याने मूर्खपणाने मिराबाईला त्रास देण्यास प्रारंभ केला साधुसंताना गडावर येण्यास बंदी केली मिराबाई पाण्या-बाहेर काढलेल्या मासोळीसारखी तडफडू लागली एकदा तर त्याने भगवताचे चरणामृत म्हणून विषाचा प्याला मिराबाईकडे धाडला तिने तो पिऊन टाकला, पण तिला विषबाधा झाली नाही गिरिधर गोपालाच्या कृपेने विषाचे खरोखरच चरणामृत झाले ह्या घटनेमुळे मिराबाईचा लौकीक फार वाढला.

आता मात्र मिराबाईला चितोडगडावर राहण्यास वीट आला. गिरीधर गोपालाची मूर्ती घेऊन तिने सर्वसंगपरित्याग वृत्तीने चितोडगड सोडला आणि ती तीर्थयात्रा करू लागली. ती स्वरचित भजने आपल्या गोड आवा-जात गाई आणि ती ऐकून अनेक लोक तिची भक्ती करू लागत मथुरा व

वृन्दावन ही कृष्णभक्तीची पंढरी तिथे मिराबाईने मोठ्या आनंदाने पण संन्यस्त वृत्तीने भगवताची भक्ती केली. अनेक तीर्थक्षेत्रे पाहात पाहात ती द्वारकेला आली द्वारकेचा रणछोडराय हा तर तिचा परमेश्वरच द्वार-केला आल्यावर तिला आपले कार्य संपले असे वाटू लागले अशीच एकदा ती रणछोडरायच्या मंदिरात भजनात तल्लीन झालेली असतांना देवळात एकाएकी प्रकाशाचा झगझगाट झाला आणि साध्वी मीरा भगवद्पदा विलीन झाली तुकाराम महाराजांप्रमाणे ती सदेह स्वर्गात गेली असे लोक मानतात, कारण तिचा मृतदेह कोठेच सापडला नाही श्रीकृष्णावर तिचे इतके असीम प्रेम होते की, तिला राधेचा अवतार मानतात

मिराबाई ही प्रतिभासपन्न कवयित्री होती तिची भजने ऐकली की मन प्रसन्न होते. कवी श्री. कुसुमाग्रजांनी तिच्या काही भजनाचे मराठीत भाषा-तर केले आहे तेहि फार सुंदर झाले आहे मिराबाईने अंधभक्ती केली नाही. तिची भक्ती [illegible] [illegible]वर आधारलेली होती तिचा अनुभवहि विशाल आणि सखोल होता. अनुभव आणि चिंतन ह्यामुळे तिला राधेचा अवतार मानतात आजहि मिराबाईची भजने भारतभर लोकप्रिय आहेत त्यातील प्रेम, जिव्हाळा, आर्तता, समर्पणवृत्ती मनाला चटका लावते

**राणा प्रताप**–इ. स १५७२ राणा उदयसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा थोरला मुलगा ह्या नात्याने राणा प्रताप गादीवर आला उदयसिंहाने बस-विलेले उदयपूर अद्याप बाल्यावस्थेत असल्यामुळे राणा प्रतापाने कुंभालगड ह्या अजिंक्य किल्यालाच आपली राजधानी केली. अकबराने जिंकून घेत-लेला चितोडगड पुन्हा जिंकून घ्यावयाचा अशी प्रतिज्ञा राणा प्रतापाने केली आणि त्यासाठी तयारी सुरू केली. राणा प्रताप हा एकच राणा असा दिसतो की, ज्याने आपले मस्तक मोगल सम्राटापुढे कधीहि झुकविले नाही अथवा त्याचेशी तह अथवा तडजोड केली नाही. स्वातंत्र्य ही तडजोडीची बाब होऊच शकत नाही. त्याने व त्याच्या कुटुंबियानी वनवास भोगला, कंदमुळे खाऊन दिवस काढले, गवताच्या शय्येवर रात्री काढल्या, पडतील ते हाल सोसले पण शरणागती पत्करली नाही उघडया मैदानावर लढणे शक्य नसेल तेव्हा गनीमी पद्धतीने शत्रूला सळो कि पळो करण्याचा उपक्रम सतत चालू ठेवला त्याला उसंत म्हणून दिला नाही [illegible]

नेहमी एकनिष्ठ राहिले त्यांना न मिळणारी कोणतीहि गोष्ट त्याने स्वतःसाठी घेतली नाही राणा प्रतापाला केवळ अकबराशीच लढावयाचे होते असे नव्हे तर कुऱ्हाडीचा दांडा आणि गोतास काळ झालेल्या रजपूत सरदाराशीहि लढावे लागत होते अकबराचा सेनापती वळविण्याचा त्याने प्रयत्न केला, पण त्याला त्यांत यश आले नाही आपल्या धाकट्या भावाला शक्तीसिंहाला आपल्या बाजूला वळवून घेण्यात मात्र प्रतापाला यश मिळाले.

इ. स १५७६ मध्ये मोठी फौज जमवून राणा प्रतापाने मोगलाशी झुंज देण्याची निकराची तयारी केली उदयपूरच्या उत्तरेला ६४ किलोमीटर अंतरावर हळदीघाट येथे घनघोर युद्ध झाले मानसिंग मोगलांचा सेनापती होता. राणा प्रतापाच्या भालाफेकीने मानसिंग ठारच व्हावयाचा, परंतु त्याच्या हौद्याला पोलादाचा पत्रा मारलेला असल्यामुळे तो वाचला.

राणा प्रतापाला अनेक जखमा झाल्या व त्याच्या सरदारानी त्याला रणांगण सोडून जावयास भाग पाडले. राणा प्रतापाचा पाठलाग दोघा मोगल सरदारानी केला, परंतु शक्तिसिंहाने त्याना ठार करून प्रतापाचा जीव वाचविला राणा प्रतापाचा इमानी घोडा चेतक हाहि जखमी झाला होता, परंतु जिवंत जीव असेपर्यंत त्याने राणा प्रतापाला वायुवेगाने युद्धभूमीपासून दूर नेले आणि प्राण सोडला शक्तिसिंहाने आपला घोडा अकारा हा त्याला दिला आणि राणा प्रताप सुरक्षितपणे निसटू शकला

प्रतापाचा स्वामिनिष्ठ प्रधान भामाशहा ह्याने, प्रतापाला आपले सर्व द्रव्य देऊन टाकले प्रतापाने देवाइर येथे शत्रूवर प्रतिहल्ला करून, त्याची दाणादाण उडविली आणि मोगलांनी बळकावलेला सर्व मुलूख काबीज केला त्यानंतर प्रतापाने पंचवीस वर्षे राज्य केले इ. स १५९७ मध्ये चावद ह्या खेड्यात प्रतापाला मृत्यू आला राणा प्रतापाचा मुलगा अमरसिंह इ स १५९७ साली गादीवर आला तो वडिलांमारखाच शूर व कर्तबगार होता. त्याने जहांगीरचा अनेक वेळा पराभव करून त्याला सळो का पळो करून सोडले त्याने चितोडगड परत जिंकून घेतला आणि वडिलाची प्रतिज्ञा पूर्ण केली परंतु राजधानी उदयपूरला नेल्यामुळे चितोडगड मागे पडला त्याची निगा नीट राखली जाईनाशी झाली. पडझड सुरू झाली आणि ती चालू राहिली. आज चितोडगडावर बहुतेक सर्व इमारती भग्नावस्थेतच आहेत.

रजपूताच्या अनेक सद्गुणांचा, पराक्रमाचा, त्यागाचा आणि वैभवाचा साक्षीदार म्हणून चितोडगड उभा आहे. त्याच भावनेने लोक तो पहावयास जातात आणि मनांतल्या मनांत त्याचा गौरव करून नतमस्तक होतात हेहि कांही थोडे नाही पूर्वजांची महती ओळखणे व त्याबद्दल आदर बाळगणे हे जिवंतपणाचे लक्षण आहे व त्यातच समाधान मानले पाहिजे

**चितोडगडावरील भीषण हल्ले**— चितोडगडावर एकूण साडेतीन भीषण हल्ले झाले. इ स १३०२ मध्ये राणी पद्मिनीच्या अभिलाषेने अल्लाउद्दीन खिलजीने चितोडगडावर हल्ला केला. पद्मिनीचे प्रतिबिंब पाहण्यासाठी तो एकटा चितोडगडावर आला पद्मिनीचा नवरा रतनसिंग त्याला पोचविण्यासाठी त्याच्या बरोबर गडाच्या प्रवेशद्वारापर्यंत गेला असता, अल्लाउद्दीनाने कपटाने त्याला कैद केले आपल्या नवऱ्याला लबाडीनें कैद केल्याचे समजताच त्याला सोडविण्यासाठी पद्मिनीने अल्लाउद्दीनची भेट घेण्यास संमती दर्शविली सातशें पालख्या तयार झाल्या. प्रत्येकात एक रजपूत लढवय्या बसला आणि इतर सैनिकांनी भोयांचा पोशाख केला. अल्लाउद्दीनाच्या शिबिरांत पोचताच सर्वांनी आपली लपवून नेलेली शस्त्रे बाहेर काढली आणि अल्लाउद्दीनाच्या सैन्यावरच अचानक हल्ला करून त्याची दाणादाण केली हया गडबडीत रतनसिंह कैदेतून निसटून गडावर परत आला. पराभूत आणि फजीत झालेल्या अल्लाउद्दीनचा पराभव झाला म्हणून हयाला अर्धा हल्ला म्हणतात

इ स १३०३ मध्यें पुन्हा मोठी फौज घेऊन अल्लाउद्दीन चितोडगडावर चालून आला रतनसिंहासकट बरेच रजपूत धारातीर्थी पडले हे समजताच पद्मिनी व इतर स्त्रियांनी जोहार करावयाचे ठरविले हजारो बायकामुलांनी अग्निकुंडात उड्या घेतल्या आणि स्वत ला भस्मसात करून घेतले. पुरुष मंडळी रणांगणात मारली गेली अल्लाउद्दीनाने गडावर येऊन पाहिले तो काहीच हाती लागले नाही उरल्या सुरल्या पुरुषांची त्याने अमानुषपणे कत्तल केली गडावर आपला एक सरदार गडकरी म्हणून नेमला आणि त्याने दिल्लीकडे कूच केले पुढे महाराणा हमीराने चितोड पुन्हा सर केले

**चितोडवर दुसरा भीषण हल्ला**— इ स १५३५ मध्ये गुजराथचा सुभेदार बहादुरशहा ह्याने चितोडवर दुसरा हल्ला चढविला. त्याच्या

तोफखान्यावर गोरा अधिकारी होता रजपुतानी आपल्या शौर्याची शर्थ केली, परंतु अखेर किल्ला पडला राजमाता कर्णावतीने तेरा हजार रजपूत स्त्रियां-सह जोहार केला. राणा कुंभाच्या राजवाड्यात आणि आवारात हा महायज्ञ झाला रजपुतांनी केसरी रंगाचे पोषाख करून युद्धात मरण पत्करले

हुमायूनला बहादूरशहाचे हे कृत्य आवडले नाही त्याने त्याच्यावर स्वारी केली आणि मंदसोर येथे त्याचा पराभव केला विक्रमादित्य पुन्हा चितोडचा स्वामी झाला, परंतु तो ह्या प्रसंगानेही शहाणा झाला नाही त्याला पदभ्रष्ट करून त्याचा चुलत भाऊ बनवीर ह्याला राज्यपद दिले हा इतिहास पूर्वी दिलाच आहे

## चितोडवर तिसरा हल्ला–

इ स १५६७ मध्ये आपल्या ऐन जवानीत अकबराने चितोडवर मोठा हल्ला केला त्याने गडाला वेढाच दिला चार महिने कोंडी झाल्यामुळे रजपूतांचे अन्नपाणी संपुष्टांत आले त्यांनी जीवावर उदार होऊन लढावयाचे ठरविले. नऊ राण्या, पाच राजकन्या आणि एक हजारापेक्षा अधिक सुवासिनींनी जोहार केला काही वीरांगनांनी जोहार न करता रणांगणावर लढता लढता मरण पत्करले अखेर इ स १५६८ मध्यें अकबराने किल्ला सर केला. रजपूतांच्या शौर्याची आणि त्यागाची आणि स्त्रियांच्या धैर्याची खुद्द अक-बराने आपल्या अकबरनाम्यात मुक्तकंठाने स्तुती केली आहे. ह्यानंतर चितोडला पुन्हा चांगले दिवस आले नाहीत एक स्फूर्तिदायक ऐतिहासिक स्थळ एवढे त्याला महत्व राहिले

## चितोडगडावरील दर्शनीय स्थळे–

चितोडगडावर लहानमोठी ७८ ऐतिहासिक महत्वाची स्थळे आहेत चितोडगडचा चढ एक मैलाचा आहे आणि त्यात दोन ठळक वळणे आहेत टांगे थेट वरपर्यंत जात असल्यामुळे चढ चढावा लागत नाही ह्या एका मैलात सात पोळ किंवा वेशी किंवा प्रवेशद्वारे आहेत त्यांची नावे १. पत-वन ( पहिला ) पोळ किंवा पदम पोळ, २ भैरव पोळ, ३, हनुमान पोळ, ४. गणेश पोळ, ५ जोरला (जोडलेला) पोळ, पांचवे प्रवेशद्वार सहाव्या-बरोबर जोडलेले आहे. ६ लक्ष्मण पोळ आणि ७. राम पोळ रामाला मेवाड राजघराण्याचा पूर्वज मानतात हा सर्वात सुंदर दरवाजा आहे काही

वर्षांपूर्वी ह्याचा आधुनिक पद्धतीने जीर्णोद्धार केला त्याच्या जोत्यावर हत्ती, घोडे आणि सैनिक दगडात कोरलेले आहेत

रजपूत वीराची स्मारके अगदी पायथ्यापासूनच दृष्टीस पडतात पहिल्या पद्म पोळापाशी एक पार आहे व त्यावर एक पाषाण आहे ह्या पाषाणाची लोक पूजा करतात हा पार म्हणजे राजा भागसिंगाचे हे स्मारक आहे. विक्रमादित्य वयाने लहान असल्यामुळे इ स १५३५ मध्ये ह्याला राजपद देण्यात आले बहादूरशहाने केलेल्या हल्ल्यात हा राजा ह्या ठिकाणी लढता लढता मारला गेला

भैरव पोळाच्या पुढे जयमल आणि त्याचा एकनिष्ठ अनुयायी कल्ला याच्या छत्र्या आहेत अकबराने केलेल्या हल्ल्यात मांडीत गोळी गेली असूनही जयमल लढत राहिले कल्लाने त्याला खांद्यावर घेतले आणि दोघे आपल्या चार हातानी शत्रूची शिरे भराभर धडावेगळी करू लागले. जयमल हा संत मीराबाईचा चुलतभाऊ तो मरण पावल्यावर कल्ला तसाच झुंजत राहिला त्याचे शीर कापले गेल्यावर धड काही वेळ कापाकापी करीतच राहिले अशी दंतकथा आहे. महाराष्ट्रातील मुरारबाजीप्रमाणे (शिरावाचुनि धड लढवोनि मुरारबाजी पडला, पुरंदर किल्ल्यावर )

पहिला दरवाजा पदम पोळ ह्याविषयी एक दंतकथा आहे पदम म्हणजे म्हैस अल्लाउद्दीन खिलजीने केलेल्या हल्ल्यात एक म्हैस रक्ताच्या लोटा-बरोबर वरून पायथ्यापर्यंत वाहात आली म्हणून त्याला पदमपोळ हे नाव पडले

चितोडगडावर भग्नावस्थेत असलेली मंदिरे, प्रासाद, पाण्याची टाकी आणि इतर अवशेष आहेत प्रत्येक दगड बोलू लागला तर एकेक रोमहर्षक आणि चित्तथरारक सत्यकथा सांगू लागेल सात आठशे वर्षात इतक्या असंख्य घटना घडल्या की, त्यांचा शोध आणि बोध घेण्यासाठी एखाद्या इतिहाससंशोधकाला गडावर अनेक महिने किंवा वर्षे वास्तव्य करून अभ्यास करावा लागेल

**बालवीर फत्ता ह्याची छत्री** – गडावर प्रवेश करताच बालवीर फत्ता ह्याची छत्री दृष्टीस पडते अकबराने केलेल्या हल्ल्यात जयमल आणि कल्ला ह्यांना मृत्यू आल्यावर १७ वर्षे वयाच्या फत्ता सिसोदियाने

सेनापतीपदाची धुरा स्वीकारली त्याचा विवाह नुकताच झालेला होता. बालवीर फता, त्याची आई आणि बालपत्नी ह्या तिघांनी वीरवेश चढवून युद्धाच्या धुमश्चक्रीत उडी घेतली आणि तिघांनीहि बरोबरच स्वर्गाची वाट धरली केवढे अपूर्व स्वागत स्वर्गातल्या देवदेवतांनी तरी केले असेल की नाही ह्याची वाचकांनी कल्पना करावी जयमल आणि फता ह्यांच्या शौर्याने, निष्ठेने आणि त्यागाने खुद्द अकबर इतका प्रभावित झाला कीं, त्याने त्यांचे गजारूढ पुतळे आपल्या दिल्लीतल्या राजवाड्याच्या प्रवेश-द्वारापाशी स्थापन केले होते असा इतिहास समजला 'गुणी गुण वेत्ति हेच खरे'!

**विजयस्तंभ** – १२२ फूट उंचीचा आणि सुस्थितीत असलेला विजयस्तंभ हे चितोडगडाचे एक प्रमुख आकर्षण आहे त्याची छायाचित्रे आपण अनेक ठिकाणी पाहतो आणि तो प्रत्यक्ष पाहण्यास आपले मन उत्सुक असते ताजमहालच्या बाबतीत बहुतेक प्रवाशांची जी उत्सुकता असते ती ह्या जयस्तंभाबद्दल असते. हा स्तंभ बांधण्यास आठ वर्षे लागली (१४४० ते १४४८) आणि राणा कुंभाने तो पूर्ण केला ह्या स्तंभाला ३० लाख रुपये खर्च आला पायाशी त्याची लांबी व रूंदी ३० फूट किंवा ९.४ मीटर आहे हा जयस्तंभ नऊ मजली आहे आणि १२७ पायऱ्या चढाव्या लागतात प्रत्येक मजल्याला गॅलरी आहे नवव्या मजल्याच्या मूळच्या पायऱ्या मोडल्यामुळे लाकडी जिना आहे मूळचे शिखर वीज पडून भगल्यामुळे, मुसलमानी पद्धतीचा घुमट आहे नवव्या मजल्यावर अष्टकोनी गच्ची आहे. चारी बाजूंनी जाळीच्या खिडक्या आहेत आणि चार बाजू मोकळ्या आहेत. तेथून लांबवरचे दृश्य मोठे मनोहर दिसते आठही मजल्यावर उत्कृष्ट कोरीव काम असून, त्यात व्यक्ती, पानांची नक्षी कोरलेली आहे हा हिंदु पुराणकथांचा कोश आहे असे व्हिन्सेंट स्मिथ हा इतिहासकार म्हणतो कुतुब-मिनार उंचीने अधिक आहे पण सौंदर्यात उणा आहे असे कर्नल टॉडने म्हटले आहे त्या काळी राजस्थानात आढळणाऱ्या हिंदु, (शैव आणि वैष्णव) जैन, इस्लाम ह्या धर्मांना प्रतिनिधित्व दिलेले आहे तिसऱ्या आणि आठव्या मजल्यावर अल्ला हा शब्द अरबी लिपीत कोरलेला आढळतो. जैनांची देवी पद्मावती हिची मूर्ती नवव्या मजल्यावर आढळते नवव्या मजल्यावर

मेवाडच्या राजाच्या वंशावळी कोरलेले दोन शिलालेख आहेत. चितोडचा जयस्तंभ प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची भव्यता, प्रमाणबद्धता आणि सौंदर्य स्पष्टपणे प्रतीत होणे केवळ अशक्य आहे

**कीर्तिस्तंभ**—चितोडगडावर ८० फूट उंचीचा आठ मजली आणखी एक स्तंभ आहे हा जैनानी १२ व्या शतकांत बांधला आणि तो आदिनाथ किंवा ऋषभदेव ह्या तीर्थंकराच्या स्मरणार्थ बांधलेला आहे आदिनाथाच्या नग्न मूर्ती आणि इतर असंख्य लहान मोठ्या मूर्ती ह्या स्तंभावर कोरलेल्या आहेत

**राणा कुंभाचा राजवाडा**—चितोडच्या किंबहुना मेवाडच्या इतिहासात राणा कुंभाचे नाव अग्रभागी शोभणारे आहे राणा कुंभ इ. स १४३३ मध्ये लहान वयातच गादीवर आला त्याने ३५ वर्षे राज्य केले आणि वैभवाचे परमोच्च शिखर गांठले. त्याने अनेक लढाया मारून आपले राज्य खूपच वाढविले कुंभालगड आणि अबू पर्वतावरील अचलगड हे अजिंक्य दुर्ग बांधले, चितोडचा जयस्तंभ बांधला, सात दरवाजाचा रस्ता करविला चोहीकडे कडेकोट बंदोबस्त केला. राणा कुंभ हा कलावंतांचा आणि विद्वानांचा आश्रयदाता होता आणि स्वत ही मोठा विद्वान होता त्याने लिहिलेले शास्त्रीय संगीतावरील ग्रंथ उपलब्ध आहेत त्याने चार नाटके, तीन टीकाग्रंथ आणि स्थापत्यशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला आहे

राणा कुंभाचा राजवाडा ही चितोडगडावरील भग्नावस्थेत असलेली प्रशस्त तिमजली इमारत आहे किमान साडेसहाशे वर्षे ह्या इमारतीला झाली महाराणा हमीर ह्याने हा महाल इ स १३२६ मध्ये प्रथम बांधला राणा कुंभाने त्यात अनेक दुरुस्त्या करवून घेतल्या ह्यातील भिंतीवर केलेले एनॅमलचे चित्रकाम अजून सुस्थितीत आहे. प्रासादात घोड्याची जुनी पागा आहे पश्चिमेकडे झनाना महाल आहे इमारत साधेपणाने बांधलेली आहे ह्या राजवाड्यांत तळघरात जाण्यासाठी एक जिना आहे व तो उतरून गेल्यावर काळोखात असलेली एक विहीर आहे रजपूत स्त्रिया येथे जोहार करीत असे सांगतात

**मिराबाईचे मंदिर**—चितोडगडावर हिंडताना एक तिठा आहे तेथे जवळच नैऋत्येला मिराबाईचे मंदिर आहे. हे मंदिर मिराबाईसाठी राणा

सगाने मुद्दाम बांधविले तेथे बसून मिराबाई आपल्या गिरीधर गोपालाचे भजन पूजन करीत असे मिराबाई चितोडगड सोडून गिरिधर गोपालाची मूर्तीहि घेऊन गेली आणि देऊळ रिकामे पडले इ स १५५३ मध्ये तेथें गिरिधर गोपाल आणि मिराबाईची चित्रे लावण्यात आली आणि देव व भक्त अशा दोघाची पूजा होऊ लागली देऊळ मध्यम आकाराचे आणि साधेसुधे आहे.

**संत रयदास चांभाराची छत्री**– देवळासमोरच मिराबाईच्या आध्यात्मिक गुरूची छोटी पण सुदर छत्री आहे आरसचा रयदास चाभार हा साक्षात्कारी सत होता आणि ही त्याची असामान्य योग्यता फक्त मिराबाईच ओळखू शकली आणि तिने त्याला गुरु केले ह्या छत्रीच्या घुमटावर एक विचित्र मनुष्याकृती आहे, तिला एक डोके आणि पाच सोंडा आहेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र ह्या पाची वर्णांच्या माणसाना ईश्वरप्राप्तीचा समान अधिकार आहे आणि सर्वांना समान दर्जा आहे असे ही आकृती सुचविते.

**कुंभश्याम मंदिर**– मीराबाईच्या मदिराच्या आवारातच उत्तरेकडे कुभश्याम मदिर आहे हे मदिर इ स १४४८ मध्ये वराहावतार मदिर म्हणून बांधले गेले, परतु साप्रत ते राधाकृष्ण आणि बळिराम मदिर म्हणूनच ओळखले जाते मदिर चागले भव्य आणि मजबूत आहे, त्याचे छप्पर पिरॅमिडसारखे असून मागे मोठा कळस आहे

**सूरज कुंड**– दक्षिणेकडे बाप्पारावळने बाधून घेतलेले सूर्यकुड आहे ते एकेकाळी फार सुदर होते आणि पवित्र मानले जाई. आता ते भग्नावस्थेत आहे

**कालिकामाता मंदिर**– सुर्यकुडाजवळच एका उच टेकाडावर कालिका मातेचे सुदर मदिर आहे चितोडगडावरील हे सर्वात जुने मदिर, बाप्पा रावळानेच हे आठव्या शतकात बाधविले भगवान सूर्याच्या अनेक मूर्ती मदिरात ठिकठिकाणी अद्यापीहि दिसतात अल्लाउद्दीन खिलजीच्या हल्ल्यात सूर्याची मुख्य मूर्ती भग्न झाली म्हणून देवीभक्त राणा हमीर ह्याने १४ व्या शतकात कालिकामातेची मूर्ती बसविली उंचावर असल्यामुळे हे मंदिर दूरवरून दिसते राणा हमीराने अन्नपूर्णा देवीचेहि मदिर बांधले खांबावर

त्याच्या वरच्या भागात बौद्ध पद्धतीचे कोरीव काम चांगले आहे. देवळात दोन मूर्ती आहेत काळ्या पाषाणाची आहे ती जुनी.

**पद्मिनीचा राजवाडा**—हा राजवाडा राणा कुंभाच्या राजवाड्यापासून मैलभर अंतरावर आहे हा राजवाडा बाप्पारावळ ह्याने प्रथम बांधविला. तो मोडकळीस आल्यावर महाराणा सज्जनसिंगाने त्याच जागी नवीन राजवाडा बांधविला पद्मिनी तलावापाशी हा राजवाडा बांधलेला असून, तलावातहि एक लहानसा बेट राजवाडा आहे पद्मिनीचा राजवाडा आता भग्नावस्थेतच आहे. ज्या ठिकाणी अल्लाउद्दीनाने पद्मिनीचे प्रतिबिंब आरशात पाहण्याचा आपला आबटशौक पूर्ण केला तो महाल सुस्थितीत आहे व तेथे आरसाहि आहे

जोहार करून सती जाण्याची रजपूत स्त्रियाची पद्धत पद्मिनीनेच सुरू केली. अल्लाउद्दीनच्या दुसऱ्या हल्ल्याच्या वेळी इ स १३०३ मध्ये पद्मिनीने हजारो रजपूत रमणींसह आपला देह अग्निनारायणास अर्पण केला आणि लढता लढता वीराचे मरण पत्करलेल्या आपल्या पतीला राणा रतनसिंगाला भेटण्यास ती स्वर्गात निघून गेली हा महान नारीयज्ञ पद्मिनीच्या महालाच्या परिसरातच झाला असे तज्ञाचे मत आहे आपले शील आणि स्वातंत्र्य ह्यांचे रक्षण करण्यासाठी रजपूत रमणी ऐन तारुण्यात स्वतःचा देह निर्भयपणे अग्निकुंडात लोटून देत. आपल्या पतीच्या अथवा पित्याच्या अथवा भावाच्या मागे आपण जिवंत राहणे त्यांना असह्य वाटे ह्यावरून त्यावेळचे कौटुंबिक संबंध फार जिव्हाळ्याचे होते असे दिसते आपल्या घरच्या स्त्रिया जोहार करणार अशी खात्री असल्यामुळे रजपूत वीरहि निश्चिंत होत आणि प्राणपणाने लढून शत्रूची अपरिमित हानी करत विजय झाला तरी तो शत्रूला फार महाग पडे.

जोहाराच्या पद्धतीने आत्मबलिदान करणे अथवा सती जाणे हे योग्य की अयोग्य हा कदाचित् आजच्या काळात वादाचा विषय होऊ शकेल. परंतु तत्कालीन परिस्थितीच्या प्रकाशातच अशा कृत्याच्या बरेवाईटपणाचे मूल्यमापन केले पाहिजे हे विसरून चालणार नाही अग्निदिव्य करून आपण निष्कलंक आहोत हे निखालसपणे सिद्ध करणाऱ्या सीतेला लोकनिंदा ऐकून रामाने टाकली, हे अन्यायाचे कृत्य झाले असे आजच्या जमान्यात आपण

म्हणू व ते बरोबरही असेल, पण रामाच्या काळी कोणती परिस्थिती होती हे लक्षात घेऊनच रामाने केलेल्या सीतात्यागाचा बरेवाईटपणा ठरविला पाहिजे

बरोबर असो वा चूक असो जोहार करणे ही काही सामान्य गोष्ट नव्हे हे प्रत्येकाला मान्य करावे लागेल जरूर म्हतारपण आले तरी जगण्याची आशा नष्ट होत नाही तरुणपणी जोहार करणाऱ्या रजपूत रमणींच्या धैर्य, निर्भय वृत्ती, त्यागाची पराकाष्ठा इत्यादी गुणाचे मोल असामान्यच म्हणावे लागेल. अशा वास्तुपुढे उभे राहिल्यावर मस्तक नम्र झाले नाही तर त्या माणसाचे मन विकृतच आहे असे म्हणणे भाग आहे. रजपूत वीरांना आणि वीरांगनांना नम्रपणे अभिवादन करून हे चितोड प्रकरण संपविणे बरे

प्रकरण १५.

# अवन्तिका अथवा उज्जयिनी

**अतिशय प्राचीन शहर**–श्रुतिग्रंथातही उज्जयिनीचा उल्लेख आढळतो, ह्यावरून ह्या नगरीची प्राचीनता प्रत्ययास येते. स्कंद पुराण, अग्निपुराण, ब्रह्मपुराण, गरुडपुराण, इत्यादी पुराणातही उज्जयिनीचे महत्व वर्णिलेले आढळते दूषण नांवाचा राक्षस तपस्वी ब्राम्हणांना नेहमी पीडा देत असे त्याचा नाश करण्यासाठी भगवान शकरानी महाकालाचे रूप धारण केले आणि त्याचा नाश केला अशी एक प्रचलित कथा आहे. उज्जयिनीचा महाकाल हे एक जागृत ज्योतिर्लिंग आहे असे मानतात.

भारतातल्या प्राचीन व पवित्र सप्तपुर्‍यामध्येही अवन्तिकेचा समावेश केलेला आहे वैशाख महिन्यात पाच दिवस अवन्तिकेत वस्ती करून राहणे अतिशय पुण्यप्रद मानले जाते.

कृष्ण, बळराम, सुदामा, इत्यादींनी जेथे बाळपणी शिक्षण घेतले तो सांदीपनी गुरुवर्यांचा आश्रम उज्जयिनीच्या परिसरातच आहे. प्राचीन काळापासूनच उज्जयिनी हे शैक्षणिक केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे. वासुदेव, शूद्रक, सातवाहन हे उज्जयिनीचे राजे केवळ काव्य-कला-प्रेमीच नव्हते तर ते थोर ज्ञाते होते. राजशेखराच्या काव्यमीमांसेनुसार त्यावेळी उज्जयिनीच्या अंत पुरात उज्जयिनीच्या राजाने कोमलकान्तपदावलीयुक्त संस्कृत भाषा बोलण्याची पद्धत रूढ केली होती विक्रमादित्याच्या दरबारात नऊ विद्वान नवरत्ने म्हणून ओळखले जात असत (१) ज्योतिषाचार्य वराहमिहीर, (२) कविकुलगुरु कालीदास, (३) अमरकोशाचा कर्ता अमरसिंह (४) वैय्याकरणाचार्य वररूपी, (५) आयुर्वेदपारगत धन्वतरी, (६) जैनाचार्य क्षपणक, (७) मंत्रविद्यानीतिज्ञ वेतालभट्ट (८) गुप्तधन शास्त्राचा ज्ञाता घटकर्पर आणि (९) शिक्षणतज्ञ शकू, हे ते नऊ पंडित होत. प्राकृत भाषाची

उत्पत्ती उज्जयिनीमध्येच झाली असे मानले जाते संस्कृत भाषेच्या परीक्षाचे उज्जयिनी हे केंद्र होते अलीकडच्या काळात उज्जयिनी येथें विक्रम विद्यापीठ स्थापन झाले आहे हे सर्वश्रुतच आहे. सांदीपनी आश्रम जेथे होता, तेथे प्राचीन कुलगुरुपरंपरेनुसार एक विद्यापीठ निर्माण करावयाची योजना कार्यवाहींत आहे.

व्यापारासाठीही उज्जयिनीचा प्राचीन काळापासून फार मोठा लौकिक आहे प्राचीन काळी अखिल भारतामधले राजमार्ग उज्जयिनीवरून जात आणि मोठा व्यापार चालत असे. उज्जयिनी भारताच्या केंद्रस्थानी असल्या-सारखे आहे. कर्कवृत्त उज्जयिनीच्या अगदी जवळून जाते उज्जयिनीला थोर थोर राजे लाभल्यामुळे वस्तूबरोबर विचाराची आणि संस्कृतीची देवाणघेवाण उज्जयिनीमधून होत असे आताहि कापूस व्यापाराचे उज्जयिनी हे मोठे केंद्र आहे गुलाबपाणी, मेंदी, कुंकू, रानम्हशींची शिंगे, अगरबत्ती, धूप, शेंदूर, मद्य, चंदन, सुवासिक तेले इत्यादी वस्तूंच्या व्यापाराबद्दल उज्जयिनी सुप्रसिद्ध आहे

उज्जयिनी निरनिराळ्या कालखंडात निरनिराळ्या नावानी ओळखली जात होती असे तिच्या अनेक नावावरून दिसते कनकशृंगा, कुशस्थली, अवन्ती, चूडामणी, अमरावती, पद्‌मावती, कुमुदवती, विशाला, भोगवती, हिरण्यमयी, उज्जयिनी ही नावे उज्जयिनीची प्राचीनता दाखविण्यास पुरेशी आहेत विक्रमादित्य राजाचे शौर्य, बल, पराक्रम, न्याय, प्रजापालन, विद्वत्ता इत्यादि गुण प्रसिद्धच आहेत त्याने गणराज्याची कल्पना प्रत्यक्ष व्यवहारात आणली, आणि तो भारतातला पहिला गणाध्यक्ष झाला. लोकशाहीच्या गणराज्याच्या कल्पनेचा उगम भारतातच झालेला आहे किंबहुना प्रभू रामचंद्राच्या वेळेपासून गणराज्याची कल्पना भारतात रूढ झाली असे म्हणावयास हरकत नाही. 'राजा प्रजानुरंजनात' हे त्याने प्रत्यक्ष दाखविले

जहांगीर बादशाहाच्या काळात जयरूप ह्या नावाचा एक महान योग-साधक उज्जयिनीत होता व त्याच्या अलौकिक सामर्थ्याने प्रभावित झालेला जहांगीर वारंवार उज्जयिनीस भेट देत असे

बौद्ध धर्माच्या भरभराटीच्या काळात बौद्धधर्माच्या चार महाजनपदा-

पैकी उज्जयिनी हे जनपद होते आणि चीन जपान पर्यंत बौद्धधर्माचा यशस्वी प्रसार करणारे प्रचारक येथेच तयार झाले जैन धर्मियाचा २४ वा सुप्रसिद्ध तीर्थंकर श्री महावीरस्वामी ह्याने उज्जयिनीमध्ये तपश्चर्या करून आत्मबल आणि साक्षात्कार प्राप्त करून घेतला.

साराश धार्मिक, भौगोलिक, सामाजिक, सास्कृतिक, विद्वत्ताविषयक आणि व्यापारविषयक दृष्टींनी उज्जयिनीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे हे सहज पटते

## प्रेक्षणीय स्थळें

उज्जयिनीमधले सर्वांत प्रेक्षणीय स्थळ म्हणजे ह्या नगरीचा अधिष्ठाता भगवान महांकाल ह्याचे पुरातन मदिर महाभारताच्या वनपर्वात आणि उद्योगपर्वांत महांकालाचा स्पष्ट उल्लेख आहे भूतलावरील शकराच्या स्थानापैकी हे सर्वात पवित्र मानतात मदिराच्या समोर कोटितीर्थ नावाचे पवित्र कुड आहे ह्यातील पाण्याचा स्पर्श करून नतर महाकालाचे दर्शन घ्यावयाचे असते. जुने आणि नवे अशी महाकाल मदिरे आहेत. नवे मदिर तळघरासारख्या भागात आहे मुसलमानानी जुन्या मदिरात विध्वस सुरू केल्यावर मूळच्या महाकाळेश्वराने आपली (पिंडी) हालविली आणि हल्ली जेथे नवे मदिर आहे तेथे नेऊन ठेवली असे मानतात.

ह्या नव्या मदिराच्या वरच्या बाजूस ओंकारेश्वराचे मदिर आहे तळघरातल्या महाकालेश्वराची पिंडी दक्षिणाभिमुख आहे. समोर नदी आहे. पश्चिमेला गणेशाची, उत्तरेकडे पार्वतीची आणि पूर्वेकडे कार्तिकेयाची मूर्ति आहे मदिरात एक तुपाचा व दुसरा तेलाचा असे दोन नदादीप अखडपणे तेवत असतात भगवान शकर जणु काय सहकुटुब सहपरिवार भक्ताच्या कल्याणासाठी अहोरात्र जागत बसले आहेत असे वाटते ह्या मूर्तीची पूजा भर्तृहरी, विक्रमादित्य, शालीवाहन ह्यांसारख्या भक्तांनी केली असेल भक्ताची अखड वर्दळ मदिरात चालू असते

**श्री बडे गणेश**—महाकाल मदिराच्या पश्चिम दरवाजातून बाहेर पडले की बडे गणेशाची मूर्ती दिसते व आपल्या भव्यतेने ती आपले लक्ष वेधून घेते. ही मूर्ती आधुनिक आहे.

**महामाया-सिद्धिदात्री हरसिद्धि देवी**—बडे गणेश मदिराच्या बाहेर

पडले, की थोड्या उतरावर हरिसिद्धिदेवीचे प्राचीन मंदिर आहे. ही देवी विक्रमादित्याची कुलस्वामिनी होती ह्या कुलस्वामिनीसमोर अनेक वेळा विक्रमादित्याने आपले मस्तक अर्पण केले पण प्रत्येक वेळी देवीने ते पुन्हा धडाला जोडून राजाला जिवंत करून कार्यप्रवृत्त केले.

**मोक्षदायिनी क्षिप्रा**–क्षिप्रा नदीचा उल्लेखही अति प्राचीन काळापासून आढळतो ह्या नदीला उत्तर घाट बांधलेले आहेत नृसिंह घाट, राम घाट, गंगा घाट, छत्री घाट, सिद्धनाथ घाट, मंगलनाथ घाट इत्यादी घाट प्रसिद्ध आहेत ह्या घाटावर नंग्या साधूंचे प्रमुख केंद्र दत्त आखाडा आहे. स्वामीभक्तीमुळे प्राणत्याग करण्यास मागेपुढे न पाहणाऱ्या वीर दुर्गादासाची छत्री नदीकाठी आहे

**श्रीगोपाल मंदिर**–शिंदे वंशातली राणी बायजाबाई हिने बांधविलेले अति भव्य गोपाल मंदिर अतिशय प्रेक्षणीय आहे. गोपालकृष्णाची मूर्ती अतिशय सुंदर असून, मूर्तीच्या हनुवटीत एक तेजस्वी हिरा जडविलेला आहे ह्या आधुनिक मंदिरात दर्शनार्थींची सतत गर्दी असते. ऐन बाजारात हे मंदिर उभे आहे. मंदिराबाहेर कुंकू, मेंदी, सुगंधी द्रव्ये, इत्यादी पदार्थ चांगले मिळतात.

**जंतर मंतर**–महाराजा सवाई जयसिंगाने बांधविलेली खगोल-अध्ययन-प्रयोगशाळा ( Observatory ) प्रेक्षणीय आहे अशाच वेधशाळा दिल्ली आणि जयपूर येथे आहेत उज्जयिनीच्या ह्या वेधशाळेत सम्राट यंत्र, नाडी-वलय यंत्र, दिगंश यंत्र याम्योत्तर भित्ति यंत्र अशी अनेक यंत्रे आहेत खगोल शास्त्रात पूर्वीच्या भारतीय ज्योतिषांनी किती मोठी प्रगती केली होती त्याची कल्पना ह्या जंतरमंतरवरून येते

**श्रीगढ कालिका**–जुन्या उज्जयिनीमध्ये महाकविकुलगुरु कालिदासाची आराध्य देवता कालिका देवी हिचे मंदिर आहे ह्या मंदिराच्या पाठीमागे गणेशाचे मंदिर आहे तेथे गेली कित्येक वर्षे उत्खनन चालू आहे ह्या उत्खननात जुन्या घरांचे अवशेष, प्राचीन मूर्ती, मातीची भांडी, हस्तीदंताची आणि धातूची शृंगारसाधने, विविध प्रकारची हत्यारे सापडली आहेत लुप्तप्राय इतिहासावर ह्या उत्खननाने नवीन प्रकाश पाडला आहे

उज्जयिनीमध्ये असंख्य लहानमोठी मंदिरे आहेत. आधुनिक युगाला

साजतील अशा नवीन इमारतीहि तयार होत आहेत की गज, टॉवर, माधव महाविद्यालयाची इमारत, नगरपालिका भवन ह्या प्रेक्षणीय इमारती आधुनिक काळातल्या आहेत विक्रम विद्यापीठाच्या इमारती होऊ घातल्या आहेत कालिदासाचे स्मारक म्हणून भव्य कीर्तिमदिर उभे राहणार आहे. काळाच्या ओघात ऐनवेळी डबघाईला आलेली उज्जयिनी पुन्हा डोके वर काढीत आहे वासुदेवशास्त्री खरे ह्यानी एका कवितेत उज्जयिनीसबधी खेद व्यक्त करताना 'कालाय तस्मै नम ' असे म्हटले आहे आज कालाय तस्मै नम· असे निराळ्या अर्थाने म्हणावेसे वाटते. काळच मोडतोड करतो आणि पुन्हा घडवीत राहतो

प्रकरण १६

# प्रवासाची फलश्रुती

गेल्या वीस वर्षांत आम्ही उभयतांनी बद्रीनाथ, जगन्नाथपुरी आणि रामेश्वर ही तीन धामे पाहिली होती, तशीच बारापैकी अकरा ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेतले होते नेपाळमध्ये जाऊन पशुपतीनाथाचे दर्शन घेतले होते राहिले होते ते प्रभासपट्टण येथील सोमनाथचे आणि द्वारकेच्या भगवान श्रीकृष्णाचे दर्शन तसेच रजपुतांनी आपल्या पराक्रमाने अमर केलेली उदयपूर, चितोडगडासारखी ऐतिहासिक तीर्थक्षेत्रे ही पाहावयाची राहिली होती. ह्या सहलीमुळे ह्या सर्व गोष्टी साधल्या आणि चार धामे, सप्तपुऱ्या आणि बारा ज्योतिर्लिंगाच्या यात्रा पूर्ण झाल्या आणि फार समाधान वाटले या यात्राबरोबरच दिल्ली, आग्रा, दौलताबाद, उदयपूर, चितोडगड इत्यादि ऐतिहासिक तीर्थक्षेत्रे आणि भाक्रा नानगल, तुंगभद्रा, ह्यांसारखी आधुनिक औद्योगिक तीर्थक्षेत्रे पाहावयास मिळाली. स्वातंत्र्य काळात भारताची होत असलेली सर्वांगीण प्रगती पाहून फार समाधान वाटले.

भारताची विविध राज्ये, विविध भाषा बोलणारे, विविध पोशाख करणारे. विविध चालीरिती आणि सणवार साजरे करणारे, पण आपण प्रथम भारतीय आहो असे अभिमानाने सांगणारे स्त्री-पुरुष पाहून भारताच्या विविधतेतील एकतेचा साक्षात्कार होतो आणि मन प्रसन्न होते भारताला उज्वल भविष्यकाळ आहे ह्याची खात्री वाटते पाकिस्तानी हल्ल्याच्या वेळी भारतातील एकात्मता चांगली प्रत्ययास आली. सर्व प्रकारचे भेदाभेद विसरून सर्व जनता एक झाली, त्यामुळेच पाकिस्तानचा दणदणीत पराभव झाला संकटाच्या वेळी आपण सर्व एक होतो हे तर चांगलेच आहे, परंतु ही एकता शांततेच्या काळातहि अभंग राहिली पाहिजे आपापसातील भांडणे भांडत बसले, हिंसेचा अवलंब केला, देशाच्या म्हणजेच स्वतःच्या संपत्तीचा नाश करण्यास प्रारंभ केला की, आपली शक्ती नष्ट होते आणि शत्रूचे नेमके फावते

सौराष्ट्रांतील आणि राजस्थानातील स्त्रिया घराबाहेर फारशा पडत नाहीत हा समज चुकीचा आहे देवळातून भगिनीवर्गाचीच गर्दी असते महाराष्ट्रापेक्षा गुजराथेत अधिक भाविकता आढळली, अर्थात स्त्रीवर्गात.

रस्त्याची स्थिती सर्वत्र चांगली आढळली बसेसचा वेगही चांगला असे त्यामुळे कंटाळा येत नसे

बहुकतेकाना हिंदी समजते त्यामुळे भाषेची अडचण विशेष जाणवत नाही विचारलेली माहिती पुरविण्यात तत्परता दिसून येते.

गुजराथ आणि राजस्थान ह्या दोन्ही राज्यात मिठाई खाण्याची प्रथा आपल्या इकडल्यापेक्षा अधिक आढळते तिखट खाण्याचे प्रमाण बरेच कमी दिसते. हवामानाच्या दृष्टीने महाराष्ट्रीय लोकांना तरी विशेष फरक जाणवत नाही थंडीचे दिवस असल्यामुळे असेल कदाचीत राजस्थान हे वाळवंटी राज्य असल्यामुळे तिकडील लोकवस्ती विरळ आढळते. गुजराथेत वस्ती त्या मानाने दाट आहे, परंतु महाराष्ट्रापेक्षा थोडी विरळ वाटते. पोशाख आणि भाषा ह्या व्यतिरिक्त विशेष फरक कोठे जाणवत नाही

**प्रवासाचे फायदे**—लांबवरच्या प्रवासाचे अनेक फायदे होतात

(१) सुखी जीवनासाठी माणसाला पालटाची अतिशय अवश्यकता असते आपण अन्नात व कपड्यात पालट करीत असतो व त्यासाठी सणावाराची योजना केलेली आहे, पण तो पालट प्रवासाला गेले म्हणजे मिळतो आपले नित्याचे काम पूर्णपणे विसरून आपण अगदी नवीन वातावरणात जातो हवापाणी वेगळे, देखावे वेगळे, भाषा वेगळी, पोशाख वेगळे, चालीरीती वेगळ्या, सोबत असलेली माणसे वेगळी, सर्वच वेगळे ह्या वेगळेपणामुळे अथवा पालटामुळे शरीर आणि मन दोन्ही प्रसन्न, टवटवीत, ताजी बनतात शीण निघून जातो आणि तरुण झाल्यासारखे वाटते परत आल्यानंतर पुन्हा नव्या जोमाने आणि उत्साहाने आपल्या नेहमीच्या व्यवसायाला लक्ष घालू लागतो व तो अधिक चांगला करू लागतो आयुष्य वाढते आणि आरोग्यही सुधारते शरिरात साचलेले विषारी पदार्थ आणि मनावर आलेली जळमटे नाहीशी होतात

(२) अनुभवाची सपन्नता व त्यामुळे आपल्या व्यक्तित्वात सुयोग्य बदल हा दुसरा मोठा फायदा आहे. विविध स्वभावाची माणसे भेटतात.

बरीचशी चागली भेटतात त्यांच्याकडे पाहून आपला चांगुलपणा वाढतो. जगाच्या पसाऱ्यात आपले स्थान नेमके कोठे आहे ते समजण्यास मदत होते आपण आत्मनिरीक्षण आणि परीक्षण करू लागतो. आपल्यातले स्वभावदोष आपणांस दिसू लागतात व ते काढून टाकण्याच्या प्रयत्नास आपण लागतो आपले मन अधिक शांत, अधिक निर्मत्सर व अधिक उन्नत होते. आपला राग आणि लोभ कमी होण्यास मदत होते. पैसा ही महत्वाची गोष्ट नसून वैराग्य, त्याग, आत्मार्पण, सेवा, सत्यनिष्ठा इत्यादी जीवनमूल्ये अधिक महत्वाची आहेत हा साक्षात्कार आपणास निश्चितपणे होतो. त्यामुळे आपला जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलतो घेण्यापेक्षां देणे अधिक सुखकारक असते. भोगापेक्षां त्याग अधिक श्रेष्ठ असतो, जनताजनार्दनाची मातृभूमीची सेवा हीच खरी ईश्वरसेवा हे मनाला पटते.

३) प्राचीन काळची भव्य मंदिरे, शिल्पकृती, प्रचंड किल्ले, नैसर्गिक व कृत्रिम जलाशय पाहिले, की भारतीय संस्कृतीचे श्रेष्ठत्व पटते प्राचीन काळी भारतात नांदणारी सुबत्ता, कलावंताचा दीर्घोद्योग, चिकाटी, आणि कौशल्य पाहून मन आश्चर्याने थक्क होते आणि त्याच्याबद्दल मन आदराने भरून जाते दिलवाडा येथील जैन मंदिरे, उदयपूर येथील राजवाडे आणि जलाशय, द्वारकाधीशाचे मंदिर, सोमनाथाचे मंदिर, गिरनार इत्यादि वास्तु पाहिल्या की अभिमान वाटतो. मनाला मोठी प्रसन्नता वाटते, एक प्रकारच्या निर्मळ, उदात्त, उन्नत वातावरणात आपण वावरत आहो असे वाटते एखादे वेळी असा विचारही मनात येतो की, भारतीय माणसाची ही उद्योगशीलता, साधी राहणी व उच्च विचारसरणी गेली तरी कोठे? कमी काम आणि जास्त दाम ही प्रवृत्ती कां वळावत चालली आहे ? स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अधिक कष्ट करून पारतंत्र्यात झालेली पिछेहाट भरून काढावी आणि राष्ट्राला पुढे पुढे नेऊन बसवावे असे का वाटत नाही ? भाषावाद, जातीयवाद, परधर्माबद्दल असहिष्णुता इत्यादि गोष्टीमुळे भांडणे, विध्वंस ह्या गोष्टी का घडत आहेत ? हे चालू राहिले तर फुटीर वृत्ती बळावून देश अधोगतीला जाणार का ?

४) प्रवासामुळे माणसाचा दृष्टिकोन विशाल होतो आणि त्याच्या अंगी बहुश्रुतपणा येतो त्याच्या ज्ञानाची कक्षा विस्तारते त्याच्या अंगी धीटपणा येतो, चौकस वृत्ती जागृत होते, त्याची वृत्ती संयमशील होते तो नव्या वातावरणाशी अपरिचित माणसाशी जुळवून घ्यावयास शिकतो अनपेक्षित परिस्थितीत तात्काळ निर्णय घ्यावयास तो शिकतो प्रवासात अनपेक्षित प्रसंग, अडचणी येतातच प्रेक्षणीय वस्तूत नेमके काय पाहावयाचे हे त्याला समजू लागते थोड्याच गोष्टी पण सूक्ष्मपणे पाहाणे चांगले हे त्याला समजते आणि तो उगाच धावपळ करीत बसत नाही माणसाला सौंदर्यदृष्टी प्राप्त होते आणि त्यामुळे मनाला आनंद होतो

५) माणसामध्ये विविधांगी अभिरुची असावयास हवी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वास्तुकला, निसर्गसौंदर्य, वाङ्मय, फळे, फुले, जलाशय, नद्यांचे प्रवाह इत्यादि सर्व गोष्टींबद्दल त्याला आवड, अभिरुची, प्रेम असले पाहिजे, तरच त्याचे जीवन सुखी होते प्रवासामुळे अर्थात् डोळस प्रवासामुळे आवडीने केलेल्या प्रवासामुळे—माणसात ही विविधांगी बहुरंगी अभिरुची निर्माण होते आणि त्याला सुखाचा एक मोठा ठेवाच सापडतो. मग त्याला वेळ कसा घालवावा हा प्रश्न कधीहि सतावू शकत नाही आपण पाहिलेली सौंदर्यस्थळे तो आपल्या मनश्चक्षूपुढे आणू शकतो आणि पुन प्रत्ययाचा आनंद मिळवितो.

६) भारत हा खंडप्राय देश त्यात अनेक भाषा बोलणारे, भिन्नभिन्न पोशाख करणारे, भिन्न देवतांना भजणारे, भिन्नभिन्न चालीरिती पाळणारे लोक राहतात, पण ह्या विविधतेत एक सांस्कृतिक एकता आढळते भारतात कोठेहि जा, राम आणि कृष्ण, शिव आणि पार्वती, गणेश आणि सरस्वती ह्यांच्याबद्दल सर्वत्र आदरच आढळून येतो. सर्व मंदिरातून वैदिक पद्धतीने पूजा चालतात नंदादीप सर्वत्र आढळतो, परस्त्रीबद्दल आदर आणि स्त्रीदाक्षिण्य ह्याची सर्वत्र वाहवा होते प्रत्येक स्त्री जर ती कुमारिका अथवा सुवासिनी असेल तर कपाळावर कुंकू आणि हातात बांगड्या घातल्याशिवाय ती दिसावयाची नाही. नवऱ्याच्या पुढे चालावयाची नाही जवळ असेल तर ऐपतीप्रमाणे दानधर्म केल्याशिवाय रहावयाची नाही देवदर्शन सहसा चुकवावयाची नाही कष्टाला मागेपुढे पाहावयाची नाही बायकांमुळे भारतांत धर्म

शिल्लक राहिला आहे असे म्हणणे अयोग्य नाही. भारतीय माणूस जात्या सत्प्रवृत्त, प्रत्येक भूतमात्रात भगवंत पाहणारा, सहिष्णु वृत्तीचा, दुसऱ्याला मदत करण्याची इच्छा बाळगणारा असतो. विश्वाच्या अमर्याद पसाऱ्यात आपले स्थान किती गौण आहे हे त्याला समजते, म्हणून तो स्वभावतः विनम्र असतो. त्याला स्वार्थी, एकांगी, भांडखोर बनवितात, ते आपले तथाकथित पुढारी. स्वतःच्या स्वार्थासाठी ते भांडणे लावतात. अज्ञ जनतेचा बुद्धिभेद करतात आणि आपले मोठेपण वाढविण्याचा प्रयत्न करतात. हिंदु-मुसलमान, ब्राह्मण-ब्राह्मणेतर, स्पृश्य अस्पृश्य, मालक-मजूर हे वाद सर्वसामान्य माणसाच्या डोक्यातून निघालेले नाहीत. ते त्या त्या गटातल्या मूठभर बुद्धिमान पण स्वार्थी लोकांनी निर्माण केलेले आहेत. दोघांच्या भांडणांत तिसऱ्याचा लाभ ह्या तत्त्वानुसार ही माणसे आपली तुंबडी भरीत असतात.

एकंदरीत आमचा हा प्रवास चांगला झाला. कोठेही कोणाचेहि अरोग्य बिघडले नाही. निवडकच प्रेक्षणीय स्थळे आम्ही पाहिली, पण ती लक्षपूर्वक पाहिली. काही ठिकाणी थोडी घाई झाली. उदाहरणार्थ दिलवाडा येथील जैन मंदिरे पाहण्यास पुरेसा वेळ मिळाला नाही. उदयपूर आणि चितोडगड पाहण्यातही थोडी घाईच झाली. कार्यक्रमात थोडा बदल करून अधिक वेळ देणे शक्य होईल असे वाटते. आमचा प्रवास सुखकर झाला ह्याचें श्रेय दत्त-दिगंबर यात्रा कंपनीला दिले पाहिजे.

ज्याच्या कृपेमुळे आम्हाला हा प्रवास करण्याची प्रेरणा झाली, त्यासाठी लागणारा खर्च करण्याचे आर्थिक स्वास्थ्य लाभले, त्या श्रीसोमनाथाला आणि द्वारकाधीश भगवान श्रीकृष्णाला विनम्र भावाने वंदन करून, हे छोटेसे प्रवासवृत्त पूर्ण करतो.

— समाप्त —

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
५८४
२२५२०

## यात्रा सहलविषयक पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | काशी–रामेश्वर यात्रा–वर्णन | रु ६–५० |
| २ | काशी त्रिस्थळी यात्रा–वर्णन | रु १–५० |
| ३. | रामेश्वर दक्षिण भारत–दर्शन | रु. २–५० |
| ४. | काशी–वाराणशी दर्शन | रु ३–०० |
| ५. | केदार-नारायण यात्रा–वर्णन | रु. १–२५ |
| ६. | बद्रीनाथ-केदारनाथ यात्रा | रु. १–५० |
| ७. | सप्तपुरी यात्रा–वर्णन | रु. १–२५ |
| ८. | चारधाम यात्रा–वर्णन | रु २–०० |
| ९ | श्रीशैल्य-मल्लिकार्जुन–वर्णन | रु ०–७५ |
| १०. | काश्मीर सहल–वर्णन | रु १–५० |
| ११. | नासिक त्र्यंबक वर्णन | रु. ०–४० |
| १२ | कन्याकुमारी वर्णन | रु ०–२५ |
| १३ | दिल्ली मार्गदर्शक (नकाशासह) | रु १–५० |

★ पॅकिंग खर्च व टपालहशील प्रत्येक पुस्तकास वेगळा पडेल. ★

**दत्त दिगंबर यात्रा कंपनी [illegible]र, पुणे ३०**


REFBK-0022520

# आमचीं कांहीं वाचनीय व संग्राह्य पुस्तके

बालवाङ्मय (सुरस गोष्टी)
(ले प महादेवशास्त्री जोशी)

सुदर्शन ०–६५
वरदान ०–६५
खलग्रह ०–६५
उद्धार ०–४०
पुनर्जन्म ०–५०
राजा उत्तम ०–४०
(ले सौ. मालती दांडेकर)
जगांतील जमती ०–७५
(ले वसंत गांगल)
पिंटोबाच्या बिळांत पंढरी १–००
(ले बेडेकर)
लक्ष्मीचा बुरुज १–००
(ले व. नी गद्रे)
बांटू (वन्य पशू) ०–५०

कथासंग्रह
(ले. प महादेवशास्त्री जोशी)
विराणी २–५०
वेलविस्तार २–५०
(ले अँन्ड्र्यूज)
माताहारी व इतर हेरकथा ३–००
(ले. श्री. श्रीराम केळकर)
गजाआडच्या कथा ३–००

नाटके
आठ साल (ले शिखरे) १–५०
लो. टिळकांचे चरित्रावर आधारित

राजकन्या आणि भिकारी (वसंत गांगल) १–२५

धार्मिक व इतर
(ले. प महादेवशास्त्री जोशी)
नवनात भागवत २–००
नवनीत रामायण १–५०
ज्ञानदेवांचा हरिपाठ व चिरंजीवपद ०–१५
सुलभ काव्यशास्त्र ३–००
(ले म गो मोडक)
अभंगवाणी तुकाराम ३–००
(ले. दा न शिखरे)
धीरोदात्त केनेडी चरित्र २–००
(रियासतकार सरदेसाई)
सयाजीराव यांचे सहवासांत १–७५
(ले. गो प्र सोहोनी)
दक्षिण भारताचे दर्शन (प्रवासवृत्त) २–५०
(ले. सौ कमलाबाई टिळक, एम्. ए.)
स्त्रीजीवनाची नवीं क्षितिजें ५–००
(ले. आ. मा. लेले एम् एससी)
भारताच्या कामधेनु (आर्थिक) ३–००

व्यापाऱ्यांस योग्य कमिशन.
टपाल खर्च वेगळा.

जगन्नाथ प्रकाशन, ५२८ नारायण, पुणे ३०.